
सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
SOLAPUR TARUN BHARAT
सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहमदनगर व सातारा येथून वितरित
लातूर | गुरुवार, ३० ऑक्टोबर २०२५ | वर्ष ३ रे अंक २३९ | पाने १२ | किंमत रु. ६/- ■ RNI No. MAHMAR/2023/86477 ■ Postal Regd No. SLP/32/2024-2026.
dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com

## विचारपुष्प



संघटनेसाठी आवश्यक गोष्ट म्हणजे कार्यकर्ता. उत्तम कार्यकर्ते घेऊन कार्य वाढविणे एवढेच उरले आहे. त्यासाठी प्रत्येकाने जी जबाबदारी माझ्यावर सोपवली असेल ती उत्कृष्टपणे पार पाडणे व अधिक मोठी जबाबदारी पार पाडण्याची क्षमता प्राप्त करणे या दोन्ही गोष्टी केल्या पाहिजेत.

**- मोरोपंत पिंगळे**
रा. स्व. संघाचे पूर्व सह सरकार्यवाह

# राष्ट्रवादीवर नाराज माजी आमदार भाजपात

## सोलापूरच्या राजकारणात मोठी खळबळ!

### अजित पवार, एकनाथ शिंदे गटाला मोठा धक्का
### माजी आमदार राजन पाटील, यशवंत मानेसह माढ्याच्या रणजितसिंह शिंदेंच्या हाती कमळ

**मुंबई । सोलापूर, दि. २९ ऑक्टोबर,**

पक्षातंर्गत गटबाजीमुळे पक्षात नाराज असलेल्या अजित पवार राष्ट्रवादीतील माजी आमदारांनी घड्याळ बाजूला ठेवत हाती कमळ घेतले. मोहोळ तालुक्यातील राष्ट्रवादीचे माजी आमदार अजित पवार गटाचे नेते सहकार परिषदेचे अध्यक्ष राजन पाटील, माजी आमदार यशवंत माने, मोहोळचे शिवसेना नेते नागनाथ क्षीरसागर, माढ्याचे माजी आमदार



बबनदादा शिंदे यांचे पुत्र रणजीतसिंह शिंदे यांनी आपल्या शेकडो समर्थकांसह भारतीय जनता पार्टीमध्ये प्रवेश केला.

मुंबईत भाजपा प्रदेश कार्यालयात झालेल्या पक्षप्रवेशावेळी राज्याचे ग्रामविकास मंत्री तथा सोलापूरचे पालकमंत्री जयकुमार गोरे, इतर मागास बहुजन कल्याणमंत्री अतुल सावे, प्रदेश सरचिटणीस आ. संजय केनेकर, आ.अनुराधा चव्हाण, अक्कलकोटचे आ. सचिन कल्याणशेट्टी, भाजपा सोलापूर पूर्वचे जिल्हाध्यक्ष शशिकांत चव्हाण, भाजयुमोचे राष्ट्रीय उपाध्यक्ष व माजी आ. राम सातपुते, चेतनसिंह केदार सावंत आदी उपस्थित होते.

(उर्वरित वृत्त पान २ वर)

### माजी आमदार दिलीप माने 'वेटिंग' वर

काँग्रेसचे माजी आमदार दिलीप माने यांचाही आज भाजपात प्रवेश होणार होता. मात्र त्यांच्या प्रवेशाला दक्षिण सोलापुरातील स्थानिक भाजपा कार्यकर्त्यांचा तीव्र विरोध असल्याने त्यांना सध्या 'होल्ड' वर ठेवण्यात आला आहे. स्थानिक पदाधिकाऱ्यांची नाराजी दूर करून माने यांना पक्षात घेतले जाईल असे सूत्रांकडून सांगण्यात आले.

### दोन्ही देशमुखांची नाराजी होणार का दूर

पालकमंत्री गोरे आणि आ. सचिन कल्याणशेट्टी यांनी इतर पक्षातील नाराजांची मोट बांधण्यास सुरुवात केली असून आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये याचा भाजपला लाभ होणार आहे. असे असले तरी सोलापुरातील भाजपाच्या दोन विद्यमान आमदार देशमुखांची नाराजी पक्षासाठी डोकेदुखी ठरू शकते, अशीही चर्चा पक्षात रंगली आहे. भाजपातील गटतटाच्या राजकारणावरही पक्षश्रेष्ठींनी तोडगा काढण्याची मागणी कार्यकर्त्यांमधून होत आहे.

# समुद्र केवळ सीमा नसून संधीचे द्वार : पंतप्रधान

## जगात भारताची बंदरे सर्वात कार्यक्षम



मुंबई येथे आयोजित 'मेरीटाईम लीडर्स कॉन्क्लेव्ह'ला उपस्थित पंतप्रधान नरेंद्र मोदी, राज्यपाल आचार्य देवव्रत आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**◆ मुंबई, २९ ऑक्टोबर**

महाराष्ट्र ही छत्रपती शिवाजी महाराजांची भूमी आहे. ज्यांनी हजारो वर्षांपूर्वी सागरी सुरक्षेची केवळ निवच ठेवली नाही तर, अरब सागरातील व्यापारी मार्गावर आपला झेंडा फडकवून, समुद्र हे केवळ सीमा नसून संधीचे द्वारे असल्याचे दाखवून दिले. त्यामुळे आता आपल्याला या संधीचे सोने करून दाखवायचे आहे, असे उद्‌गार पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काढले.

मुंबई येथे आयोजित 'इंडिया मेरीटाईम वीक- २०२५' मध्ये 'मेरीटाईम लीडर्स कॉन्क्लेव्ह'ला ते 'ग्लोबल मेरीटाईम सीईओ फोरम'चे अध्यक्ष म्हणून संबोधित करत होते. यावेळी बोलताना ते म्हणाले, भारताचे सागरी क्षेत्र वेगाने आणि उर्जेने प्रगती करत आहे. आम्ही शतकाहून अधिक काळातील वसाहतीकालीन शिपिंग कायद्यांऐवजी २१ व्या शतकासाठी उपयुक्त असलेल्या आधुनिक, भविष्यकालीन कायद्यांचा वापर केला आहे. आज, भारताची बंदरे विकसनशील जगात सर्वात कार्यक्षम म्हणून गणली जातात. अनेक बाबींमध्ये, ते विकसित देशांपेक्षाही चांगली कामगिरी करत आहेत.

भारत जहाजबांधणीमध्ये नवीन उंची गाठण्यासाठी प्रयत्नांना गती देत आहे. आम्ही आता मोठ्या जहाजांना पायाभूत सुविधांच्या मालमत्तेचा दर्जा दिला आहे. भारताच्या जहाजबांधणी क्षेत्रात काम करण्याची आणि विस्तार करण्याची ही योग्य वेळ आहे. जगातील समुद्र उथळ असताना, जग एका स्थिर दीपस्तंभाच्या शोधात आहे, भारत ताकद आणि स्थिरतेने ती भूमिका बजावण्यास सज्ज असल्याचे पंतप्रधानांनी गौरवाने सांगितले.

जागतिक तणाव, व्यापारातील अडथळे आणि पुरवठा साखळ्यांमध्ये बदल होत असताना, भारत धोरणात्मक स्वायत्तता, शांतता आणि समावेशक वाढीचे प्रतीक म्हणून उभा आहे. २१ व्या शतकात, भारताचे सागरी क्षेत्र मोठ्या वेगाने आणि उर्जेने प्रगती करत आहे, असे पंतप्रधानांनी अधोरेखित केले.

(वृत्तसंस्था)

### गेल्या अकरा वर्षांत बंदरांची क्षमता दुप्पट

गेल्या दहा ते अकरा वर्षांचा विचार करताना भारताच्या सागरी क्षेत्रातील परिवर्तन ऐतिहासिक आहे. मेरीटाईम इंडिया व्हिजन अंतर्गत, १५० हून अधिक नवीन उपक्रम सुरू करण्यात आले आहेत, ज्यामुळे प्रमुख बंदरांची क्षमता जवळजवळ दुप्पट झाली असल्याचंदेखील पंतप्रधानांनी यावेळी सांगितले. तर, आपण सगळ्यांनी मिळून शांती, प्रगती आणि समृध्दीला अधिक गतीने समोर नेऊ, एक शाश्वत भविष्य निर्माण करू, असे आवाहन देखील यावेळी पंतप्रधान मोदी यांनी केलं.



आंदोलकांनी महामार्गावर वाहने आडवी लावून वर्धा-चंद्रपूरकडे जाणाऱ्या मार्गावरील वाहतूक अडवून धरली

# बच्चू कडूंचे आंदोलन सुरूच

## ● आज मुख्यमंत्र्यांशी चर्चा ● आंदोलन स्थळ रिकामे करण्याचा हायकोर्टाचा आदेश

**◆ बुटीबोरी/गुमगाव, २९ ऑक्टोबर**

गरीब गरजू शेतकऱ्यांची सरसकट कर्जमाफी करून त्यांचा सातबारा कोरा करावा, यासह इतर मागण्यांकरिता माजी मंत्री बच्चू कडू यांनी महाएल्गार आंदोलन सुरू केले आहे. आंदोलक जामठा येथे दाखल झाले असून, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी चर्चा केल्यानंतरच आंदोलनाची पुढची दिशा ठरणार आहे. मंत्री पंकज भोयर आणि आमदार आशिष देशमुख यांच्या शिष्टमंडळाने बुधवारी रात्री बच्चू कडू यांच्याशी चर्चा केली. उद्या कडू मुख्यमंत्र्यांशी चर्चा करणार असून तोपर्यंत शांततेच्या मार्गाने आंदोलन सुरूच राहणार आहे. दरम्यान, मराठा नेते मनोज जरांगे पाटील नागपूरकडे रवाना झाले आहेत.

बच्चू कडू यांनी सुरू केलेल्या आंदोलनाचा बुधवार हा दुसरा दिवस होता. मंगळवार, २८ ऑक्टोबरपासून आंदोलन सुरू झाल्याने नागपुरातून जाणारे चारही राष्ट्रीय महामार्ग ठप्प झाले आहेत. दरम्यान, पोलिसांनी नागपूरपासून २७ किलोमीटर अंतरावर महाएल्गार मोर्चातील कार्यकर्त्यांना अडवून ठेवले आहे. या आंदोलनकर्त्यांच्या गर्दीमुळे समोर जाण्याचे सर्व मार्ग बंद झाले आहेत. ही परिस्थिती पाहता मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने बुधवार, २९ ऑक्टोबर रोजी सायंकाळी ६ वाजेपर्यंत आंदोलन स्थळ सोडावे व महामार्ग मोकळे करावे, असे आदेश दिले होते. या आदेशाची प्रत थेट आंदोलन करणाऱ्या माजी मंत्री बच्चू कडू यांना देण्यासाठी पोलिसांची चमू गेली होती. पण बच्चू कडू यांनी आदेश न घेतल्याने पोलिस माघारी फिरले.

(तभा वृत्तसेवा)

### रस्त्यावर चर्चा कशी होणार?

आंदोलनस्थळी सरकारने यावे आणि चर्चा करावी, असा आग्रह बच्चू कडू यांनी धरला. पण खरोखरच आंदोलनस्थळी चर्चा कशी होणार, असा सवाल महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी उपस्थित केला आहे. ते म्हणाले, चर्चेसाठी सदैव तयार असल्याने आम्ही त्यांना मुंबईत येण्याचे आमंत्रण दिले. मग त्यांनी शेतकऱ्यांच्या हितासाठी यावे अन्‌ चर्चा करावी.

### आंदोलकांच्या मागण्या

निवडणुकीपूर्वी एक रुपयात शेतकऱ्यांना पीकविमा मिळत होता. तो आता बंद करण्यात आला आहे. जे शेतकरी नियमित कर्जाची परतफेड करतात, त्यांचा सातबारा पूर्णतः कोरा झालाच पाहिजे, या भूमिकेवर बच्चू कडू ठाम आहेत. ते म्हणाले, कांद्याला ४० रुपये प्रतिकिलो भाव दिला जावा. उसाला प्रतिटन ४३०० रुपये एमएसपी दिला जावा. गाई, म्हशींच्या दुधाला ४० रुपये प्रतिलिटर भाव द्यावा, अशा आमच्या मागण्या आहेत.



आंदोलन करताना महादेवराव जानकर, बच्चू कडू आणि वामनराव चटप

## बोर अभयारण्यातील पर्यटनाला फटका

### वर्धा, चंद्रपूर जिल्ह्यांतील वाहतूक प्रभावित

**नागपूर :** नागपुरात सुरू असलेल्या महाएल्गार आंदोलनाचा फटका वर्धा जिल्ह्यातील बोर व्याघ्र प्रकल्पाच्या जंगल पर्यटनाला बसला आहे. नागपूरकडे जाणारे वाहतूक मार्ग पूर्णपणे विस्कळीत झाले आहेत. बुधवारी सकाळी केवळ दोनच जिप्सी बोरच्या सफारी ट्रॅकवर धावल्या. जिल्ह्यातील हिंगणघाट आणि पुलगाव आगारांतील पाच बसेस नागपूरच्या जामठा येथे अडकल्या असून, बसफेऱ्या रद्द केल्या आहेत. यात एकाच दिवशी हिंगणघाट, पुलगाव आणि वर्धा आगाराला जवळपास ३ लाखांचा फटका बसला आहे. सेलू ते केळझर मार्ग बंद असल्याने सेलू ते केळझर मार्गावर दोन ते अडीच किमीच्या वाहनांच्या रांगा लागल्या होत्या. जाम चौरस्त्यावरच शेतकऱ्यांनी वाहनातून उतरून ठिय्या दिल्याने जाम चौरस्त्यावर वाहतुकीचा खोळंबा झाला. त्यामुळे पोलिसांनी घटनास्थळ गाठून नागपूरला जाणारी वाहतूक उमरेड मार्गे वळविली.

## महत्त्वाचे

### आशावादी वातावरणाने बाजार सुखावला

**मुंबई :** जागतिक बाजारातील सकारात्मक संकेत आणि अमेरिकन फेडरल रिझर्व्हच्या धोरण निर्णयापूर्वीच्या आशावादी वातावरणामुळे भारतीय शेअर बाजार बुधवारी वाढीसह बंद झाला. अमेरिका आणि भारत यांच्यात व्यापार कराराबाबतही निर्णयाची शक्यता आहे. या बातमीचाही गुंतवणूकदारांच्या मानसिकतेवर परिणाम झाला. मुंबई बाजारातील निर्देशांक ३६९ अंकांनी वाढून ८४,९७७ वर बंद झाला तर निफ्टीत १७८ अंकांची वाढ झाली. निफ्टीने २६ हजारांचा टप्पा ओलांडला. निर्देशांकात पॉवर ग्रीड, एनटीपीसी, एचसीएल टेक, अदानी या शेअर्सनी सर्वाधिक परतावा दिला. या तेजीतही इटर्नल, महिंद्रा, मारुती सुझुकी, बजाज फायनान्स, कोटक महिंद्रा कंपन्यांचे शेअर्स विक्रीच्या दबावाखाली राहिले.



### केंद्र सरकार विकणार एलआयसीमधील भागीदारी

**नवी दिल्ली :** केंद्र सरकार एलआयसीमधून आपली भागीदारी आणखी कमी करण्याची शक्यता आहे. सरकारकडून ८८०० ते १३२०० कोटी रुपयांचे शेअर्स विकले जाऊ शकतात. ही विक्री वर्षाअखेरीस होऊ शकते. सरकारकडून कंपनीन जनतेची भागीदारी वाढविण्यासाठी हा निर्णय घेतला जात आहे. या वृत्तानंतर एलआयसीच्या शेअर्समध्ये तेजी दिसून आली. त्यात जवळपास दोन टक्क्यांची वाढ झाली. सेबीच्या नियमानुसार कोणत्याही लिस्टेट कंपनीत किमान दहा टक्के भागीदारी जनतेची असायला हवी. यासाठी मोठ्या कंपन्यांकडे पाच वर्षांची मुदत असते.

### नवनीत राणा यांना धमकी

**अमरावती :** भाजपा नेत्या, माजी खासदार नवनीत राणा यांना बुधवारी हैदराबादहून पाठविण्यात आलेल्या पत्रातून जीवे मारण्याची धमकी देण्यात आली आहे. पत्रात थेट धमकी देऊन अश्लील भाषा वापरलेली आहे. या प्रकरणी राजापेठ पोलिस ठाण्यात हैदराबादच्या जावेद नावाच्या गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

# हेल्मेट, नंबरप्लेटवरून कॅमेऱ्यासमोर वाद

## स्कूटर चालक, वाहतूक पोलिसाला दंड

**ठाणे, २९ ऑक्टोबर**

ठाण्यात हेल्मेटशिवाय प्रवास करताना पकडलेल्या एका स्कूटर चालक व अस्पष्ट नंबरप्लेट असलेली दुसरी दुचाकी चालवणाऱ्या एका वाहतूक पोलिस कॉन्स्टेबलमध्ये जोरदार वाद झाल्याचे एका व्हायरल व्हिडीओमध्ये दिसून आले आहे, त्यामुळे पोलिसांना दोघांविरुद्धही कारवाई करावी लागली. ठाणे शहरातील वागळे इस्टेट परिसरात ही घटना घडली. हेल्मेटशिवाय चालकाला दंड ठोठावण्यात आला व वाहतूक पोलिस कॉन्स्टेबललाही २००० रुपये दंड ठोठावण्यात आला, असे पोलिसांनी मंगळवारी सांगितले. हेल्मेटशिवाय चालकाला किती दंड आकारण्यात आला, हे त्यांनी स्पष्ट केलेले नाही. हेल्मेट उल्लंघन केल्याबद्दल स्कूटर चालकाला थांबवण्यात आले व दंड करण्यात आला, त्यामुळे व्हिडीओमध्ये हाणामारी झाली. फुटेजमध्ये, दंड ठोठावण्यात आलेला माणूस कॉन्स्टेबलवर चुकीच्या पुढच्या नंबरप्लेटसह स्कूटर चालवल्याचा आरोप करताना दिसत आहे.






# रणरागिणीसोबत राष्ट्रपतींचे राफेलमधून उड्डाण

## अंबाला हवाई तळावरून झेप घेत रचला इतिहास

**◆ अंबाला, २९ ऑक्टोबर**

देशाच्या तिन्ही सेनादलांच्या प्रमुख राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी बुधवारी हरयाणाच्या अंबाला येथील हवाई तळावरून भारतीय वायुसेनेचे अत्यंत शक्तिशाली आणि अत्याधुनिक लढाऊ विमान असलेल्या राफेलमधून उड्डाण घेत इतिहास रचला. ऑपरेशन सिंदूर मध्ये राफेल उडविणारी वैमानिक शिवांगी सिंग या रणरागिणीसोबत त्यांनी उड्डाण केले.

वायुसेनेचे ग्रुप कॅप्टन अमित गेहनी यांनी विमानाचे संचालन केले. यावेळी त्यांनी राफेल उडवणारी भारतातील पहिली महिला वैमानिक



राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्यासोबत राफेल पायलट शिवांगी सिंग

शिवांगी सिंग यांच्यासोबत छायाचित्र काढले. ऑपरेशन सिंदूर दरम्यान राफेल विमान पाडून शिवानी सिंगला अटक केल्याची अफवा पाकिस्तानने पसरविली होती.

हवाई दल प्रमुख एअर चीफ मार्शल ए. पी. सिंग यांनी त्याचवेळी दुसऱ्या विमानातून उड्डाण केले. यापूर्वी मुर्मू यांनी ८ एप्रिल २०२३ रोजी आसाममधील तेजपूर येथील हवाई दलाच्या तळावरून सुखोई-३० एमकेआय लढाऊ विमानातून प्रवास केला होता.

वायुसेनेने प्रसिद्ध केलेल्या निवेदनात म्हटले की, सकाळी १० वाजता वायुसेनेच्या तळावर आगमन झाल्यानंतर राष्ट्रपतींना औपचारिक गार्ड ऑफ ऑनर देण्यात आला. राफेल विमानात चढण्यापूर्वी त्यांनी जी-सूट घातला आणि हेल्मेट धरून आणि सनग्लासेस घालून, त्यांनी वायुसेनेच्या वैमानिक शिवांगी सिंग यांच्यासोबत छायाचित्र काढण्यासाठी पोज दिली. सकाळी ११.२७ वाजता त्यांनी ग्रुप कॅप्टन अमित गेहनी यांच्यासोबत राफेलमधून उड्डाण केले. राफेल विमानातून प्रवास करणाऱ्या मुर्मू पहिल्या राष्ट्रपती ठरल्या आहेत. पहलगाम हल्ल्यानंतर पाकिस्तानातील दहशतवादी अड्डे उद्ध्वस्त करण्यासाठी भारताने अंबाला हवाई तळाचा वापर केला होता.

**पाकिस्तानला थेट संदेश**

भारताच्या ऑपरेशन सिंदूर मोहिमेदरम्यान पाकिस्तानने एका भारतीय महिला वैमानिकाला पकडल्याचा दावा केला. त्यानंतर पाकिस्तानने या वैमानिकाची ओळख शिवांगी सिंग अशी करून दिली. मात्र भारताने मोहिमेचे छायाचित्र व व्हिडीओ जारी करीत पाकिस्तानचे सर्व दावे फेटाळून लावले. त्यातच बुधवारी राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी राफेल उडवण्यापूर्वी अंबाला हवाई दल तळावर शिवांगी सिंग यांच्यासोबत छायाचित्र काढत पाकिस्तानचे दावे खोडत थेट संदेश दिला.

(वृत्तसंस्था)

पान १ वरुन

## राष्ट्रवादीवर नाराज माजी आमदार भाजपात

याप्रसंगी सातारा जिल्ह्यातील माण खटाव तालुक्यातील अजित पवार यांच्या राष्ट्रवादीच्या अनेक पदाधिकारी, नेत्यांनी तसेच म राठवाड्यातील शिक्षक संघटनेच्या नेत्यांनी भाजपामध्ये प्रवेश केला. प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांनी या सर्वांचे स्वागत केले.

यावेळी चव्हाण म्हणाले की, पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या खंबीर नेतृत्वावर विश्वास ठेवून विकासासाठी आज या सर्वांनी भाजपामध्ये प्रवेश केला आहे. राष्ट्रीयत्वाच्या भावनेने आज सर्वांनी प्रवेश केला आहे. मंत्री गोरे म्हणाले की, सोलापूर जिल्ह्याच्या राजकारणात प्रचंड शक्ती असलेल्या नेत्यांनी परिसराच्या विकासासाठी भाजपामध्ये प्रवेश केला आहे. पक्ष ताकदीने सर्वांच्या पाठीशी उभा राहील आणि प्रत्येकाचा सन्मान राखला जाईल अशी ग्वाही त्यांनी दिली. राजन पाटील म्हणाले की, मोहोळ तालुक्याचा स्वाभिमान गहाण ठेवला जाऊ नये यासाठी आम्ही भाजपामध्ये प्रवेश करत आहोत. पंतप्रधान मोदी आणि मुख्यमंत्री फडणवीस यांचे नेतृत्व अधिकाधीक सक्षम होण्यासाठी रात्रीचा दिवस करून काम करू. रणजीतसिंह शिंदे म्हणाले की, आगामी निवडणुकीत भाजपाच्या विजयासाठी झोकून देऊन काम करायचे आहे. विकसित भारत आणि विकसित महाराष्ट्राचे स्वप्न साकारण्यासाठी सर्वांच्या साथीने काम करू असेही ते म्हणाले. रणजीतसिंह शिंदे यांचे बंधू पंचायत समिती माजी सभापती विक्रम शिंदे, जि.प. माजी सभापती शिवाजी कांबळे, राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुका अध्यक्ष कैलास तोडकर, रमेश पाटील, जिल्हा परिषद माजी सदस्य शिवाजी पाटील, तुकाराम ढवळे, शंभुराजे मोरे आदींनी भाजपामध्ये प्रवेश केला. मोहोळ तालुक्यातून भाजपामध्ये प्रवेश केलेल्यांमध्ये सोलापूर जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष विक्रांत पाटील, राष्ट्रवादी काँग्रेस विद्यार्थी संघटनेचे माजी प्रदेश अध्यक्ष अजिंक्यराणा पाटील, मोहोळचे तालुकाध्यक्ष प्रकाश चवरे, दीपक माळी, सोलापूर जिल्हा कार्याध्यक्ष अस्लम चौधरी, सोलापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे संचालक भारत सुतकर, मोहोळ कृ.उ.बा.स. सभापती धनाजी गावडे, कृ.उ.बा.स.चे उपसभापती प्रशांत बचुटे, जि. प. माजी सभापती जालिंदर भाऊ लांडे आदींचा समावेश आहे.

### राजन पाटील व उमेश पाटील यांच्यातील वादाचा परिणाम

मोहोळ तालुका राष्ट्रवादीत राजन पाटील विरुध्द उमेश पाटील हा वाद अनेक वर्षांपासून पेटलेला आहे. दोन्ही पाटील सातत्याने ऐकमेकांवर उघडपणे आरोप-प्रत्यारोप करत असतानाही अजित पवारांनी कधीच कोणाला रोखल्याचे दिसले नाही. विशेष म्हणजे राजन पाटील गटाचा म्हणून माजी आमदार यशवंत माने यांना विधानसभा निवडणुकीत पाडण्यात आले. शरद पवार गटाचा आमदार विजयी करण्यात आला. या वादामुळे अखेर राजन पाटील, यशवंत माने या माजी आमदारांनी अजित पवारांच्या राष्ट्रवादीला राम राम ठोकल्याचे सांगण्यात येते.

### माढ्याचे शिंदे पिता-पुत्र अखेर भाजपाच्या आश्रयाला

एकत्र राष्ट्रवादी असताना अकलूजचे मोहिते-पाटील आणि माढ्याचे शिंदे बंधू यांच्यात राजकारण पेटले. याकडे देखील त्यावेळी पवारांनी दुर्लक्ष केल्याने मोहिते-पाटील भाजपात गेले. तर ऐन विधानसभा निवडणुकीत शिंदे बंधूंनी शरद पवार व अजित पवारांची साथ सोडत अपक्ष म्हणून निवडणुका लढविल्या आणि पराभूत झाले. माजी आमदार संजयमामा शिंदे हे अजित पवारांसोबत आहेत. तर माजी आमदार बबनदादा शिंदे यांच्या पुत्रांनी भाजपात प्रवेश केला आहे. बबनदादांवर नुकतीच परदेशात मोठी शस्त्रक्रिया झाली असून आपल्या मुलाचे राजकीय भवितव्य सुरक्षित करण्यासाठी त्यांनी भाजपाचा मार्ग पकडल्याची चर्चा राजकीय वर्तुळात आहे.

# स्थानिक संस्था निवडणुकांमध्ये व्हीव्हीपॅट वापराची नाही तरतूद

**तभा वृत्तसेवा,**
**मुंबई, दि. २९ ऑक्टोबर-**

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांशी संबंधित कायदे किंवा नियमांमध्ये व्हीव्हीपॅटचा वापर करण्याबाबत तरतूद नाही. शिवाय काही अपवाद वगळता जवळपास सर्वच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका बहुसदस्यीय प्रभाग पद्धतीनुसार घेण्यात येतात. त्यासाठी व्हीव्हीपॅट जोडणीची सुविधा असलेले मतदान यंत्र विकसित करण्याबाबत देशातील सर्व राज्य निवडणूक आयोगांची 'टेक्निकल इव्हॅल्यूएशन कमिटी' (टीईसी) अभ्यास करीत असून त्यांचा अद्याप अंतिम अहवाल सादर झालेला नाही. त्यामुळे सद्य:स्थितीत या निवडणुकांमध्ये व्हीव्हीपॅटचा वापर करणे शक्य नाही, असे स्पष्टीकरण राज्य निवडणूक आयोगाने केले आहे.

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रांचा (ईव्हीएम) वापर करण्याची तरतूद सन २००५ मध्ये संबंधित विविध अधिनियम/ नियमांमध्ये करण्यात आली; परंतु व्हीव्हीपॅटच्या वापराबाबत संबंधित अधिनियम किंवा नियमात कोणतीही तरतूद नाही. त्याचबरोबर काही अपवाद वगळता जवळपास सर्वच स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये बहुसदस्यीय प्रभाग पद्धती लागू आहे. बहुसदस्यीय प्रभाग पद्धतीमध्ये प्रत्येक मतदारास सरासरी ३ ते ४ मते देण्याचा अधिकार असतो. ही बाब लक्षात घेऊन या निवडणुकांकरिता व्हीव्हीपॅटसंदर्भातील तांत्रिक तपशील विकसित करण्याबाबत देशातील सर्व राज्य निवडणूक आयोगांची टेक्निकल इव्हॅल्यूएशन कमिटी अभ्यास करीत आहे. त्यांचा अहवाल प्राप्त झालेला नाही.

उपरोक्त नमूद पार्श्वभूमी लक्षात घेता स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांशी संबंधित अधिनियम/ निमयमांमध्ये राज्य शासनामार्फत योग्य ती तरतूद झाल्यानंतर; तसेच देशातील सर्व राज्य निवडणूक आयोगांची टेक्निकल इव्हॅल्यूएशन कमिटीचा व्हीव्हीपॅटच्या तांत्रिक तपशिलांचा (टेक्निकल स्पेशिफिकेशन्स) अहवाल प्राप्त झाल्यानंतर भविष्यामध्ये याबाबत योग्य तो निर्णय घेण्यात येईल. विशेषत: स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये आतापर्यंत व्हीव्हीपॅटचा वापर करण्यात आलेला नाही.

लोकसभा व विधानसभा निवडणुकांमध्ये इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रांच्या वापराबाबत सन १९८९ मध्ये 'लोकप्रतिनिधित्व अधिनियम, १९५१' मध्ये कलम '६१ अ' समाविष्ट करण्यात आले. त्याचबरोबर सन २०१३ मध्ये व्हीव्हीपॅटच्या वापरासंदर्भात 'कंडक्ट ऑफ इलेक्शन रुल्स, १९६१' अंतर्गत नियम क्र. '४९ ए' ते '४९ एक्स' व अन्य नियमांमध्ये अनुषंगिक तरतूदी करण्यात आल्या. त्यानुसार भारत निवडणूक आयोगाकडून लोकसभा व विधानसभा निवडणुकांमध्ये इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्राचा आणि व्हीव्हीपॅटचा वापर करण्यात येतो.

राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका 'मुंबई महानगरपालिका अधिनियम १८८८', 'मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९', 'महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५', 'महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या अधिनियम १९६१' आणि 'मुंबई ग्रामपंचायत अधिनियम १९५८' या कायद्यांमधील आणि संबंधित नियमांमधील तरतुदींच्या आधारे घेण्यात येतात. त्यात बदल किंवा सुधारणा करण्याची बाब राज्य निवडणूक आयोगाच्या अखत्यारित येत नाही, असेही निवडणूक आयोगाकडून स्पष्ट करण्यात आले आहे

# दिवाळी हंगामात एसटीची 301 कोटींची कमाई

**तभा वृत्तसेवा,**
**मुंबई, दि.२९ आक्टोबर-**

शेकडो कोटीचे कर्ज, थकीत वेतन, नादुरुस्त आणि निकामी गाड्या अशा नकारात्मक बाबीमुळे नेहमी चर्चेत राहणाऱ्या राज्य परिवहन महामंडळाला (एसटी )यंदाचा दिवाळी हंगाम मात्र पावला आहे. दहा दिवसात एसटीने तब्बल ३०१ कोटीची कमाई केली आहे. गेल्या वर्षापेक्षा ३१ कोटी अधिक उत्पन्न मिळविले. यंदा राज्यात सर्वाधिक उत्पन्न पुणे विभागाने मिळवले तर त्यानंतर जळगाव व नाशिक विभागाने द्वितीय व तृतीय क्रमांकांची कमाई केली आहे.

दिवाळीच्या १८ ते २७ आक्टोबर या १० दिवसात राज्यातील जनतेने मोठ्या प्रमाणात प्रवास केला. त्यामुळे एसटी महामंडळाला दररोज सरासरी ३० कोटीप्रमाणे ३०१ कोटी रुपये उत्पन्न मिळाले आहे. विशेष म्हणजे दिवाळी सुटीच्या परतीच्या दिवशी २७ ऑक्टोबरला ३९ कोटी ७५ लाख रुपये उत्पन्न मिळवुन या वर्षातील सर्वाधिक उत्पन्नाचा नवा विक्रम केला आहे. एसटीच्या ३१ विभागात सर्वाधिक उत्पन्न पुणे विभागाने आणले असून (२० कोटी ४७ लाख) त्यानंतर जळगाव (१५कोटी ६० लाख) आणि नाशिक (१५ कोटी ४१ लाख) विभागाचा क्रमांक लागतो. मागील वर्षीच्या दिवाळी हंगामाच्या पेक्षा यंदा महामंडळाने तब्बल ३७ कोटी रुपये उत्पन्न जास्त आणले आहे.

### अपेक्षित लक्ष गाठण्यास एसटीला अपयश

यंदाच्या आर्थिक वर्षांमध्ये एप्रिल व मे हे दोन महिने वगळता गेली चार महिने एसटी महामंडळाला सातत्याने तोटा सहन करावा लागत आहे. अवकाळी पाऊस आणि पूर परिस्थिती यामुळे जून ते सप्टेंबर या कालावधीमध्ये महामंडळाला सुमारे १५० कोटी पेक्षा जास्त तोटा सहन करावा लागला. परंतु ऑक्टोबर महिन्यात दिवाळीचा हंगाम व सुट्ट्यांच्या कालावधीमुळे उत्पन्नात वाढ होईल, अशी अपेक्षा होती. त्यामुळे प्रतिदिन ३४ कोटी रुपये याप्रमाणे ऑक्टोबर महिन्यात १०४९ कोटी रुपये उत्पन्न मिळविण्याचे लक्ष निर्धारित करण्यात आले होते. तथापि, ऐन दिवाळीचे काही मोजके दिवस सोडता दैनंदिन लक्ष गाठणे महामंडळाला शक्य झाले नाही. पुणे, बीड, अहिल्या नगर अमरावती, बुलढाणा या विभागांनी मागील वर्षीच्या तुलनेत यंदाच्या दिवाळीमध्ये चांगले उत्पन्न आणण्याचा प्रयत्न केला आहे परंतु सिंधुदुर्ग, यवतमाळ, गडचिरोली, चंद्रपूर, धाराशिव यासारख्या विभागांनी मात्र अत्यंत सुमार कामगिरी केल्यामुळे महामंडळाच्या एकूण उत्पन्नावर विपरीत परिणाम झाल्याचे दिसून येते.

# मतदार यादीतील संभाव्य दुबार नावाची उपाययोजना करा

### राज्य निवडणूक आयोगाचे आदेश

**तभा वृत्तसेवा,**
**मुंबई, दि. २९ ऑक्टोबर:**

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये पारदर्शकता आणि अचूकता राखण्यासाठी मतदार याद्यांमधील संभाव्य दुबार नावांची तपासणी करून योग्य ती दक्षता घ्यावी व दिलेल्या आदेशानुसार कार्यवाही करावी, असे निर्देश सर्व संबंधितांना राज्य निवडणूक आयोगाने बुधवारी दिले.

बोगस व दुबार मतदाराबाबत विरोधी पक्षाने आक्रमक पवित्र घेतला आहे. त्याविरोधात शनिवारी सर्वपक्षीय विरोधकाकडून निवडणूक आळेगाव च्या कार्यालयावर मोर्चा काढण्यात येणार आहे. त्या पार्श्वभूमिवर राज्य निवडणूक आयोगाने आज हे महत्त्वाचे आदेश दिले.

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी लागू असलेल्या अधिनियमांच्या तरतुदीनुसार भारत निवडणूक आयोगाने तयार केलेली विधानसभा मतदारसंघाची मतदार यादी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या सर्व निवडणुकांसाठी जशीच्या तशी वापरली जाते. तिचे केवळ महानगरपालिका, नगरपरिषदा, नगरपंचायती व ग्रामपंचायतींच्या निवडणुकासाठी प्रभागनिहाय; तसेच जिल्हा परिषद निवडणूक विभाग आणि पंचायत समिती निर्वाचक गणनिहाय विभाजीत केली जाते. या मतदार याद्यांचे विभाजन करताना विधानसभा मतदारसंघाच्या मूळ यादीप्रमाणेच मतदार याद्यांमध्ये मतदारांची नावे व पत्ते कायम ठेवले जातात.

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या प्रारुप अथवा अंतिम मतदार यादीतील संभाव्य दुबार मतदाराच्या नावासमोर (**) असे चिन्ह नमूद करण्यात येते. ही संभाव्य दुबार मतदारांबाबत स्थानिकरित्या तपासणी करून ती खरोखरच एकाच व्यक्तीची आहे किंवा वेगळ्या व्यक्तींची आहे, याबाबत तपासणी/ खात्री केली जाईल. मतदाराचे नाव, लिंग, पत्ता व छायाचित्र याची प्राथमिक तपासणीनंतर त्यांत साम्य आढळून त्या मतदाराकडून तो नेमका कोणत्या प्रभागातील, जिल्हा परिषद निवडणूक विभागातील/ पंचायत समितीच्या गणातील मतदान केंद्रावर मतदान करणार आहे, याबाबत विहित नमुन्यात अर्ज घेतला जाईल. अशा मतदारास उर्वरित कोणत्याही मतदान केंद्रावर मतदान करता येणार नाही.

संभाव्य दुबार नाव असलेल्या मतदाराकडून प्रतिसाद न मिळाल्यास असा मतदार मतदान केंद्रावर मतदान करण्यासाठी आल्यास त्या मतदाराकडून त्याचे नाव असलेल्या इतर कोणत्याही मतदान केंद्रावर मतदान केले नसल्याबाबत आणि करणार नसल्याबाबत विहित नमुन्यातील हमीपत्र लिहून घेण्यात येईल. अशा मतदाराची काटेकोरपणे ओळख पटल्यानंतरच त्याला मतदान करण्याची मुभा देण्यात येईल. याबाबत मतदार यादीतील संभाव्य दुबार नावांबाबत करावयाच्या उपाययोजनेसंदर्भात राज्य निवडणूक आयोगाने सविस्तर आदेश निर्गमीत केला आहे.

## क्रीडा

# संगमेश्वर कॉलेजची मैदानी स्पर्धेत यशस्वी कामगिरी

**सोलापूर, दि. २९ ऑक्टोबर-**

शालेय मैदानी स्पर्धेमध्ये संगमेश्वर कनिष्ठ महाविद्यालयाच्या खेळाडूंनी यशस्वी कामगिरी केली.या खेळाडूंना शारीरिक शिक्षण संचालक डॉ. आनंद चव्हाण, शारीरिक शिक्षण शिक्षक प्रा.संतोष खेंडे, प्रा. विक्रांत विभुते , प्रा.शरणबसवेश्वर वांगी यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांचे श्री संगमेश्वर एज्युकेशन सोसायटीचे चेअरमन धर्मराज काडादी, सचिव ज्योती काडादी, व्यवस्थापन समिती सदस्य पुष्पराज काडादी, प्राचार्य डॉ .ऋतुराज बुवा, उपप्रचार्य प्रा.प्रसाद कुंटे यांनी अभिनंदन केले.



कामगिरी : ओंकार घोडके (तिहेरी व उंच उडी, सुवर्ण ), साद मुजावर (हातोडा फेक, रौप्य), अभिषेक पुजारी (४०० मीटर धावणे कांस्य), परशुराम वाघमारे ( ८०० मीटर धावणे रौप्य व पदक क्रॉस कंट्री पाचवा) , संस्कार शिंगाडे ( १५०० मीटर धावणे रौप्य व क्रॉस कंट्री चौथा), सिकंदर बिराजदार ( १५०० मीटर धावणे कांस्य) , तुषार वाघचौरे (५ किमी चालणे रौप्य), वैभवी धोत्रे (गोळाफेक, रौप्य), अनुष्का वाघमारे ४०० मीटर धावणे व अडथळा, कांस्य), भूमिका भडकुंबे (१५०० मीटर, कास्य).

४ बाय १०० व ४०० रिले रौप्य : मुले : विश्वराज भूसणगी, ओंकार घोडके, सिकंदर बिराजदार, परशुराम वाघमारे, अभिषेक पुजारी. मुली : आदिती पाटील, भूमिका भडकंबे, गायत्री गुडदिनी, प्राजक्ता पवार, अनुष्का वाघमारे.

### इंडियन मॉडेल स्कूल

# स्टेट बोर्ड संघास विजेतेपद

### शालेय बेसबॉल स्पर्धेत कामगिरी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि २९ ऑक्टोबर-**

शालेय शहर बेसबॉल स्पर्धेत इंडियन मॉडेल स्कूल स्टेट बोर्ड संघाने १४ वर्षाखालील मुलांच्या गटात विजेतेपद पटकाविले. या संघाची पुणे विभागीय स्पर्धेसाठी निवड झाली. मल्लिकार्जून प्रशालेच्या मैदानावर झालेल्या अंतिम सामन्यात त्यांनी इंडियन मॉडेल स्कूल सीबीएसई या संघास पराभूत केले. संघास क्रीडा शिक्षक अक्षय माने व राजकुमार माने यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांचे संस्थापक अध्यक्ष ए. डी. जोशी, सचिव अमोल जोशी श्री साई महिला प्रतिष्ठानच्या सचिवा सायली जोशी, मुख्याध्यापिका सुजाता बुट्टे व ममता बसवंती यांनी अभिनंदन केले.

विजयी संघ : अजिंक्य बिराजदार, आर्यन राजगुरु, अर्णव राजगुरु, वरद ओक, तन्मय कोळी, राजवर्धन घुले, मनिष दुम्मनवर, आरुष केंदुळे, सच्चिदानंद सुरवसे, आयुष जाधव, हर्षल माने, मयांक पांढरे, अर्णव माने, आदित्य शिवदे, अर्णव भंडारी, कृष्णा करजगी.



# जिल्हास्तरीय स्केटिंग स्पर्धेत एमआयटी विश्वशांती गुरुकुलची उत्कृष्ट कामगिरी

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. २९ ऑक्टोबर -**

जिल्हास्तरीय स्केटिंग स्पर्धेमध्ये येथील एमआयटी विश्वशांती गुरुकुल स्कूलच्या विद्यार्थ्यांनी अभूतपूर्व कामगिरी करत यश संपादन केले आहे.

क्रीडा विभागातर्फे आयोजित विविध वयोगटातील शालेय स्केटिंग स्पर्धांमध्ये १४ वर्षाखालील मुलींच्या गटात पाही कोडलकर हिने प्रथम, जोया जमादार द्वितीय तर ज्ञानेश्वरी वनवे हिने तृतीय क्रमांक पटकावला. १७ वर्षाखालील गटात स्वस्ती माळवदकर द्वितीय तर काव्यांजली इंगवले हिने चौथा क्रमांक मिळवला. १९ वर्षाखालील गटात श्रावणी पावडे प्रथम आणि स्वरा चव्हाण हिने तृतीय क्रमांक पटकावला. ११ वर्षाय मुलांच्या गटात रुद्र जाधव याने प्रथम, १४ वर्षीय मध्ये मुस्तफा जमादार तृतीय तर १४ वर्षीय गटात सत्यम डोंगरे याने प्रथम क्रमांक पटकावला.

या सर्व विद्यार्थ्यांची विभागीय स्पर्धेसाठी निवड करण्यात आली आहे. स्केटिंग स्पर्धेसाठी आवश्यक एकाग्रता आणि शारीरिक समतोल याबाबत क्रीडा शिक्षिक कविता कटारिया, साहिल राणा व पल्लवी पाटील यांनी सर्व विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. यावेळी शाळेचे मुख्याध्यापक शिवाजी गवळी यांनी सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे कौतुक केले तसेच आणि आगामी विभागीय स्पर्धेसाठी त्यांना शुभेच्छा दिल्या.

# पुणे शहर संघास विजेतेपद

### राज्य ज्युनियर बॉल बॅडमिंटन स्पर्धा : हिंगोली उपविजयी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २९ ऑक्टोबर-**

राज्य ज्युनियर बॉल बॅडमिंटन स्पर्धेत पुणे महानगरपालिका संघाने विजेतेपद पटकाविले. नेहरूनगर येथील जय जवान जय किसान सैनिक स्कूलच्या मैदानावर झालेल्या या स्पर्धेतील अंतिम सामन्यात त्यानी हिंगोलीचा ३५/२७, ३५/३० असा पराभव केला. तृतीय स्थानासाठी झालेल्या सामन्यात अमरावतीने अहिल्यानगरवर ३५/२२, ३५/३० असा विजय मिळविला. या स्पर्धेतून उत्कृष्ट खेळाडू म्हणून हिंगोली जिल्ह्याचा व्यंकटेश मालवटकर याला एक हजार रुपये रोख व ट्रॉफी देऊन सन्मानित करण्यात आले.




सोलापूर शहर व जिल्हा बॉल बॅडमिंटन असोसिएशन व श्री सुशीलकुमार शिंदे कॉलेज ऑफ फिजिकल एज्युकेशन नेहरूनगर याच्या संयुक्त विद्यमानाने व द महाराष्ट्र बॉल बॅडमिंटन असोसिएशन याच्या मान्यतेने ही स्पर्धा पार पडली. बक्षीस वितरण जयजवान जय किसान सैनिक स्कूलचे प्राचार्य रवींद्र चव्हाण, द महाराष्ट्र राज्य बॉल बॅडमिंटनचे सचिव अतुल इंगळे, कोषाध्यक्ष धोंडिराज गोसावी, उपाध्यक्ष राजेंद्र भांडारकर , राजशेखर संगार सल्लागार, डॉ. हरिश काळे, द सोलापूर बॉल बॅडमिंटन असोसिएशनचे अध्यक्ष प्रकाश भुतडा, सचिव राजेंद्र माने, सहसचिव सुहास छंचुरे, कल्पना एकलंडगे याच्या हस्ते संपन्न झाला. या पारितोषिकाची ट्रॉफी वैभवी सोशल फाउंडेशन संस्थापक अध्यक्ष सागर शहा यांच्याकडून देण्यात आली.

सदर या स्पर्धेसाठी निवास व्यवस्था व मैदान व्यवस्था नेहरूनगर बीपीएड कॉलेजचे सुभाष चव्हाण, विवेक चव्हाण व कार्तिक चव्हाण यांचे सहकार्य लाभले. आस्था सामाजिक संस्थेचे अध्यक्ष आनंद तालिकोटी यांच्याकडून सर्व पंच व जिल्हा सचिव यांना भेटवस्तू देण्यात आली.

या स्पर्धेसाठी विविध जिल्ह्यातील जिल्हा सचिव गौरव पावडे, शेखनुर, शिवानंद खंगार,मनिष इंगोले, कल्पना फुलसंगे, मंजुषा खापरे,निजामोद्दीन शेख, तुषार देवरे, एकनाथ सुरशे, अभिषेक खैरनार, विजय अवताडे ,सचिन पाटील, सुनिल पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती.

स्पर्धा यशस्वी करण्यासाठी शब्बीर शेख, शिवकुमार स्वामी, अजित पाटील, शिवानंद सुतार, रविंद्र चव्हाण यांनी सहकार्य केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुहास छंचुरे यांनी केले. शिवकुमार स्वामी यांनी आभार मानले.




# जिल्हास्तरीय बॅडमिंटन स्पर्धेत एमआयटी ज्युनिअर कॉलेजचा संघ विजेता

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २९ ऑक्टोबर-**

क्रीडा व युवक सेवा संचालनालय महाराष्ट्र राज्य, पुणे तथा सोलापूर जिल्हा क्रीडा विभागाच्या वतीने डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवन सोलापूर येथे दिनांक २७ व २८ ऑक्टोबर रोजी जिल्हास्तरीय बॅडमिंटन स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते.

या स्पर्धेत वाखरी, पंढरपूर येथील एमआयटी विश्वशांती गुरुकुल ज्युनिअर कॉलेजच्या १९ वर्षांखालील मुलींच्या संघाने उल्लेखनीय कामगिरी करत विजेतेपद पटकावले आहे. तसेच एमआयटी ज्युनिअर कॉलेजच्या विजेत्या संघातील खेळाडू अनुष्का चाकूर, संजना बाड, श्रद्धा महाडिक, आर्या कुलकर्णी आणि ज्ञानेश्वरी फावडे यांची अहिल्यानगर येथे होणाऱ्या विभागीय स्पर्धेसाठी निवड झाली असून त्या सोलापूर जिल्ह्याचे प्रतिनिधित्व करणार आहेत.

एमआयटी ज्युनिअर कॉलेजच्या १९ वर्षांखालील मुलांच्या संघाने प्रतिस्पर्धी संघाना कडवी झुंज देत तृतीय क्रमांक मिळवला. मुलांच्या या संघात पारस शेठ, पार्श्व देशमाने, कृष्णा जाधव, अथर्व चव्हाण व वेदांत सोनटक्के यांचा समावेश होता. त्यातील पारस शेठ याची विभागीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे. यावेळी क्रीडा अधिकारी दत्तात्रय वरकड व पंच हर्षद शेख उपस्थित होते.

मुख्याध्यापिका शिबानी बॅनर्जी, प्राचार्य डॉ. स्वप्नील शेठ यांनी विजेत्या संघाचे व सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थेच्या वतीने अभिनंदन केले आणि पुढील स्पर्धांसाठी शुभेच्छा दिल्या.

# हमासने युद्धबंदी उधळली; इस्रायलचे जोरदार प्रत्युत्तर

## वायुसेना, लष्कराच्या हल्ल्यात १०४ नागरिक ठार, ११५ जखमी, | अनेक इमारती, निर्वासितांच्या छावण्या उद्ध्वस्त



◆ **गाझा, २९ ऑक्टोबर**

ओलिसांचे मृतदेह ताब्यात देण्यास टाळाटाळ आणि दक्षिण गाझामध्ये इस्रायली सैन्यावर ताफ्यावर झालेल्या गोळीबाराच्या घटनेनंतर दहशतवादी हमासवर युद्धबंदी करार मोडल्याचा आरोप करीत इस्रायलने मंगळवारी रात्री गाझा पट्टीतील अनेक भागात हवाई हल्ले आणि जमिनीवरून केलेल्या कारवाईत १०४ नागरिक ठार झाले, तर ११५ पेक्षा अधिक जण जखमी आहे. या हल्ल्यात अनेक इमारती आणि निर्वासितांच्या छावण्या उद्ध्वस्त झाल्या.

इस्रायलच्या लष्करी अधिकाऱ्याने प्रसिद्ध केलेल्या निवेदनात म्हटले की, दक्षिण गाझामध्ये त्यांच्या सैन्यावर गोळीबार झाला आणि त्यात १० इस्रायली सैनिक ठार झाले. त्यानंतर पंतप्रधान बेंजामिन नेतान्याहू यांनी युद्धबंदीचे उल्लंघन करणाऱ्या हमासवर हल्ले करण्याचे निर्देश दिले. मंगळवारी रात्रीपासून इस्रायलने गाझावर हवाई हल्ले केले, ज्यामध्ये १०४ जण ठार झाले. गाझाच्या आरोग्य विभागाने सांगितले की, इस्रायलच्या सैन्याने निवासी नागरिकांवर जोरदार हल्ले केल्याने गाझातील शांतीला गालबोट लागले आहे. मध्य गाझातील अल-अवदा रुग्णालयात ३० मृतदेह आणले, त्यात १४ मुलांचा समावेश आहेत. (वृत्तसंस्था)

### २० कलमी शांतता कराराला गालबोट

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या मध्यस्थीने २० दिवसांपूर्वी इस्रायल आणि हमास यांच्यात शांतता करार झाला होता. हमासला शस्त्र ठेवण्याची अट करारात होती, मात्र त्यांनी अटी-शर्ती उधळत इस्रायली सैन्यावर हल्ले करणे सुरूच ठेवले. त्यामुळे गाझात पुन्हा तणाव वाढला असून पंतप्रधान नेतान्याहू यांनी लष्कराला थेट हमासवर हल्ले करण्याची परवानगी दिली.

### हमासने फेटाळले आरोप

हमासने इस्रायलचे सर्व आरोप फेटाळून लावत म्हटले की, त्यांचा कोणत्याही हल्ल्यांशी कोणताही संबंध नाही आणि ते युद्धबंदीचे पालन करीत आहे. उलट इस्रायली सैन्य पॅलेस्टाईन नागरिकांवर हल्ले करीत आहे. इस्रायल जाणूनबुजून युद्धबंदी तोडण्याचा प्रयत्न करत आहे. इस्रायली हल्ल्यामुळे आम्ही ओलिसांचे मृतदेह परत करणे थांबविले आहे.



### इस्रायलचा हल्ला योग्यच : ट्रम्प

**पत्रकारांशी बोलताना ट्रम्प म्हणाले, हमासकडून कथित युद्धबंदी उल्लंघनांना प्रत्युत्तर देण्याचा अधिकार इस्रायलकडे आहे. हमासने वर्तनात सुधारणा न केल्यास त्यांचे अस्तित्व नष्ट केले जाईल. गाझात युद्धबंदी कायम आहे आणि हमासने कराराचे पालन करावे अन्यथा परिणामांना सामोरे जाण्याशिवाय त्यांच्याकडे पर्याय नाही.**

## आसियान देशांच्या बैठकीसाठी संरक्षणमंत्री क्वालालंपूरला जाणार

◆ **नवी दिल्ली, २९ ऑक्टोबर**

संरक्षण मंत्री राजनाथसिंह या आठवड्यात क्वालालंपूरला जाणार आहेत आणि आसियान राष्ट्रे आणि त्यांच्या काही संवाद भागीदारांच्या गटाच्या बैठकीत सहभागी होतील, ज्यामध्ये प्रादेशिक सुरक्षा परिस्थिती विकसित होण्यावर चर्चा होण्याची अपेक्षा आहे. शनिवारी १ नोव्हेंबर होणाऱ्या आसियान संरक्षण मंत्र्यांच्या बैठकीमध्ये राजनाथसिंह या प्रदेशासमोरील दहशतवादाच्या धोक्यासह प्रमुख सुरक्षा आव्हानांना तोंड देण्याबाबत भारताचे विचार मांडतील.

आसियान हे ११ देशांचे आसियान (आग्नेय आशियाई राष्ट्रांचे संघटन) आणि त्यांचे आठ संवाद भागीदार - भारत, चीन, ऑस्ट्रेलिया, जपान, न्यूझीलंड, कोरिया प्रजासत्ताक, रशिया आणि अमेरिका यांचा समावेश असलेले व्यासपीठ आहे. ते एडीएमएम-प्लसच्या १५ वर्षांचे प्रतिबिंब आणि पुढे जाण्याचा मार्ग आखणे या विषयावरील मंचाला संबोधित करतील. शुक्रवारी होणाऱ्या आसियान-भारत संरक्षण मंत्र्यांच्या दुसऱ्या अनौपचारिक बैठकीलाही सिंह उपस्थित राहणार आहेत.

या बैठकीचे उद्दिष्ट आसियान सदस्य देश आणि भारत यांच्यातील संरक्षण आणि सुरक्षा सहकार्य अधिक मजबूत करणे आहे, असे संरक्षण मंत्रालयाने सांगितले. (वृत्तसंस्था)

# भाभा अणुसंशोधन केंद्रात हेरगिरीचा प्रयत्न

## चक्क शास्त्रज्ञ बनून फिरत होते संशयित

◆ **नवी दिल्ली, २९ ऑक्टोबर**

भारताच्या अणुसंशोधनामधील महत्त्वाचे नाव असलेल्या भाभा अणुसंशोधन केंद्राची हेरगिरी करण्याचा मोठा डाव उधळला गेला आहे. दिल्ली पोलिसांनी अटक केलेल्या आदिल हुसेन आणि त्याचा भाऊ अख्तर हुसेनी या दोन आरोपींच्या केलेल्या चौकशीमधून हेरगिरी करण्यासंदर्भात धक्कादायक माहिती समोर आली आहे.

आदिल हुसेन आणि अख्तर हुसेनी हे आरोपी आपण मुंबईतील भाभा अणुसंशोधन केंद्रात शास्त्रज्ञ असल्याची बतावणी करत होते. या दोघांनीही बनावट ओळखीच्या माध्यमातून संवेदनशील माहिती परदेशी संस्थांना पाठवल्याचा आणि त्यांचा संबंध आयएसआयचे हँडलर्स आणि इराणमधील अणुसंस्थेशी असल्याचा आरोप आहे.

आदिल आणि अख्तर या भावांनी भाभा अणुसंशोधन केंद्राची चीन बनावट ओखळपत्रे बनवली होती. या ओळखपत्रांच्या मदतीने ते अणुकेंद्रात प्रवेश मिळवण्याच्या प्रयत्नात होते. मात्र त्यांचा हा डाव यशस्वी होण्यापूर्वीच पोलिसांनी त्यांना बेड्या ठोकल्या आहेत. आरोपी स्वतः



शास्त्रज्ञ असल्याचे बासवण्यासाठी भाभा आणुसंशोधन केंद्राचा लोगो आणि इतर अधिकृत कागदपत्रांच्या बनावट प्रति तयार करायचे, अशी माहितीही पोलिसांनी दिली.

आरोपींकडे करण्यात आलेल्या सखोल चौकशीमधून ही टोळी आयएसआयचे हँडलर्स, इराणमधील अणूसंस्था आणि रशियाच्या गुप्तहेर यंत्रणेच्या संपर्कात होती, अशी माहिती समोर आली आहे. स्पेशल सेलने दिलेल्या माहितीनुसार आदिल सय्यद हा आदिल हुसेन, मोहम्मद आदिल हुसेनी आणि नसीमुद्दीन यांसारख्या अनेक नावांनी काम करत होता. त्याच्याजवळ अनेक बनावट पासपोर्ट, बनावट ओखळपत्र आणि संवेदनशील कागदपत्रं सापडली आहेत.

दोन्ही आरोपींनी या बनावट पासपोर्टच्या मदतीने दुबई आणि इतर आखाती देशांमध्ये अनेकदा प्रवास केलेला आहे. तिथे परदेशी एजंटांना सुरक्षा आणि अणुसंदर्भातील माहिती विकण्याची ऑफर त्यांनी दिली होती. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार आदिल हुसेनी बरीच वर्षे दुबईमध्ये राहिला आणि त्याने हेरगिरीच्या माध्यमातून मिळालेल्या पैशांमधून तिथे अनेक मालमत्तांमध्ये गुंतवणूक केली. (वृत्तसंस्था)

### कॅफे संचालक ताब्यात

दरम्यान, स्पेशल सेलने या नेटवर्कशी संबंधित एका कॅफे संचालकालाही पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. या टोळीतील इकर सदस्य सध्या फरार आहेत. पोलीसही सातत्याने छापेमारी करत आहेत. तसेच परदेशी यंत्रणांच्या संपर्काचा तपास करत आहेत. पोलिसांनी केलेल्या चौकशीमध्ये आदिल याने भावासोबत मिळून बनावट ओळख बनवून संवेदनशील माहिती परदेशात पाठवल्याचं मान्य केले आहे. आरोपींकडून अनेक गोपनीय कागदपत्रे आणि इलेक्ट्रॉनिक डिव्हाईसही पोलिसांच्या हाती लागले आहेत, त्यांचा तपास फॉरेन्सिक पथकाकडून सुरू आहे.

# पॅरिस कराराकडे दुर्लक्ष; जगासाठी धोकादायक

## संयुक्त राष्ट्रांचा इशारा, हरितगृह वायू उत्सर्जन कमी करण्यात अपयश

◆ **संयुक्त राष्ट्रे, २९ ऑक्टोबर**

पॅरिस हवामान करार स्वीकारण्यास १० वर्षे उलटून गेले; मात्र कराराच्या अंमलबजावणीकडे होणारे दुर्लक्ष जगासाठी धोकादायक आहे. हरितगृह वायू उत्सर्जन कमी करण्यात काही देश प्रगती करत असले, तरी हवामान बदलाचे सर्वात वाईट परिणाम टाळण्यासाठी ही गती पुरेशी नाही, असा इशारा संयुक्त राष्ट्रांनी जारी केलेल्या अहवालातून देण्यात आला.

राष्ट्रीय हवामान योगदानावर आधारित व्यापक अहवाल प्रसिद्ध करण्यात आला. अहवालात म्हटले की, जानेवारी २०२४ ते सप्टेंबर २०२५ दरम्यान ६४ देशांनी नवीन राष्ट्रीय हवामान योजना सादर केल्या आणि २०३५ पर्यंत त्यांचे प्रदूषण अर्थात् हरितगृह वायू उत्सर्जन २०१९ च्या पातळीच्या तुलनेत अंदाजे १७ टक्क्यांनी कमी होईल, अशी अपेक्षा केली आहे. परंतु, हवामान कृतीचे फायदे प्रत्येक देश आणि प्रत्येक व्यक्तीपर्यंत पोहोचण्यासाठी उत्सर्जन कमी करण्यासाठी अजूनही वेगवान गती झालेली नाही. काही देशांनी कराराकडे दुर्लक्ष केले आहे आणि हा प्रकार जगासाठी अतिशय धोकादायक आहे.

पॅरिस करारांतर्गत प्रत्येक देशाची स्वतःची हवामान कृती योजना आहे, जी कार्बन उत्सर्जन कमी करण्यासाठी आणि हवामान बदलाच्या परिणामांना तोंड देण्यासाठी उपाययोजनांची रूपरेषा असली, तरी अद्याप कराराच्या दिशेने होणारी प्रगती असमाधानकारक असल्याचे अहवालात नमूद आहे. (वृत्तसंस्था)

# तामिळनाडूत ‘नोकरीसाठी लाच’ घोटाळा उघडकीस

## एका पदाची किंमत ३.५ दशलक्ष रुपये

◆ **चेन्नई, २९ ऑक्टोबर**

तामिळनाडूमध्ये नोकरीसाठी रोख रक्कम घोटाळा उघडकीस आला आहे. राज्य पोलिसांना चौकशीसाठी पत्र लिहिले गेले आहे. ईडीने पोलिसांना माहिती दिली आहे की प्रत्येक पदासाठी लाखो रुपयांची लाच घेण्यात आली. एजन्सीने विशेषतः परीक्षा घेणाऱ्या अण्णा विद्यापीठाची चौकशी करण्याची विनंती केली आहे. याव्यतिरिक्त, २०० पेक्षा जास्त पानांचा एक अहवाल पोलिसांना देण्यात आला आहे, ज्यामध्ये असंख्य नावे आहेत.

या वर्षी केलेल्या छाप्यांमध्ये गोळा केलेल्या पुराव्यांच्या आधारे ईडीने पोलिसांना पत्र लिहिले आहे. त्यात आरोप आहे की एमएडब्ल्यूएस (महानगरपालिका प्रशासन आणि पाणीपुरवठा) मधील २,५३८ पदांसाठी अधिकारी आणि कर्मचाऱ्यांची निवड रोख लाचेच्या बदल्यात करण्यात आली.तामिळनाडू पोलिसांना पाठवलेल्या पत्रात ईडीने म्हटले आहे की २०२४ च्या मध्यात झालेल्या परीक्षेत धाडस करण्यासाठी शक्तिशाली राजकारणी आणि त्यांच्या जवळच्या सहकाऱ्यांनी २.५ दशलक्ष ते ३.५ दशलक्ष रुपयांची लाच स्वीकारली. याव्यतिरिक्त, ऑगस्ट २०२५ मध्ये किमान १५० उमेदवारांना नियुक्ती पत्रे देण्यात आली.

या अहवालात कथित घोटाळ्यात सहभागी असलेल्यांची नावे आणि त्यांच्या भूमिकांचा तपशील देखील आहे. त्यात परीक्षेतील गैरप्रकार आणि ज्या १५० उमेदवारांचे निकाल गैरप्रकारात आले होते त्यांची माहिती समाविष्ट आहे. अहवालानुसार, कागदपत्रात मध्यस्थांमार्फत लाचखोरीच्या व्यवहारांची माहिती देखील समाविष्ट आहे. (वृत्तसंस्था)

### गैरप्रकार झाल्याचा आरोप नाकारला

अहवालानुसार, एमएडब्ल्यूएस सचिवांशी संपर्क साधला असता, त्यांनी ईडीच्या पत्राची माहिती नाकारली आणि सांगितले की नियुक्त्या कोणत्याही अनियमिततेशिवाय करण्यात आल्या. या कथित अनियमितता २,५३८ सहाय्यक अभियंते, नगररचना अधिकारी आणि कनिष्ठ अभियंत्यांच्या नियुक्त्यांशी संबंधित होत्या. उल्लेखनीय म्हणजे, २०२४ मध्ये या पदांसाठी १.१२ लाख लोकांनी अर्ज केले.

# काँग्रेसच्या बैठकीत गायिले बांगलादेशचे राष्ट्रगीत

## ● आसामच्या श्रीभूमी जिल्ह्यातील प्रकार ● भाजपाकडून जोरदार टीका

◆ **दीसपूर, २९ ऑक्टोबर**

आसाममधील श्रीभूमी शहरातील काँग्रेस सेवादलाच्या कार्यक्रमात काँग्रेस नेते विधू भूषण दास यांनी बांगलादेशचे राष्ट्रगीत गायल्याने भाजपाने जोरदार टीका केली.

श्रीभूमी जिल्ह्यात २७ ऑक्टोबर रोजी सेवा दलाची बैठक पार पडली होती. या बैठकीत विधू भूषण दास यांनी बांगलादेशचे ‘आमार सोनार बांगला’ हे राष्ट्रगीत गायले. भाजपाने या घटनेवर जोरदार टीका केली असून काँग्रेस मतपेटीचे राजकारण करत असल्याचा आरोप केला. श्रीभूमी शहर हे बांगलादेशच्या सीमेला लागून वसलेले आहे. या जिल्ह्यात बंगाली भाषिकाची संख्या लक्षणीय आहे.




भाजपाचे आमदार कृष्णेंदू पॉल यांनी काँग्रेसच्या कृतीवर टीका केली.

त्यांनी म्हटले की, बांगलादेश आणि बांगलादेशींबद्दल काँग्रेसला नेहमीच पुळका राहिला आहे. मतपेढीसाठी त्यांनी घुसखोरीला प्रोत्साहन दिले. याप्रकरणी आसामचे आरोग्य मंत्री अशोक सिंघल म्हणाले, हे तेच लोक आहेत, जे ईशान्य भारताला मुख्य भारतापासून वेगळे करू इच्छित होते. गेल्या अनेक वर्षांपासून काँग्रेस पक्ष आसाममधील अवैध घुसखोरांना पाठिंबा का देत होता, याचे कारण आता समोर आले आहे. राज्यातील लोकसंख्येत बदल घडवून काँग्रेसला येथे ग्रेटर बांगलादेश तयार करायचा आहे. (वृत्तसंस्था)

### निवडणुकीपूर्वी मुद्दा तापणार

आसाम भाजपाने काँग्रेसवर टीका करताना म्हटले की, बांगलादेशच्या मुस्लिमांना जवळ करण्यासाठी जाणुनबुजून केलेली ही कृती आहे. २०२६ च्या विधानसभा निवडणुकीच्या पृष्ठभूमीवर मतपेटीचे राजकारण करण्यासाठी काँग्रेसकडून ही खेळी खेळण्यात आली. बांगलादेशच्या सरकारने ईशान्य भारताचा भाग त्यांच्या नकाशात दाखवला आहे. दुसरीकडे काँग्रेस नेते बांगलादेशचे राष्ट्रगीत गात आहे, यावर काँग्रेसने स्पष्टीकरण द्यावे.

# केजरीवाल यांच्या अडचणीत भर

◆ **नवी दिल्ली, २९ ऑक्टोबर**

बुधवारी राऊस अव्हेन्यू न्यायालयाने दिल्ली पोलिसांना माजी मुख्यमंत्री आणि इतर आरोपींविरुद्ध दाखल झालेल्या २०१९ च्या सार्वजनिक मालमत्तेच्या विद्रुपीकरण प्रकरणाचा तपास जलद करण्याचे निर्देश दिले. न्यायालयाने पोलिसांना पुढील तारखेपर्यंत स्थिती अहवाल दाखल करण्याचे आदेश दिले. अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी नेहा मित्तल यांच्या अध्यक्षतेखालील न्यायालयाने तपास अधिकाऱ्यांना तपास जलदगतीने पूर्ण करण्याचे आणि ३ डिसेंबर रोजी पुढील सुनावणीत अहवाल न्यायालयात सादर करण्याचे आदेश दिले.

सुनावणीदरम्यान, तपास अधिकाऱ्यांनी न्यायालयाला माहिती दिली की या प्रकरणातील आरोपी माजी आमदार गुलाबसिंग आणि नगरपरिषद सदस्य नितिका शर्मा यांची चौकशी करण्यात आली आहे. दिल्लीतून अनुपस्थित राहिल्याने केजरीवाल यांची चौकशी प्रलंबित आहे. त्यामुळे तपास पूर्ण करण्यासाठी अधिक वेळ आवश्यक आहे. यापूर्वी, २९ सप्टेंबर रोजी न्यायालयाने तपास पूर्ण करण्यासाठी वेळ दिला होता. (वृत्तसंस्था)

## आसाराम बापूला सहा महिन्यांचा जामीन

◆ **जोधपूर, २९ ऑक्टोबर**

राजस्थान उच्च न्यायालयाने अल्पवयीन मुलीवर बलात्कार प्रकरणी दोषी ठरलेल्या आसाराम बापूला सहा महिन्यांचा जामीन मंजूर केला. मुख्य न्या. संजीव प्रकाश शर्मा आणि न्या. संगीता शर्मा यांच्या खंडपीठाने जामीन अर्जावर सुनावणी केली. वैद्यकीय कारणास्तव ही याचिका दाखल करण्यात आली होती.



दोन महिन्यातच पुन्हा आसाराम तुरुंगातून जामिनावर सुटतील. अल्पवयीन मुलीवर बलात्कार केल्याप्रकरणी आसाराम एप्रिल २०१८ पासून जन्मठेपेची शिक्षा भोगत आहे.

वैद्यकीय कारणास्तव ७ जानेवारी २०२५ रोजी पहिल्यांदाच अंतरिम जामीन मंजूर करण्यात आला होता. बुधवारी राजस्थान उच्च न्यायालयाने आसारामच्या शिक्षेला स्थगिती आणि वैद्यकीय कारणास्तव जामिनासाठीच्या याचिकेवर सुनावणी केली. आसारामची बाजू मांडणारे वरिष्ठ वकील देवदत्त कामत यांनी आभासी पद्धतीने त्यांची बाजू मांडली. राजस्थान सरकारच्या वतीने अतिरिक्त महाधिवक्ता दीपक चौधरी यांनी युक्तिवाद केला. (वृत्तसंस्था)

# ध्वनीच्या वेगापेक्षा जास्त वेगवान तरीही ‘मौन’!

◆ **कॅलिफोर्निया, २९ ऑक्टोबर**

नासाचे नवीन प्रायोगिक जेट, एक्स-५९ ने अखेर उड्डाण केले आहे. हे सामान्य जेट नाही, परंतु असे जेट आहे जे ध्वनीच्या वेगापेक्षा जास्त असूनही, सुपरसॉनिक विमानात ऐकू येणारा मोठा ध्वनी निर्माण करत नाही.

एक्स-५९ ने कॅलिफोर्नियातील पामडेल प्रादेशिक विमानतळावरून उड्डाण केले. हे उड्डाण नासासाठी एक मोठी कामगिरी मानली जाते. सामान्यतः, जेव्हा एखादे विमान ध्वनीच्या वेगापेक्षा जास्त वेगाने उडते तेव्हा जमिनीवर एक शक्तिशाली स्फोट ऐकू येतो. याला सोनिक बूम म्हणतात, जे इमारतींच्या काचा देखील हलवू शकते. म्हणूनच १९७३ पासून अमेरिकेत लोकसंख्या असलेल्या भागात सुपरसॉनिक उड्डाणांवर बंदी घालण्यात आली आहे.




पण एक्स-५९ विशेषतः या समस्येचे निराकरण करण्यासाठी डिझाइन केले गेले होते. ते उच्च वेगाने देखील हवेतील धक्के आणि आवाज कमी करण्यासाठी डिझाइन केलेले आहे. नासाचा असा विश्वास आहे की जर हा प्रयोग यशस्वी झाला तर जगातील सर्वात शांत सुपरसोनिक उड्डाणे होऊ शकतात. नासाचे ध्येय केवळ नवीन जेट तयार करणे नाही तर जगासमोर हे सिद्ध करणे आहे की आवाजमुक्त सुपरसॉनिक उड्डाण शक्य आहे. जर हा प्रयोग यशस्वी झाला तर अमेरिकेत सुमारे ५० वर्षांनंतर सुपरसॉनिक उड्डाणावरील बंदी उठवता येईल. यामुळे केवळ व्यावसायिक उड्डाणांना गती मिळणार नाही तर आपत्ती निवारण, वैद्यकीय वाहतूक आणि इतर आवश्यक सेवा जलद पोहोचवता येतील. (वृत्तसंस्था)

**विशेष म्हणजे, नासाने या चाचणी उड्डाणाची औपचारिक घोषणा केली नाही किंवा प्रेस रिलीजही जारी करण्यात आले नाही. अमेरिकेत सुरू असलेल्या शट डाऊनमुळे याचा गाजावाजा झाला नाही. तथापि, विमान उत्साही आणि छायाचित्रकारांनी सोशल मीडियावर उड्डाणाचे व्हिडीओ आणि फोटो शेअर केले. प्रतिमांमध्ये -५९ आकाशात उंच उडताना आणि मोजावे वाळवंटावरून जाताना दिसून आले. फ्लाइट ट्रॅकिंग वेबसाइट्सनुसार, विमान एडवर्ड्स एअर फोर्स बेसवरून सुमारे एक तास हवेत राहिले आणि फिरत राहिले.**

## चित्रपट वार्ता

### सिनेमात योग्य संधी न मिळाल्याची स्पृहाची खंत

**मुंबई** : मराठीतील लोकप्रिय चेहरा म्हणून स्पृहा जोशी अनेकांच्या आवडीची आहे. अनेक मालिका, नाटक आणि सिनेमांमधून ती प्रेक्षकांच्या भेटीला आली आहे. सध्या ती ‘पुरुष’ या नाटकात काम करीत आहे. अनेक मालिकांमधील तिच्या भूमिका गाजल्या. मात्र, सिनेमांमध्ये आपल्याला म्हणावी तशी संधी मिळाली नाही, अशी खंत तिने व्यक्त केली. स्पृहा म्हणाली, मला सिनेमांविषयी खूप वाटतं की ज्यासाठी मी योग्य आहे असे सिनेमे माझ्याकडे का येत नाहीत? असं का होतं हे मला कळलेलं नाही. कोणी दिग्दर्शक चांगली पटकथा घेऊन आले तर मी तयारच आहे. मला वेगळ्या भूमिका करायला नक्कीच आवडतील. जितके चांगले काम मला टीव्ही जगतात करायला मिळाले तशी संधी सिनेमात मिळाली नाही. त्या तुलनेत मी नाटकांबाबत खूप नशीबवान राहिले, असे म्हणता येईल.



### ‘भाभीजी..’ स्वगृही परतण्याची शक्यता



**मुंबई** : टीव्ही अभिनेत्री शिल्पा शिंदे लवकरच ‘भाभी जी घर पर हैं’ या शोमध्ये परतण्याची शक्यता आहे. सुरुवातीला शिल्पाने अंगुरीची भूमिका साकारली होती; एका वर्षानंतर तिने शो सोडला. आता अशी चर्चा आहे की, ती शुभांगी अत्रेची जागा घेऊन या भूमिकेत परतू शकते. निर्माते शिल्पाला पुन्हा शोमध्ये आणण्याची तयारी करीत आहेत. संबंधित सूत्राने सांगितले की, अंगुरी भाभीच्या भूमिकेत शिल्पा परतणार असल्याच्या चर्चा सुरू आहेत. सर्वांना आशा आहे की, लवकरच हा करार अंतिम होईल. कारण टीमला वाटते की, शोमध्ये नवीन बदल करण्याची आवश्यकता आहे. १० वर्षांच्या यशस्वी कामगिरीनंतर, चॅनेल ‘भाभी जी घर पर है’ला एक नवीन अनुभव देण्यासाठी काही नवीन पात्रे आणि नवीन घटक जोडू इच्छित आहे.

### रश्मिका-आयुष्मानचा ‘थामा’ १०० कोटींच्या क्लबमध्ये

**मुंबई** : रश्मिका मंधाना आणि आयुष्मान खुराना यांचा ‘थामा’ चित्रपट सध्या बॉक्स ऑफिसवर गाजतो आहे. पहिल्या दिवसापासूनच या चित्रपटाने तिकीटबारीवर आपली पकड मजबूत ठेवली आहे. आता ‘थामा’ १०० कोटींच्या क्लबमध्ये दाखल झाला आहे. या यशाने आयुष्मान अतिशय समाधानी आहे. तो म्हणाला, व्यावसायिक यश हे प्रत्येक अभिनेत्यासाठी मोठं समाधान असतं. माझ्यासारख्या अभिनेत्याला हे यश मिळणे हेच विशेष आहे. कारण मला नेहमीच नवे, वेगळे आणि प्रामाणिक कंटेट आवडतात. असा चित्रपट प्रेक्षकांपर्यंत पोहोचतो आहे, हा आनंदाचा विषय आहे.



सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा,
छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली,
जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर
(कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## अग्रलेख...

# ‘व्हिजन’च्या निमित्ताने अपेक्षा

भारताला २०४७ अर्थात स्वातंत्र्याच्या शताब्दीपर्यंत विकसित करण्याचा संकल्प केंद्र सरकारने स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवादरम्यान केला. त्यासाठी ‘विकसित भारत-२०४७’ ही महत्त्वाकांक्षी योजना केंद्राने आखली आहे. यामध्ये २०२५-२६ पर्यंत भारताची अर्थव्यवस्था ५ ट्रिलियन डॉलर्सपर्यंत नेण्याचे उद्दिष्ट आहे. त्याच धर्तीवर महाराष्ट्र सरकारने २०४७ पर्यंत विकसित महाराष्ट्राचे स्वप्न पाहिले असून, त्या अंतर्गत ‘विकसित महाराष्ट्र : विकसित भारतासाठी’ हे ध्येय निश्चित केले आहे. विकसित महाराष्ट्राची संकल्पना मूर्त स्वरूपात मांडण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली सल्लागार समिती आणि मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली समन्वय समिती स्थापन करण्यात आली आहे. माहिती आणि जनसंपर्क विभागाकडून राज्यव्यापी सर्वेक्षणाच्या माध्यमातून तयार करण्यात आलेल्या ‘विकसित महाराष्ट्र २०४७’ या व्हिजन डॉक्युमेंटला, तसेच त्याच्या अंमलबजावणीसाठी ‘व्हिजन मॅनेजमेंट युनिट’ स्थापन करण्यास नुकतीच राज्य मंत्रिमंडळाने मान्यता दिली आहे. ‘विकसित महाराष्ट्र-२०४७’ हे एक महत्त्वाकांक्षी स्वप्न आहे, ज्यात राज्याच्या विविध क्षेत्रांमध्ये दीर्घकालीन व मध्यमकालीन विकासाचे ठोस आराखडे दिले गेले आहेत. त्यात लोकसहभाग, सुशासन, तंत्रज्ञान, समावेशकता यांसारख्या आधुनिक संकल्पना समाविष्ट आहेत. अशा प्रकारचे, दूरदृष्टी ठेवणारे एक डॉक्युमेंट, एक संकल्पना, एक निश्चित ध्येय घेऊन काम करण्याचे नियोजन करणे ही महाराष्ट्र सरकारची मोठीच उपलब्धी मानली पाहिजे.

अशा प्रकारच्या मोठ्या व्हिजनमध्ये अंमलबजावणी, निधी व्यवस्थापन, विभागांचा सहभाग आणि नियमित देखरेख या गोष्टींचे यश देखील महत्त्वाचे असते. विकसित महाराष्ट्र २०४७ अंतर्गत राज्याचे १०० उपक्रम, १५० पेक्षा अधिक मापदंड आणि ५०० पेक्षा जास्त टप्पे या व्हिजन डॉक्युमेंटमध्ये निश्चित केले गेले आहेत. या व्हिजनच्या अंमलबजावणीसाठी स्थापन करण्यात येणाऱ्या व्हिजन मॅनेजमेंट युनिटमधील अन्य सदस्यांची नियुक्ती मुख्यमंत्री करणार आहेत. या युनिटद्वारे राज्यातील सर्व प्रकारची गुंतवणूक आणि विविध धोरणे ही व्हिजनच्या ध्येयाशी सुसंगत असेल याची खात्री करण्यात येईल. तसेच दर तीन महिन्यांनी प्रगती आणि मापदंडांचा आढावा घेण्यात येईल. हा दस्तऐवज राज्य शासनाने तयार केला आहे आणि त्याचा उद्देश २०४७ वर्षापर्यंत महाराष्ट्र राज्याला विकसित राज्य बनविणे हा आहे. ही व्हिजन ‘विकसित भारत २०४७’ या राष्ट्रीय मोहिमेशी सुसंगत आहे. या दस्तऐवजात तीन टप्पे निश्चित केले गेले आहेत. त्यात अल्पकालीन टप्पा २ ऑक्टोबर २०२९ पर्यंतचा धरला आहे. तर मध्यमकालीन टप्पा १ मे २०३५ पर्यंत म्हणजेच महाराष्ट्र राज्य स्थापनेच्या ७५ व्या वर्षानिमित्त नियोजित केला आहे. तिसरा आणि शेवटचा टप्पा दीर्घकालीन असून, तो १५ ऑगस्ट २०४७ पर्यंत, म्हणजेच भारतीय स्वातंत्र्याच्या शताब्दी वर्षापर्यंत पूर्ण करणे अपेक्षित आहे. या दस्तऐवजात प्रगतिशीलता, शाश्वतता, सर्वसमावेशकता आणि सुशासन हे चार मुख्य स्तंभ सांगितले आहेत. यात शहरी व ग्रामीण भागांचा समावेश असून राज्यातील शहरी व ग्रामीण दोन्ही भागांत विकासाचा समतोल साधण्याचा प्रयत्न करण्याचे सूतोवाच करण्यात आले आहे. अनेक क्षेत्रांमध्ये काम करण्याचा उद्देश स्पष्टपणे सांगितला असून, त्यात कृषी, उद्योग, सेवा, पर्यटन, पायाभूत सुविधा, ऊर्जा, जलव्यवस्थापन, शिक्षण, आरोग्य, तंत्रज्ञान हे प्रमुख विषय आहेत. महाराष्ट्रातील नागरिकांचा सहभाग हा त्यातील एक महत्त्वाचा स्तंभ आहे. नागरिकांचे सर्वेक्षण व अभिप्राय संकलन करून त्यांच्या अपेक्षा व सूचना यांचा समावेश करण्यात आला आहे. ४ लाखांहून अधिक नागरिकांनी या सर्वेक्षणात भाग घेतला आहे, हेही विशेषच म्हटले पाहिजे. निर्णयप्रक्रियेत एआय (कृत्रिम बुद्धिमत्ता) आणि मोठ्या लार्ज लँग्वेज मॉडेल्स (एलएलएम- प्रचंड विदा (डेटा) हाताळणारे अत्याधुनिक तंत्रज्ञान) इत्यादींचा वापर करण्याचा विचारही करण्यात आला आहे.

यातील काही गोष्टी लक्षणीय आहेत. उदाहरणार्थ, २०२९ पर्यंत राज्यातील मुलांचा शैक्षणिक सहभाग ४१ टक्क्यांवरून ७० टक्क्यांपर्यंत वाढवणे, आणि २०४७ पर्यंत तो १०० टक्के करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. शहरी भागातील झोपडपट्टी मुक्ती, स्वच्छ आणि आपत्ती-सक्षम शहरे, सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेचे सक्षमीकरण या गोष्टी देखील या ‘व्हिजन’मध्ये पाहिल्या गेल्या आहेत. हरित ऊर्जा आणि पर्यावरण-स्नेही उपायांचा विकास करण्याचाही विचार झाला आहे. उदाहरणार्थ, २०३० पर्यंत ५२ टक्के ऊर्जा हरित स्रोतांतून निर्माण करण्याचा प्रस्ताव त्यात आहे. तसेच कौशल्य विकास, उद्योजकता, नावीन्य ही विकासाची महत्त्वाची अंगे मानून त्यांची अंमलबजावणी व जबाबदाऱ्या निश्चित करण्यासाठी विभागीय समित्या व सचिव स्तरावर गटही तयार करण्यात आले आहेत. हा दस्तऐवज (डॉक्युमेंट) राज्याच्या भविष्यकालीन धोरणांचा आधार ठरेल असा आश्वासक संकेत त्यात आहे.

या व्हिजनसाठी केलेल्या सर्वेक्षणात लाखोंनी भाग घेतल्यामुळे भविष्यातील विकासाच्या प्रक्रियेत सर्व घटकांचा समावेश असण्याचे आश्वासन आपसूकच मिळते. तंत्रज्ञानाचाही समावेश यात केलेला असल्यामुळे डिजिटलायझेशन, डेटा-आधारित धोरणे आणि स्मार्ट पायाभूत सुविधा यांचा विचार हा आधुनिक विकासासाठी महत्त्वाचा आहे. सर्वसमावेशक विकासाचा संदेश यातून दिला गेला आहे. शिक्षण, आरोग्य, महिला सशक्तीकरण, शेती यांनाही या ‘व्हिजन’मध्ये स्थान मिळालेले आहे. ‘विकसित महाराष्ट्र २०४७’ या व्हिजन डॉक्युमेंटमध्ये कृषी, शिक्षण, आरोग्य, पायाभूत सुविधा अशा प्रत्येक विभागासाठी उद्देश आणि उपाययोजना दिल्या आहेत. त्यात कृषी व ग्रामीण विकास या सर्वांत महत्त्वाच्या विषयांत राज्याच्या अर्थव्यवस्थेला विकसित करण्यासाठी शेतीचे योगदान वाढवण्याचे लक्ष्य आहे. सर्व शेतकऱ्यांना वर्षभर दिवसा सौरऊर्जेने वीजपुरवठा करण्याचे नियोजन आहे. त्यासाठी ‘स्मार्ट व इंटेलिजन्ट’ गावे तयार करण्याचा प्रस्ताव असून पहिल्या टप्प्यात सुमारे ३,५०० गावांचा त्यात समावेश असणार आहे. कृषी विभाग, पाणी व जलसंधारण, हवामान प्रतिसादक पद्धती या सर्वांवर लक्ष देण्यात आले आहे. यातील सर्व योजना शहरांसह संपूर्ण ग्रामीण महाराष्ट्रातही लागू होणार आहेत. त्यामुळे विदर्भ, मराठवाडा अशा भागांनाही त्यात आपले योगदान देता येईल. शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढवणे, ड्रोन किंवा सौर पंप तंत्रज्ञान वापरणे असे उपाय त्यात शेतीच्या प्रगतीसाठी प्रस्तावित आहेत. त्यासाठी पायाभूत सुविधाही प्रस्तावित केल्या असून, त्यात हवाई मार्ग, रस्ते वाहतूक, ग्रामीण इंटरनेट वाढवण्यावरही भर आहे. यात समाविष्ट केलेली विभागनिहाय उद्दिष्टे आणि उपाययोजनांमुळे राज्याच्या विकासाला स्थिर व समावेशक दिशा निश्चितपणे मिळू शकते. तथापि, अंमलबजावणी, निधीची उपलब्धता, स्थानिक सहभाग व नियमित आढावा व देखरेख या बाबींवर विशेष लक्ष आवश्यक आहे. हा दस्तऐवज लोकांसमोर येऊन पुरते चोवीस तासही झाले नाहीत तर विरोधकांची कोल्हेकुई सुरूही झाली आहे. या संकल्पनेची त्यांनी भ्रष्टाचाराचे नियोजन अशा भाषेत संभावना करण्याचा उद्योगही सुरू केला आहे. यासाठी केलेले सर्वेक्षण खरोखर लोकसहभागातून झाले आहे काय आणि त्यांचे अभिप्राय या व्हिजनमध्ये आलेले आहेत काय, याबाबत विरोधक शंका घेत आहेत. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्रिद्वय एकनाथ शिंदे व अजित पवारांच्या दूरदर्शी सरकारने हे ‘व्हिजन’ स्वतः पाहिले आणि महाराष्ट्रालाही दाखविले आहे. एकप्रकारे हे फार मोठे स्वप्न आहे. राज्यकर्त्यांनी या बाबत एकच गोष्ट सुनिश्चित केली पाहिजे आणि ती अशी की, या व्हिजनला सर्व स्तरांवर संस्थात्मक व्यवस्थेचे पाठबळ द्यावे आणि त्यात सतत पारदर्शकता असेल याची खातरजमा करावी. या व्हिजनसाठी निधी कसा व कुठून येईल, त्यातील वेळेचे गणित कसे पाळता येईल, यात त्यांनी लक्ष घालावे आणि ते करूनच दाखववावे. भविष्यात कोणत्याही किंतु-परंतु विना हे काम सतत चालले पाहिजे, याची व्यवस्थाही त्यांनी करावी, एवढीच अपेक्षा आहे.

## तंत्रवेध

**डॉ. दीपक शिकारपूर**

# ॲमेझॉन नेटवर्क आऊटेजचे गंभीर संकट

२१ व्या शतकाची सुरुवात होऊन आता २५ वर्षे झाली आहेत. तरीही गेल्या १५-२० वर्षांमध्ये ज्या प्रकारे बदल झाले, तितके त्याआधीच्या ५० वर्षांमध्येही झाले नव्हते, असे म्हणता येईल. कॉम्प्युटर, इंटरनेट, त्यानंतर आलेला स्मार्टफोन यांच्या जमलेल्या गूळपीठामुळे महानगरांपासून खेड्यांपर्यंत सर्वांच्याच जीवनात फरक पडला. संगणक आणि संगणकीय प्रणाली पूर्वीप्रमाणे फक्त सांगकाम्या राहिल्या नसून मानवी व्यवहार जास्त चांगल्या पद्धतीने समजून घेण्याची क्षमता त्यांना दिली जात आहे. बदलत्या तंत्रज्ञानाचे परिणाम अनेक क्षेत्रांमध्ये क्रांतिकारी परिवर्तनाने जाणवणार आहेत. आपल्या आसपासच्या डिजिटल विश्वाची सतत उत्क्रांती होत राहणार आहे. त्यामुळेच या तंत्राचे व्यावहारिक उपयोगही वाढताना दिसणार आहेत. हे एक असे युग आहे, जिथे तंत्रज्ञानाचा वापर सर्व क्षेत्रात वाढत आहे. या युगात आपल्या दैनंदिन जीवनात डिजिटल तंत्रज्ञानाचा वापर मोठ्या प्रमाणावर होत आहे. अनेक व्यवसाय आणि व्यक्ती पूर्णपणे डिजिटल तंत्रावर अवलंबून आहेत. बँकिंग, ई कॉमर्स, सोशल मीडिया, गेमिंग, स्ट्रीमिंग, उद्योगांचे क्लाऊड आधारित ऑपरेशन्स यापैकी बऱ्याच गोष्टी ऑनलाईन अवलंबून आहेत. ‘रोटी, कपडा आणि मकान’ नंतर इंटरनेट आणि डिजिटल उपकरणे या अत्यावश्यक गरजा बनल्या आहेत. अशा परिस्थितीत डिजिटल सेवा ठप्प झाल्यास अनेक प्रकारचा मनस्ताप आणि नुकसान होईल, हे नक्की. असेच काही तरी ऐन दिवाळीत घडले. ‘ॲमेझॉन वेब सर्व्हिस आऊटेज’ हे त्या संकटाचे नाव. आऊटेज म्हणजे सेवा किंवा पुरवठा तात्पुरता खंडित होणे किंवा उपलब्ध नसणे.

२० ऑक्टोबर २०२५ या दिवशी एक मोठी गोष्ट घडली. अमेरिकेतील व्हर्जिनिया भागातील एका मुख्य माहितीगृहात (डेटा सेंटर) अडचण आली. हे माहितीगृह ॲमेझॉन कंपनीच्या जागतिक जाळ्याचे (वेब सेवा) एक मोठे केंद्र आहे. या केंद्रात इंटरनेट पत्त्यांची माहिती देणारी यंत्रणा (प्रणाली) अचानक काम करेनाशी झाली. ही अडचण माहितीचा साठा ठेवणाऱ्या एका मोठ्या व्यवस्थेच्या (डेटाबेस सेवा) संपर्क खुणांपर्यंत पसरली. परिणामी लाखो सॉफ्टवेअर ॲप्स, वेबसाईट्स आणि इंटरनेट जोडणी असलेली साधने (उपकरणे) थांबली आणि त्यांचे कामकाज बंद पडले. सेवा थांबण्याचा हा काळ जवळपास १५ तास चालला. याचा परिणाम एका देशापुरता नव्हता, तर संपूर्ण जगाला जाणवला. धन व्यवहार (बँकिंग), मनोरंजनासाठीचे खेळ, वस्तूंची खरेदी-विक्री आणि सरकारी खात्यांची कामे अशा अनेक महत्त्वाच्या सेवा खोळंबल्या. आपल्या देशातही या आऊटेजचा प्रभाव मोठ्या प्रमाणावर जाणवला. त्यामुळे ई-कॉमर्स कंपन्या आणि ॲमेझॉन, फ्लिपकार्ट, पेटीएम, रेझरपेसारख्या पेमेंट गेटवे प्लॅटफॉर्म्सच्या कामात व्यत्यय आला. बरेच भारतीय स्टार्टअप्स ॲमेझॉन क्लाऊड सेवेवर अवलंबून असल्यामुळे ग्राहक सेवा आणि व्यवहार ठप्प झाले. हा प्रसंग दिवाळीच्या दिवशीच घडल्यामुळे ऑनलाईन खरेदी, स्ट्रीमिंग आणि डिजिटल पेमेंट्सवर मोठा परिणाम झाला. अशा या नेटवर्क आऊटेजची सामान्य कारणे समजून घ्यायला हवीत. यामुळे हार्डवेअर बिघाड रूटर्स, स्विचेस, सर्व्हर किंवा डेटा केबल्समधील दोषांमुळे सेवेत अडथळा येतो. कॉन्फिगरेशन चुका, चुकीचे अपग्रेड्स, फर्मवेअर बग्ज किंवा डीएनएस सेटिंग्जमधील त्रुटी एखाद्या कंपनीची सेवा मोठ्या प्रमाणावर ठप्प करू शकतात. अशा वेळी डिनायल ऑफ सर्व्हिस (डीओएस) हल्ल्यांमुळे नेटवर्क अतिभारित होते आणि अनुपलब्ध बनते. विद्युत पुरवठ्यातील अडथळ्यांमुळे डेटा सेंटरमध्ये यूपीएस किंवा जनरेटर फेल होऊन सेवा बंद पडतात. मानवी त्रुटी, कॉन्फिगरेशन किंवा ऑटोमेशन स्क्रिप्ट्समधील चुकांमुळे मोठ्या प्रमाणावर परिणाम होऊ शकतो. म्हणूनच नेटवर्क आऊटेज टाळण्याच्या काही उपाययोजना महत्त्वाच्या ठरतात. आजच्या काळात इंटरनेट आणि नेटवर्क सेवा आपल्या जीवनाचा अविभाज्य भाग बनल्या आहेत. त्या अचानक थांबणे हा मोठा धोका ठरतो. त्यामुळे आर्थिक नुकसान आणि कामाची प्रचंड हानी होऊ शकते. अशा सेवा थांबण्यापासून बचाव करण्यासाठी काही सोपे उपाय सांगितले जातात. पहिला उपाय म्हणजे दुप्पट व्यवस्था (कंट्रोल्ड रिडंडन्सी) कार्यरत ठेवणे. म्हणजेच प्रत्येक सेवेची दुप्पट व्यवस्था सुनिश्चित करणे. भारतातील कुठल्याही घरी १० पाहुणे जेवायला बोलावले असल्यास गृहिणी २० लोकांचा स्वयंपाक करतात. हे तसेच आहे. दुसरा महत्त्वाचा उपाय म्हणजे नेटवर्क मार्ग कार्यरत असणे. एकाच वेळी दोन किंवा त्याहून अधिक इंटरनेट सेवा पुरवठादारांकडून (आयएसपी) जोडणी घ्यावी. आणिबाणीच्या प्रसंगी त्याचा मोठा फायदा होतो. एका कंपनीची सेवा बंद पडल्यास लगेच दुसऱ्या मार्गाने काम सुरू ठेवता येते. अन्य काही उपाय हार्डवेअर नेटवर्क यंत्रसामग्रीच्या रूपात योजता येतात. सर्व्हर, राऊटर आणि स्विच यासारखी महत्त्वाची यंत्रे अतिरिक्त संख्येने उपलब्ध ठेवावी लागतात. एक यंत्र बिघडल्यास, दुसरे आपोआप काम सुरू करते. याला फेलोवर सेफ्टी व्यवस्था म्हणतात. याच कारणासाठी वाहनात स्टेपनी टायर असतो. म्हणूनच कंपन्यांनी शक्य असल्यास माहिती साठवणारे केंद्र (डेटा सेंटर) एकाच ठिकाणी न ठेवता वेगवेगळ्या ठिकाणी ठेवली पाहिजेत. यामुळे एखाद्या ठिकाणी नैसर्गिक आपत्ती (भूकंप किंवा पूर) आल्यास, दुसऱ्या ठिकाणाहून सेवा सुरू ठेवता येते. येथे नमूद करण्याजोगी आणखी एक बाब म्हणजे सेवा घेताना आपल्या यंत्रणेची नियमित देखरेख आणि तपासणी करणेही गरजेचे आहे. नेटवर्क सेवा अखंड सुरू ठेवण्यासाठी अशी देखरेख अत्यंत आवश्यक असते. यात स्वयंचलित प्रणालींची भूमिका महत्त्वाची असते. नेटवर्कमधील प्रत्येक घटकावर सतत लक्ष ठेवणारी स्वयंचलित साधने वापरावी लागतात. यामुळे मोठी समस्या येण्यापूर्वीच लहान त्रुटी ओळखता येतात आणि लगेच दुरुस्त करता येतात. यंत्रणा अद्ययावत ठेवणेही विशेष गरजेचे ठरते. त्यासाठी यंत्रणेच्या उत्तम वापरासाठी सर्व सॉफ्टवेअर आणि उपकरणे वेळेवर अपडेट केली पाहिजेत. जुन्या तंत्रज्ञानात अनेक त्रुटी असतात, ज्यामुळे सेवा थांबण्याची शक्यता वाढते. म्हणूनच हे पाऊल महत्त्वाचे ठरते. वीज पुरवठा हा असाच एक दखलपात्र मुद्दा. नेटवर्क उपकरणांसाठी अखंड वीजपुरवठा यंत्रणा आणि जनरेटर सेवा उपलब्ध असणे अनिवार्य आहे. विजेच्या अनियमिततेमुळे किंवा सेवेत खंड झाल्यामुळे सेवा थांबणार नाही, याची काळजी घ्यावी लागते.

या टप्प्यावर आणखी काही प्रकारची काळजीही महत्त्वाची ठरते. त्यात सुरक्षितता आणि प्रशिक्षणाचा समावेश होतो. सेवा अखंड सुरू राहावी यासाठी केवळ तांत्रिक उपाय पुरेसे नाहीत; तर मानवी घटक आणि सुरक्षिततेकडेही लक्ष देणे महत्त्वाचे आहे. उदाहरणार्थ सायबर हल्ला संरक्षण. नेटवर्कवर होणारे सायबर हल्ले सेवा बंद पाडू शकतात. यासाठी मजबूत फायरवॉल आणि सुरक्षितता प्रणाली वापरावी लागतात. नेटवर्क चालवणाऱ्या कर्मचाऱ्यांना योग्य प्रशिक्षण देणेही महत्त्वाचे ठरते. त्यांना अडचणी आल्यास काय करायचे, याचे स्पष्ट नियम तयार असावेत. सेवा थांबल्यास काय करायचे, याचे आणिबाणीचे नियोजन प्रत्येक कंपनीकडे तयार असणे महत्त्वाचे ठरते. कर्मचाऱ्यांनी या नियोजनानुसार वेळोवेळी सराव करणे गरजेचे आहे. ताज्या ॲमेझॉन नेटवर्क आऊटेजने हे सिद्ध केले की, डिजिटल अर्थव्यवस्थेत स्थैर्य राखण्यासाठी फक्त एका तंत्रज्ञान पुरवठादारावर अवलंबून राहणे घातक ठरू शकते. भविष्यातील सुरक्षेसाठी कंपन्यांनी विविध क्लाऊड पुरवठादार, डेटा सेंटर क्षेत्रे आणि डीएनएस व्यवस्थापन वापरून स्वतःची डिजिटल संगणक व्यवस्था अधिक सशक्त, सक्षम ठेवणे हेच खरे शहाणपण ठरेल.

(लेखक उद्योजक व संगणक साक्षरता प्रसारक आहेत.)

## वेध

**नीलेश जोशी**

# पाणी समस्येवर तोडगा निघावा

मे महिन्यापासून सुरू असलेला पाऊस दिवाळी आटोपून देखील पाठ सोडायला तयार नाही. यावर्षी सततच्या पावसामुळे शेती आणि शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले. अनेक ठिकाणी तर विदारक परिस्थिती ओढवली. असे असले तरी जलसाठ्यांमध्ये मुबलक असलेले पाणी वर्षभराची चिंता मिटविणारे आहे. पिण्याच्या पाण्यासह सिंचनासाठी उपयोगी असलेले जलसाठे सद्यःस्थितीत तुडुंब आहेत. २५ ऑक्टोबरपर्यंत अकोला जिल्ह्यात ७५१.३ मिमी अर्थात सरासरीच्या तुलनेत १०१.७ टक्के पावसाची नोंद करण्यात आली. पण एकीकडे निसर्गाने इतके मुबलक दान दिल्यावरही दुसरीकडे सर्वसामान्यांची पिण्याच्या पाण्याची समस्या कायमच आहे. अकोला शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या काटेपूर्णा प्रकल्पात १०० टक्के जलसाठा असूनही शहराला चार दिवसाआड तर ग्रामीण भागातील अनेक गावांमध्ये तब्बल १५-२० दिवसांनंतर पाणीपुरवठा करण्यात येत आहे. ऑक्टोबर-नोव्हेंबर महिन्यातील ही परिस्थिती फेब्रुवारीनंतर अधिकच बिकट होते आणि मग साठवलेल्या पाण्याचे ‘मूल्य’ इतके वाढते की, ग्रामीण भागातील अनेक गावांमध्ये घराघरात पिण्याच्या पाण्याच्या टाक्यांना कुलूप देखील लावलेले आढळते. नदीकाठी असणाऱ्या काही गावांमध्ये तर कोरड्या नदी पात्रात खड्डा (झिरा) करून त्यातून मिळालेले पाणी वापरले जाते. ही सर्व परिस्थिती पाहिल्यानंतर दरवर्षी अकोला जिल्ह्यातील पिण्याच्या पाण्याचे हे दुर्भिक्ष संपेल तरी कधी असा प्रश्न उपस्थित होतो आणि अनुत्तरितच राहतो.



माणसाच्या जगण्यासाठीच्या मूलभूत गरजांपैकी पिण्याचे पाणी ही अत्यावश्यक असलेली गरज आहे. केंद्र शासनाच्या निकषांनुसार ग्रामीण भागात पिण्यासाठी आणि घरगुती वापरासाठी प्रति व्यक्ती, प्रति दिवस किमान ४० लिटर पाणी उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. तर शहरी भागात प्रति व्यक्ती, प्रति दिवस १३५ लिटर पाणीपुरवठा करण्यात यावा, असे सुचविण्यात आले आहे. मात्र, हे निकष अकोला जिल्ह्यात अद्याप पूर्ण होत असल्याचे कुठलेच चिन्ह नाही. अकोला जिल्ह्यात बार्शिटाकळी तालुक्यात महान येथे असलेला काटेपूर्णा, तेल्हारा तालुक्यातील वान येथे असलेला हनुमान सागर हे दोन मोठे, तर दगडपारवा, मोर्णा, निर्गुणा, उमा हे मध्यम प्रकल्प आहेत. यासह २४ लघु प्रकल्प देखील आहेत. पण असे असताना देखील पिण्याच्या पाण्याची चणचण नेहमीच भासते आणि म्हणूनच दरवर्षी पाणीटंचाई आराखडा तयार करण्यात येतो. या पाणीटंचाई आराखड्यातील गावांच्या संख्येकडे पाहिल्यास जिल्ह्यात निर्माण होणाऱ्या पाणीटंचाईच्या समस्येची भयावहता समोर येते. गतवर्षीच्या या आराखड्यात जिल्ह्यातील २८७ गावांचा समावेश होता. अकोल्यातील पाणीटंचाईची झळ जानेवारीपासून सुरू होते. म्हणूनच पाणीटंचाई आराखडा देखील दोन टप्प्यांत करण्यात येतो. यात जानेवारी ते मार्च आणि एप्रिल ते जून अशी योजना करण्यात येते. गतवर्षी देखील या टंचाई आराखड्यावर तब्बल ५ कोटी ५३ लाख २२ हजार रुपये खर्च करण्यात आले. अनेक वर्षांपासून शासन हा खर्च करून तात्पुरती मलमपट्टी करण्यात येते. पण पाणीटंचाईच्या समस्येच्या समाधानाकरिता मलमपट्टीची नव्हे तर कायमस्वरूपी उपचाराची गरज आहे आणि ती पूर्ण कधी होईल याची सामान्यजणांना प्रतीक्षा देखील आहे. खरं म्हणजे ही समस्या अकोला जिल्ह्याची तर आहेच. पण अशाच प्रकारच्या समस्येला राज्यातील अनेक तालुके तोंड देत आहेत. पण गत ७० वर्षांत या समस्येच्या सोडवणुकीसाठी गांभीर्याने पुढाकार घेतला गेला नाही. आता ‘वैनगंगा ते नळगंगा’ नदीजोड प्रकल्पाच्या माध्यमातून पिण्याच्या पाण्यासह सिंचनाची समस्या संपावी म्हणून महायुती सराकारने पुढाकार घेतला आहे. ही सकारात्मक बाब आहे. पण दुष्काळी योजनांची तजवीज प्रशासनिक स्तरावर सुरू झाली की, या कामांमध्ये नैपुण्य मिळविलेल्या अनेकांची वर्दळ स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये वाढते आणि मग प्रशासन आणि विशिष्ट काही जण ‘दुष्काळ’ दूर करण्यासाठी कामाला लागतात. सरकारने अशा सर्वांची वेळीच योग्य दखल घ्यावी, एवढेच.

९४२२८६२४८४

## दिल्ली वार्तापत्र

**श्यामकांत जहागीरदार**

# विधानसभा निवडणूक न लढणारे मुख्यमंत्री

बिहार विधानसभा निवडणुकीत महाआघाडीने तेजस्वी यादव यांना आपला मुख्यमंत्रिपदाचा उमेदवार जाहीर केले आहे. रालोआने मात्र अधिकृतपणे आपल्या मुख्यमंत्रिपदाच्या उमेदवाराची घोषणा केली नाही. रालोआ मुख्यमंत्री नितीशकुमार यांच्या नेतृत्वात विधानसभेची निवडणूक लढवत असल्याचे भाजपाने जाहीर केले आहे. पण गंमत म्हणजे नितीशकुमार यावेळीही विधानसभेची निवडणूक लढवत नाही. भाजपाने नितीशकुमार हेच रालोआचे मुख्यमंत्रिपदाचे उमेदवार आहेत, असे स्पष्टपणे म्हटले नाही. जदयुचे नेते मात्र निवडणुकीनंतरही नितीशकुमार हेच मुख्यमंत्री राहतील, असे वारंवार म्हणत आहेत. महाआघाडीतील नेते रालोआने आपला मुख्यमंत्रिपदाचा उमेदवार जाहीर करावा, असे आव्हान देत असताना रालोआचा घटक पक्ष असलेल्या लोजपा रामविलासचे नेते चिराग पासवान यांनी विद्यमान मुख्यमंत्री नितीशकुमार हेच रालोआचे निवडणुकीनंतर मुख्यमंत्री असतील, असे म्हटले आहे. चिराग पासवान यांच्या या विधानाला भाजपाचा पाठिंबा आहे की नाही, ते अद्याप स्पष्ट झाले नाही.

नितीशकुमार गेल्या २० वर्षांपासून म्हणजे तब्बल २००५ पासून जितनराम मांझी यांचा मधल्या काळातील नऊ महिन्यांचा अपवाद वगळता बिहारचे मुख्यमंत्री आहेत. नितीशकुमार यांचा मुख्यमंत्रिपदाचा कार्यकाळ हा जवळपास २० वर्षांचा असला, तरी देशात सर्वाधिक म्हणजे नऊ वेळा मुख्यमंत्रिपदाची शपथ घेत त्यांनी इतिहास घडवला आहे. बिहारचे मुख्यमंत्रिपद सर्वाधिक काळ भूषविणारे राज्याचे पहिले मुख्यमंत्री श्रीकृष्णसिंह यांचा विक्रम नितीशकुमार यांनी मोडला आहे.

खरं म्हणजे नितीशकुमार बिहारमधील कुर्मी या अतिमागास समाजाचे नेते आहेत. बिहारमध्ये कुर्मी फक्त ३ टक्के आहेत. पण आपल्या या ३ टक्के मतांत अन्य अति पिछडा जातीची भर घालत नितीशकुमार बिहारमध्ये गेल्या २० वर्षांपासून सत्तेचा केंद्रबिंदू झाले आहे. राज्यातील कोणत्याच पक्षाला मग तो भाजपा असो की राजद, नितीशकुमार यांचा पाठिंबा घेतल्याशिवाय सत्तेवर येता येत नाही. सत्तेच्या राजकारणासाठी नितीशकुमार यांनी अनेक वेळा कोलांटउड्या मारल्यामुळे त्यांचा उल्लेख पलटूराम असा केला जातो. त्याचा त्यांच्या लोकप्रियतेवर फारसा प्रतिकूल परिणाम झाला नाही. याचे महत्त्वाचे कारण म्हणजे नितीशकुमार यांच्यावर २० वर्षे मुख्यमंत्री असतानाही भ्रष्टाचाराचा तसेच घराणेशाहीचा आरोप कधी झाला नाही. ही नितीशकुमार यांची सर्वांत मोठी उपलब्धी म्हटली पाहिजे. या बाबतीत नितीशकुमार यांची वाटचाल पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासारखी राहिली आहे. गुजरातचे १३ वर्षे मुख्यमंत्री आणि ११ वर्षे देशाचे पंतप्रधान असतानाही मोदी यांच्यावर भ्रष्टाचाराचा एकही आरोप झाला नाही.



मोदींना कुटुंब नाही, मात्र नितीशकुमार यांचे लग्न झाले असताना तसेच त्यांना मोठा मुलगा असताना त्यांनी त्याला आपला वारस म्हणून राजकारणात आणले नाही. लालूप्रसादांनी आणलेल्या जंगलराजमधून नितीशकुमार यांनी बिहारच्या जनतेची सुटका केली, ही त्यांची मुख्यमंत्री म्हणून आणखी एक मोठी उपलब्धी आहे. या आणि आधीच्या दोन उपलब्धींमुळे बिहारच्या जनतेने त्यांच्या वारंवार पक्षाबदलासारख्या काही राजकीय निर्णयांकडे दुर्लक्ष केले, त्यांना माफ केले, असे म्हणावे लागेल. जवळपास २० वर्षे बिहारचे मुख्यमंत्रिपद भूषवत असताना नितीशकुमार यांनी गेल्या ३५ वर्षांत विधानसभेची निवडणूक लढवली नाही. विधान परिषदेचे सदस्य म्हणून ते मुख्यमंत्रिपद भूषवत आहेत. विधानसभा निवडणूक न लढवणे आणि मागल्या दाराने म्हणजे विधान परिषदेतून सत्तेवर येणे ही नितीशकुमार यांची राजकीय कमजोरी मानली जाते. या मुद्यावरून त्यांच्यावर आरोपही होतात. नालंदाच्या हरनौल विधानसभा मतदारसंघातून नितीशकुमार यांनी १९७७ मध्ये पहिल्यांदा विधानसभा निवडणूक लढवली, पण त्यात त्यांचा पराभव झाला. १९८५ मध्ये दुसऱ्यांदा त्यांनी या मतदारसंघातून निवडणूक लढवली आणि जिंकली. त्यानंतर आजपर्यंत नितीशकुमार यांनी एकदाही विधानसभेची निवडणूक लढवली नाही. १९८५ मध्ये त्यांनी लढवलेली विधानसभा निवडणूक ही त्यांची शेवटची विधानसभा निवडणूक होती.

लोकांमधून निवडणूक लढवत जिंकून यायला नितीशकुमार घाबरतात, असे म्हणावे तर त्यांनी आतापर्यंत सहा वेळा लोकसभेच्या निवडणुका लढवल्या आणि जिंकल्याही. १९८९, १९९१, १९९६, १९९८, १९९९ आणि २००४ अशा सलग सहा लोकसभा निवडणुका नितीशकुमार यांनी लढवल्या आणि जिंकल्या.

२००० मध्ये नितीशकुमार यांनी पहिल्यांदा बिहारचे मुख्यमंत्री म्हणून शपथ घेतली, तेव्हा ते कोणत्याही सभागृहाचे सदस्य नव्हते. मात्र, बहुमताअभावी ८ दिवसांतच त्यांना राजीनामा द्यावा लागल्यामुळे पुढचा प्रश्न उद्भवला नाही. नोव्हेंबर २००५ मध्ये नितीशकुमार यांनी दुसऱ्यांदा बिहारचे मुख्यमंत्री म्हणून शपथ घेतली, तेव्हाही ते कोणत्याही सभागृहाचे सदस्य नव्हते. मुख्यमंत्रिपदाची शपथ घेतल्यानंतर सहा महिन्यांच्या आत निवडून यावे लागत असल्यामुळे नितीशकुमार २००६ मध्ये पहिल्यांदा विधान परिषदेवर निवडून आले. विधान परिषदेचा त्यांचा पहिला कार्यकाळ २०१२ मध्ये संपला. २०१० मध्ये पहिल्यांदा नितीशकुमार यांनी आमदार असताना मुख्यमंत्रिपदाची शपथ घेतली. २०१२ मध्ये मुख्यमंत्री असताना दुसऱ्यांदा ते विधान परिषदेवर निवडून आले.

२०१५ मध्ये बिहार विधानसभेची निवडणूक झाली तेव्हा मुख्यमंत्री असलेल्या नितीशकुमार यांनी विधानसभेची निवडणूक लढण्यास नकार दिला. एकाच म्हणजे मी लढवत असलेल्या विधानसभा मतदारसंघात लक्ष केंद्रित करण्याऐवजी संपूर्ण राज्यावर लक्ष केंद्रित करण्यासाठी मी विधानसभा निवडणूक लढवत नसल्याचे त्यांनी सांगितले. २०१८ मध्ये नितीशकुमार यांचा विधान परिषद सदस्य म्हणून दुसरा कार्यकाळ संपला आणि ते तिसऱ्यांदा परिषदेवर निवडून आले. विधान परिषद सदस्य म्हणून त्यांचा तिसरा कार्यकाळ २०२४ मध्ये संपला. २०२४ मध्ये ते चौथ्यांदा विधान परिषदेवर निवडून आले. आता त्यांचा चौथा कार्यकाळ २०३० मध्ये संपत आहे. त्यामुळे यावेळी ते विधानसभेच्या निवडणूक रिंगणात नाही.

जनतेतून निवडणूक लढवायला नितीशकुमार घाबरतात, असा आरोप विरोधक त्यांच्यावर सातत्याने करतात. पण या आरोपाचे ते खंडन करतात. माझ्या मर्जीने विधानसभा निवडणूक न लढवण्याचा निर्णय मी घेतला आहे, ही माझी राजकीय मजबुरी नाही, असे ते म्हणतात. बिहार विधानसभेतील विरोधी पक्षनेते तेजस्वी यादव यांनी नितीशकुमार यांना बिहारमधील कोणत्याही विधानसभा मतदारसंघातून निवडणूक लढवण्याचे आव्हान दिले, त्या मतदारसंघात मी तुमच्याविरुद्ध उभा राहतो, असे आव्हान दिले, पण ते आव्हान नितीशकुमार स्वीकारू शकले नाहीत. देशात सर्वाधिक म्हणजे नऊ वेळा मुख्यमंत्रिपदाची शपथ घेण्याचा विक्रम जसा नितीशकुमार यांच्या नावावर आहे, तसाच विधानसभेची निवडणूक न लढवता २० वर्षे मुख्यमंत्रिपद भूषविण्याचा विक्रमही त्यांच्या नावावर आहे. यावेळी नितीशकुमार मुख्यमंत्री झाले तर १० वेळा मुख्यमंत्रिपदाची शपथ घेण्याचा विक्रम त्यांच्या नावावर नोंदला जाणार आहे.

९८८१७१७८१७

## शून्य पटसंख्या असलेल्या शाळा व शिक्षक

पश्चिम बंगाल आणि तेलंगणा या राज्यात शून्य पटसंख्या असलेल्या शाळांची वृत्तपत्रात आलेली कथा आहे, २०२४-२०२५ मध्ये या शाळांमध्ये एकही ॲडमिशन झालेलं नाही आणि शिक्षक मात्र २०,००० च्या पुढे नियुक्त आहेत. शाळेत मुलं नाहीत, शाळेला शिक्षक आहे, शिक्षकाला पगार आहे अशा पश्चिम बंगालमध्ये ३८१२ शाळा तर तेलंगणामध्ये २२४५ शाळा शून्य पटसंख्येच्या आहेत यावर नक्कीच विचार करावासा वाटतो. महाराष्ट्रात तर बरेचसे जिल्हे शैक्षणिक उच्च स्तरावर आहेत. शक्यतो महाराष्ट्रात बिन पटाची कुठेही शाळा नाही, कुठेही बिन पटाचे शिक्षक नाही, सर्व शाळा उच्च स्तरावर १०० टक्के शिक्षित आहेत, तसेच म्हणजे एक दोन पटसंख्या असलेल्या शाळेमध्ये तेथील शिक्षक शाळेतील पटसंख्या कशी वाढेल हेही पाहत असतात. परंतु पश्चिम बंगाल आणि तेलंगणा सारखी परिस्थिती नक्कीच महाराष्ट्रात नाही ही सर्वांत मोठी गोष्ट आहे.

शाळेत विद्यार्थी नसेल, पटसंख्या नसेल तर तेथे शिक्षक नियुक्त करण्याची गरज आहे का आणि शिक्षक नियुक्त केला तरी त्याने शाळेत पटसंख्या त्याची वाढेल हे पाहायला नको का किंवा त्या त्या जिल्ह्याच्या शिक्षण अधिकाऱ्याने, त्या सरकारने हे पाहणे नक्कीच आवश्यक आहे. पटसंख्या नसलेल्या शाळेच्या शिक्षकांना शासनाकडून लाखो रुपयांचा पगार जातो यामध्ये नक्कीच कुठेतरी काळेबेरे होऊ शकते हे कोणाला सांगायची गरज नाही. नक्कीच अशा शाळांवर केंद्रीय स्तरावरच्या मंत्र्यांनी लक्ष देणे गरजेचे आहे. कारण तेलंगणा आणि पश्चिम बंगाल जर लक्ष देत नसेल तर तेथे लक्ष देणे केंद्र सरकारचे काम आहे.

**शिरीष बने**/९२२४२९९२३०

## वाचक पत्रे

## भेटवस्तूंचा क्षणिक आनंद

नुकतीच दिवाळी होऊन गेली आहे. फराळाचे डबेही रिकामे व्हायला लागले आहेत. त्यामुळे दिवाळीनंतरचे मोठे काम म्हणजे पसारा आवरणे. परत रिकामे झालेले डबे घासून जागेवर ठेवणे, पणत्या, दिव्यांच्या माळा, आकाशदिवा जागेवर ठेवणे इ. सगळे लवकरच आवरते घ्यावे लागले कारण परत पावसाळा असल्याचे भासू लागले आहे. नाहीतर तुळशीच्या लग्नापर्यंत ठेवावे लागते. सगळ्यात प्रश्न असतो तो आलेल्या भेटवस्तूंचा. दिवाळीतील गिफ्टिंग हे एकीकडे आनंद देणारं असतं तर दुसरीकडे पसाऱ्याला आमंत्रण देणारं सुद्धा असतं. उपयोगी वस्तू मिळाली तर बरं वाटतं. परंतु अनेकदा असं होतं की गरजेच्या नसणाऱ्या वस्तू मिळतात आणि त्या देणाऱ्यांची आठवण सुद्धा करून देणाऱ्या असतात. त्यामुळे कधीतरी वापरू म्हणून माळ्यावर किंवा दिवाणाच्या बॉक्समध्ये ठेवल्या जातात किंवा इतर कुणाला दिल्या जातात. नुसतं दिवाळीला असं होतं का ? नाही. हे प्रत्येक सणाला, वाढदिवसाला, घरातील लग्नकार्यात किंवा मोठ्या कार्यक्रमात असं होतं. ज्या घरांमध्ये सुबत्ता नांदत असेल तिथे तर अक्षरशः या सर्वांची गरज नसते. परंतु रीत म्हणून बऱ्याच वेळा भेटवस्तू दिल्या जातात. अशा प्रकारे गिफ्ट आणि रिटर्न गिफ्टचा सिलसिला सुरू राहतो. त्याचा आनंदही भरपूर मिळतो परंतु तो क्षणिक ठरतो. त्यामुळे विचार करूनच भेटवस्तू द्यावी अथवा आर्थिक भेटवस्तू योग्य स्वरूपात देणे कधीही उत्तम.

**स्नेहल खंडागळे**/नागपूर

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com
तसेच **कुठलाही लेख** पाठवायचा असल्यास **९८५०७५३२८१** या व्हॉट्स ॲप क्रमांकावर पाठवावा.

## आजचे संघगीत-२७

गुरुवार, ३० ऑक्टोबर २०२५

### कालगतीहुनि बलवत्तर ही पौरुषशाली मने

कालगतीहुनि बलवत्तर ही पौरुषशाली मने
याच मनांच्या अमित बलावर लाख झुंजवू रणे ॥धृ.॥

शिवशक्तीचे पूजक होउनि वीरव्रत हे अंगिकारुनी
एकच पूजन आम्हा माहिती शिरकमले अर्पिणे ॥१॥

घरि वा दारी वा देशांतरि जे जे खुपते शल्य अंतरी
दूर करू ते सत्वर करुनी भीषण समरांगणे ॥२॥

भरतभूमिचे सुपुत्र आम्ही देह वाहिला तिच्याकारणी
क्षणभरही नच आम्हा साहवे केविलवाणे जिणे ॥३॥

मरणाची ना आम्हा भीती मारित मरणे अमुची रीती
अमृतसुत आम्हीच जाणतो मरणाला मारणे ॥४॥

पराभवाच्या अपमानाच्या खुणा पुसू या आक्रमणाच्या
मातृमंदिरी पुन्हा उभारू विजयाची तोरणे ॥५॥

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्वाचे...



## श्रीनिवास जिल्ला पंतुलू यांचे धार्मिक क्षेत्रातील कार्य विलक्षण

### विविध सामाजिक संघटनांनी केला सत्कार

**सोलापूर, दि. २९ ऑक्टोबर-**

संपूर्ण पद्मशाली समाजाचा एकमेव आंरराष्ट्रीय पुरोहित म्हणून ओळखले जाणारे श्रीनिवास जिल्ला पंतुलू यांनी अत्यंत लहान वयातच धार्मिक क्षेत्रात उल्लेखनीय, विलक्षण कार्य केले आहे. वयाच्या अवघ्या १६ ते १८ वर्षांच्या दरम्यान त्यांनी साऊथ आफ्रिका येथील मोनोरिया देशात 'गीता मंदिरात' दोन वर्षे हिंदू धर्म प्रसार व पौरोहित्य सेवेचे कार्य केले. या काळात त्यांनी ३८५ नागरिकांना हिंदू धर्माची दीक्षा देऊन समाजात मोठे योगदान दिल्याने त्यांचा विविध सामाजिक संघटनांकडून सत्कार करण्यात आला. धर्मप्रसाराबरोबरच श्रीनिवास यांनी दशमा विद्या, यंत्र-तंत्र, मंत्र, पौरोहित्य, धर्मशास्त्र, ज्योतिषशास्त्र आणि अंकशास्त्र यांचा सखोल अभ्यास करून वयाच्या अठराव्या वर्षीच या सर्व विद्यांमध्ये प्रावीण्य संपादन केले आहे. त्यामुळे ते धर्म, शास्त्र आणि अध्यात्म क्षेत्रातील तरुण तेजस्वी व्यक्तिमत्त्व म्हणून ओळखले जातात. जिल्ला पंतुलू परिवाराचा हा पाचव्या पिढीचा वारसा असून, अखिल भारत पद्मशाली पुरोहित संघाचे राष्ट्रीय अध्यक्ष वेणुगोपाल जिल्हा पंतुलू हे श्रीनिवास यांचे सुपुत्र आहेत. सोलापुरात त्यांच्या आगमनानंतर विविध सामाजिक संघटनांच्या वतीने त्यांचा भव्य स्वागत व सत्कार करण्यात आला. या स्वागत सोहळ्यात संभाजी आरमारतर्फे संस्थापक श्रीकांत बापू डांगे, शिवाजी तात्या वाघमोडे, सोलापूर अहिल्यादेवी होळकर विद्यापीठाचे संजय साळुंखे, पद्मशाली समाजाचे शिवराज दासी, सूर्यकांत जिंदम, अमर एक्कलदेवी, राज कांबळे, अविनाश बालयोगी, मोची समाजाचे मोहन जंगम, तसेच नीलगार समाजाचे कालिदास काळपगार, अरविंद जिल्हा, गिरोपा गणपा यांनी सहभाग घेत वाजंत्रीसह स्वागत केले.

# सर्वाधिक कर वसूली करणाऱ्या ग्रामपंचायतींचा सीईओंच्या हस्ते होणार सन्मान

## चार दिवसांत साडेचार कोटी कर वसूली

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २९ ऑक्टोबर-**

मिशन स्वाभिमान कर संकलन मोहीमेअंतर्गत सोलापूर जिल्ह्यातून या अभियानांतर्गत १४ ते १७ ऑक्टोबर या चार दिवसाच्या कालावधीत चार दिवसात चार कोटी ५६ लाख २७ हजार ७७२ रूपयाची कर वसुली झाली आहे. या मोहीमेत सर्वाधिक कर वसुली करणाऱ्या ग्रामपंचायतींचा जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम यांच्या हस्ते सन्मान करण्यात येणार आहे.

ग्रामपंचायतींच्या आर्थिक जिल्हा सबलीकरणासाठी जिल्हा परिषदेमार्फत मिशन स्वाभिमान कर संकलन वसुली कार्यक्रम प्रभावीपणे राबविण्यात येत आहे. या अभियानाचा उद्देश ग्रामपंचायतींच्या स्वनिधीत वाढ करून स्थानिक विकासकामांना गती देणे हा असून जिल्ह्यातील सर्व ग्रामपंचायतींनी या अभियानात उत्साहाने सहभाग घेतला आहे. या अभियानांतर्गत १४ ते १७ ऑक्टोबर या चार दिवसाच्या कालावधीत जिल्ह्यातून जवळपास ४ कोटी ५६ लाखांची घरपट्टी व पाणीपट्टी वसुली करण्यात आली आहे. या कालावधीत उल्लेखनीय कामगिरी करून सर्वाधिक वसुली करणाऱ्या ग्रामपंचायतींना सन्मानित करण्यात येणार आहे. मुख्यमंत्री पंचायत राज समृध्द गाव अभियांनातील कर संकलन हा एक भाग आहे. त्यासाठी तीन हजार पेक्षा जास्त लोकसंख्या असलेल्या गावातील अधिक कर संकलन करणाऱ्या तीन ग्रामपंचाती आणि तीन हजारापेक्षा कमी लोकसंख्या असलेल्या कर संकलन अधिक केलेल्या तीन ग्रामपंचाती अशा जवळपास सहा ग्राम पंचायतीची निवड करण्यात येणार आहे. त्यांचा सन्मान करून त्यांना जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी निवड करण्यात येणार आहे.

> मुख्यमंत्री पंचायत राज समृध्द गाव अभियांनांतर्गत स्वाभिमान कर संकलन मोहिमेस चांगला प्रतिसाद मिळाला आहे. मागील थकीत व चालू करांपैकी ४ कोटी ५६ लाख रूपयांची वसुली झाली आहे. ज्या ग्रामपंचायतीने सर्वाधिक वसुली केली आहे, त्यांना बक्षीस स्वरूपात विकास कामे देण्यात येणार आहे. याबाबत लवकरच घोषणा केली जाणार आहे.
>
> **- सूर्यकांत भुजबळ, उपमुख्य कार्यकारी अधिकारी.**

ही मोहिम मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम यांच्या मार्गदर्शनाखाली, उपमुख्य कार्यकारी अधिकारी सुर्यकांत भुजबळ तसेच सर्व तालुका गटविकास अधिकारी, विस्तार अधिकारी व ग्रामसेवक यांच्या परिश्रमातून हा उपक्रम यशस्वीपणे राबविण्यात आला आहे. करसंकलन मोहीमेत सर्वाधिक सांगोला तालुक्यातून ७६ लाख रुपयांची तर सर्वात कमी दक्षिण सोलापूर तालुक्यातून १२.४५ लाखांची वसुली झाली आहे. अक्कलकोट तालुक्यातून १०.२२ लाख घरपट्टी तर ५.२४ लाख पाणीपट्टी वसूल केली आहे. दक्षिण सोलापूर तालुक्यातून ११ लाख ७३ हजार घरपट्टी, ७१ हजार पाणीपट्टी वसूल केली आहे. उत्तर सोलापूर तालुक्यात १५ लाख ९३ हजार घरपट्टी, ४ लाख ८३ हजार पाणीपट्टी वसूल केली आहे. माळशिरस तालुक्यात घरपट्टी ३२ लाख ८७ हजार, पाणीपट्टी १४ लाख ४० हजार वसूल केली आहे. बार्शी तालुक्यात ३१ लाख ५४ हजार घरपट्टी तर पाणीपट्टी २५ लाख २ हजार वसूल केली आहे. मंगळवेढा तालुक्यात ३४ लाख ४३ हजार घरपट्टी तर १६ लाख ४२ हजार पाणीपट्टी वसूल करण्यात आली.

# ३० फूट खोल बोअरवेलमध्ये पडले श्वानाचे पिल्लू

### तीन तासांच्या परिश्रमानंतर बाहेर काढण्यास आले यश

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २९ ऑक्टोबर-**

विडी घरकुल प्रगती चौक गोविंदराज नगरच्या एका मोकळ्या जागेतील ३० फूट खोल कुपनलिकेत पडलेले दहा पंधरा दिवसाचं श्वानाचे पिल्लू अग्निशमन, ॲनिमल वेल्फेअर पदाधिकाऱ्यांनी तब्बल तीन तास अथक प्रयत्न करत पिलाला जीवदान दिले.

प्रथम दोरीला फोकस लाईट असलेला दिवा आत सोडण्यात आला. अंदाज घेऊन दोरीने, काठीने, लोखंडी सळई, बायडिंग



तार आत टाकून काढण्याचा प्रयत्न झाला, पण पिल्लू पर्यंत पोहोचताच येईना. स्थानिक नागरिकांनी अग्निशामक दलाचे गौतम आव्हाड यांच्याशी संपर्क साधला. तात्काळ घटनास्थळी आपले सहकारी केंद्र अधिकारी रावसाहेब सलगर यांच्यासमवेत पोहोचले. अडकलेल्या पिल्लूला बाहेर काढण्यासाठी प्रयत्न केला. राहत ॲनिमल वेल्फेअर असोसिएशनशी संपर्क साधून त्यांनाही याबाबत माहिती दिली. अग्निशामक दल आणि राहत असोसिएशनचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. नरेश उपरेत, अजित मोटे दोघांनीही एकमेकांच्या सहकार्याने या छोट्या श्वानाच्या पिल्लूला बाहेर काढण्यासाठी शर्थीचे प्रयत्नाला सुरूवात केली.

३० फूट खोल बोअरवेलमध्ये पडलेल्या छोट्या श्वानाच्या पिल्लूला अखेर सुखरूप बाहेर काढण्यात यश मिळाले. यावेळी नागरिकांनी आनंद व्यक्त करत अग्निशामक दल आणि राहतचे आभार मानले. तीन तासांहून अधिक काळ या बोअरवेलमध्ये अडकलेले पिल्लूला काही जखमा झाल्या होत्या. जखमांवर डॉ. नरेश उपरेती आणि ॲनिमल वेल्फेअर असोसिएशनचे सहाय्यक अजित मोटे यांनी औषधोपचार करून त्या पिल्लूला त्यांच्या मातेकडे सोडूले.

या निष्पाप जीवाला वाचविण्यासाठी उमेश गायकवाड, दत्तात्रय वंगा, दत्तात्रय म्याडम, अक्षय चन्नापट्टण, रवि बत्तुल, कृष्णाहरी कस्सा यांनी तब्बल तीन तास प्रयत्न केले. बोअरवेलमधून बाहेर काढल्यानंतर या पिलाला गरम पाण्याने आंघोळ घालण्यात आली, त्याला टॉवेलने स्वच्छ करून दूध, बिस्कीट देत नागरिकांनी एका मुक्या जीवाचे प्राण वाचविले.

# युवा महोत्सवाच्या यशस्वी आयोजनासाठी सर्वांनी प्रयत्न करावेत

## जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २९ ऑक्टोबर-**

युवकांचा सर्वांगीण विकास साधणे, भारतीय संस्कृती व परंपरेचे जतन करणे, युवकांच्या अंगी असलेल्या सुप्त गुणांना वाव देणे तसेच राष्ट्रीय एकात्मता वृद्धिंगत करणे या उद्देशाने युवा कार्यक्रम व क्रीडा मंत्रालय, भारत सरकारतर्फे प्रतिवर्षी राष्ट्रीय युवा महोत्सवाचे आयोजन करण्यात येते. सन २०२५-२६ या वर्षासाठी विकसित भारत चॅलेज ट्रॅक अंतर्गत राष्ट्रीय युवा महोत्सवाचे आयोजन दिनांक १० ते १२ जानेवारी २०२६ या कालावधीत करण्यात येणार आहे. या महोत्सवाच्या यशस्वी आयोजनासाठी आवश्यक असलेला निधी जिल्हा क्रीडा परिषद मधून खर्च करावा व शासनाकडून निधी प्राप्त झाल्यावर क्रीडा परिषदेला निधी वर्ग करावा, अशा सूचना जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी देऊन हा महोत्सव यशस्वी करण्यासाठी सर्वांनी प्रयत्न करावेत, असे सूचित केले.

जिल्हाधिकारी यांच्या दालनात आयोजित जिल्हास्तर युवा महोत्सव आयोजनाच्या अनुषंगाने आढावा बैठकीत जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद मार्गदर्शन करत होते. यावेळी जिल्हा क्रीडा अधिकारी नरेंद्र पवार तसेच अन्य समिती सदस्य उपस्थित होते. युवा महोत्सवाच्या पार्श्वभूमीवर राज्यात जिल्हा, विभाग व राज्यस्तरावर युवा महोत्सवाचे आयोजन करण्यात येणार असून, त्यामध्ये सांस्कृतिक व नवोपक्रम (Cultural and Innovation Track) या दोन प्रमुख मार्गांचा समावेश आहे. जिल्हास्तर व विभागस्तरावरील स्पर्धा दिनांक १५ नोव्हेंबर २०२५ पर्यंत पार पडणार असून, त्यानंतर राज्यस्तरीय स्पर्धा दिनांक १० डिसेंबर २०२५ रोजी आयोजित करण्यात येणार आहेत. विज्ञान प्रदर्शन हे नवोपक्रम ट्रॅक अंतर्गत फक्त राज्यस्तरापर्यंतच मर्यादित राहणार आहे, अशी माहिती जिल्हा क्रीडा अधिकारी नरेंद्र पवार यांनी दिली.

सांस्कृतिक व कौशल्य विकास स्पर्धांमध्ये खालीलप्रमाणे सहभाग निश्चित करण्यात आला आहे: लोकनृत्य (गट) - १०, लोकगीत (गट) - १०, कथालेखन - ०३, चित्रकला - ०२, वक्तृत्व - ०३, कविता लेखन - ३०. केंद्र शासनाने निश्चित केलेल्या नियमावलीनुसार वेळ, सहभाग संख्या व इतर अटी लागू राहतील. लोकनृत्य व लोकगीत गटांमध्ये वाद्यवृंदाची संख्या निर्धारित सहभाग संख्येमध्ये अंतर्भूत राहील. या युवा महोत्सवामध्ये सहभागी होण्यासाठी युवक/युवतींचा वयोगट दिनांक १२ जानेवारी २०२६ रोजी १५ ते २९ वर्षांच्या दरम्यान असणे आवश्यक आहे. जन्मतारीख दर्शविणारे सबळ पुरावे सादर करणे बंधनकारक आहे, असे श्री. पवार यांनी सांगितले. नवोपक्रम ट्रॅक अंतर्गत जिल्हास्तरीय विज्ञान प्रदर्शनासाठी शासनाकडून रुपये ५० हजार रुपये इतके अनुदान मंजूर करण्यात आले आहे, असेही त्यांनी सांगितले.


### जाहिर प्रसिध्दीकरण नावातील दुरुस्तीचे

मी इमाम मंजूर लांडगे वय-५७ वर्ष, व्यवसाय-मजूरी रा. ७०७ महेदी नगर, बार्शी, ता- बार्शी, जि-सोलापूर सत्यप्रतीज्ञेवर निवेदन करतो की, मी वरील ठिकाणचा कायमचा रहिवाशी असून माझे जन्मदाखल्यावर व माझे आधारकार्ड व मतदानकार्डवर इंग्रजी भाषेमध्ये नाव Manjur Landge असे असून माझे नावे पासपोर्ट क्र. एन. ३७२६५०३ वर इंग्रजी भाषेमध्ये नाव Manjur Landage असे लागले आहे. तरी सदर Imam Manjur Landge व Imam Manjur Landage हे दोन्ही नाव माझेच असून ती व्यक्ती मीच आहे. व माझी पत्नी सौ. शाईनबानो इमाम लांडगे हिचा पासपोर्ट क्र. सी ११९६९१२ वर इंग्रजी भाषेमध्ये नाव Shainbano Imam Lange असे आहे. तरी सदर Shaeen Bano Imam Landage व Shainbano Imam Landge ही दोन्ही नावे माझ्या पत्नीचेच आहेत. तसेच माझ्या पासपोर्टवर आईवडीलांचे व आमचे आडनाव Landage असे लागले आहे. परंतू आमचे खरे आडनाव इंग्रजी भाषेमध्ये Landge असे आहे. दोन्ही आडनावे आमच्याच कुटुंबाचीच आहेत. तरी मी पासपोर्ट नुतनीकरण करणेकामी नावातील दुरूस्तीबाबतचे शपथपत्र क्र. ३६२४ दि. २७/१०/२०२५ रोजी तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, बार्शी यांचे समोर केलेले आहे.

वरील संपूर्ण मजकूर हा माझे माहिती व समजूतीप्रमाणे खरा व बरोबर असून त्यासंदर्भात काही कायदेशीर वाद उपस्थित झाल्यास त्यास सर्वस्वी मी जबाबदार राहील. त्या करिता प्रसिध्दीकरण विभाग जबाबदार राहणार नाही.

हे जाहिर प्रसिध्दीकरण दिले असे. दि. ३०/१०/२०२५
शपथपत्र क्र. ३६२४

सही/-
इमाम मंजूर लांडगे
(रा.७०७ महेदी नगर, बार्शी)

### खरेदीपुर्व जाहिर नोटीस

**मिळकतीचे वर्णन**: डि व सब डि सोलापूर पैकी ता. उत्तर सोलापूर पैकी तमाम लोकांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, महानगरपालिकेच्या हद्दीतील देगांव येथील शेतजमीन भूमापन व उपविभाग क्र.३६८/२/अ यांसी क्षेत्र ८० आर यांसी चतु:सिमा :- पुर्वेस:- दिपा लक्ष्मण जाधव, दक्षिणेस :- रोड, पश्चिमेस :- शरद घागडे व उत्तरेस :- अनिल गायकवाड, येणेप्रमाणे चतुः सिमेतील घरजागा यातील सर्व तदंगभूत वस्तुसह व वहिवाटीचे हक्कासह.

वर वर्णन केलेली मिळकत हि सौ. रुपाली शंकर जाधव यांच्या मालकी व कब्जेवहिवाटीची असून, सदर मिळकत ही त्यांनी आमचे अशिल १) सौ. रोहिणी सुनिल धुर्वे व २) श्री. सुनिल तात्या धुर्वे यांना कायम खुषखरेदीने विक्री करण्याचे ठरवून त्याबाबत इसारापोटी रक्कम स्विकारलेली असून, सदर मिळकतीचा प्रत्यक्ष कब्जा सुध्दा आमचे अशिलांचे ताब्यात दिलेला आहे. तसेच सदर मिळकत ही निर्वेध व निजोखमी असल्याची हमी व खात्री त्यांनी आमच्या अशिलांना दिलेली आहे.

तरीही आमचे अशिल या जाहीर नोटीसीने कळवितात की, वर नमूद मिळकत ही आमचे अशिल खरेदी घेण्याच्या तयारीत असून, त्या मिळकतीबाबत कोणाचाही कोणत्याही प्रकारे करार, मदार, साठेखत, दान, गहाण, टाच, लिज, बक्षिस, पोटगी, बोजा, विल्हेवाट, वाटणीपत्र, मृत्यूपत्र अथवा इतर कसल्याही प्रकारे हक्क, हितसंबंध असल्यास अथवा सदर खरेदीस हरकत असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ०७ दिवसांच्या आत खाली नमुद पत्त्यावर येऊन समक्ष भेटून व कागदोपत्री पुराव्यासह लेखी हरकत नोंदवावी, मुदतीत कोणाचीही कसलीही हरकत न आल्यास आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील व मग तद्नंतर कोणाचीही कसलीही हरकत चालणार नाही व तशी हरकत आमचे अशिलांवर व सदर मिळकतीवर बंधनकारक राहणार नाही, याची नोंद घ्यावी.

सबब, कोणाचीही फसगत होऊ नये म्हणून ही जाहीर नोटीस दिली ता.२९/१०/२०२५.

सही/-
ॲड. रेवा निखिल टिकोळे
ऑफिसः लॉयर्स चेंबर नं.१४, जिल्हा व सत्र न्यायालय आवार, सोलापूर.
मोबा. ७४९८११९३२०
अशिलातर्फे ॲडव्होकेट

वकील श्री. बिराजदार

### जाहीर नोटीस

**मे. पनवेल येथील दिवाणी न्यायाधीश (व. स्तर) यांचे न्यायालयात, पनवेल**

नि ९०/५
चौकशी अर्ज क्र. ७०८/२०२५
पुढील ने. ता. २९/११/२०२५

**श्रीमती. रेहाना राजीव राणे -- अर्जदार**

वरील अर्जदार यांचे पती मयत राजीव बाळकृष्ण राणे यांचे निधन दिनांक २२/१०/२०१८ राजवाडी हॉस्पिटल, घाटकोपर पूर्व, मुंबई येथे झाले. मयताच्या नावे असलेली मिळकत खालील प्रमाणे :

**मिळकतीचे वर्णन परिशिष्ट 'अ' -**

१. फ्लॅट क्र. १०२, साकेत धाम, प्लॉट क्र. ४९, सेक्टर १६, कळंबोली, ता. पनवेल, जि. रायगड, नवी मुंबई, क्षेत्रफळ ३०.०५२ चौ. मी., ३.३९७ चौ. मी. टेरेस सह. मुल्यांकन रु. १४,००,०००/- मुल्यांकन रु. ७,००,०००/- (अर्धा हिस्सा)
२ प्लॉट क्र. ४६, जुना गट क्र. १२९७, नवीन गट क्र. १३०३, बार्शी शहर, ता. बार्शी, जि. सोलापूर, क्षेत्रफळ ७९.३० चौ. मी. मुल्यांकन रु. १,५०,०००/- (पूर्ण हिस्सा)
३. (अ) मौजे वेल्हाळे, ता. भुसावळ, जि. जळगाव, सर्वे क्र. ५२ मधील शेतजमीनीचा १/५ हिस्सा, एकूण शेतजमिनीचे क्षेत्रफळ ५.३२.०० हे.आर. एकूण शेतजमिनीचे मुल्यांकन रु. १०,००,०००/- मुल्यांकन रु. २,००,०००/- (१/५ हिस्सा)
(ब) मौजे वेल्हाळे, ता. भुसावळ, जि. जळगाव, सर्वे क्र. १९ मधील शेतजमीनीचा १/५ हिस्सा, एकूण शेतजमिनीचे क्षेत्रफळ २.९१.०० हे.आर. एकूण शेतजमिनीचे मुल्यांकन रु. २,००,०००/- मुल्यांकन रु. ४०,०००/- (१/५ हिस्सा) एकूण मुल्यांकन - रु. १०,९०,०००/-

वरील मिळकती बाबत उक्त अर्जदारांने वारस दाखला मिळणे करिता अर्ज दिला आहे. त्यापेक्षा सदरहू अर्जदार मयताचे वारसदार नव्हे, असे कोणास समजविण्याचे असेल आणि वरील मिळकतीच्या वारस दाखल्या बाबत कोणाचे हक्क, अधिकार अथवा हितसंबंध अशी कोणत्याही प्रकारची तक्रार, हरकत वगैरे असल्यास त्याने तशी लेखी हरकत हा जाहीरनामा झालेपासून ३० दिवसाच्या आत या न्यायालयात हजर होऊन दाखल करावी.

वरील मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदरहू कोर्ट वरील अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेऊन त्यांचा हक्क शाबित दिसल्यास त्याला सदरहू मयताच्या मिळकतीचे वारस म्हणून दाखला देईल व त्यानंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही.

सही/-
सहाय्यक अधीक्षक,
दिवाणी न्यायालय पनवेल,
पनवेल.

### मध्य रेल्वे

**ई-निविदा सूचना**
**कॅसनब बोगींची पीओएच दुरुस्ती**
**खुली निविदा सूचना क्रमांक**
KWV-BOGIE-POH-2-R तारीख: 24.10.2025

कामाचे नाव: सी अँड डब्ल्यू वर्कशॉप कुर्डुवाडी येथे 1 वर्षाच्या कालावधीसाठी सर्व प्रकारच्या वॅगनच्या मालवाहतूक स्टॉकच्या POH CASNUB बोगींची दुरुस्ती करण्याचे काम. अंदाजे किंमत: रु. 65,85,172/- निविदा फॉर्मची किंमत: रु. शून्य ईएमडी: रु. 1,31,700/- पूर्ण कालावधी: 12 महिने. वरील ई-निविदा सादर करण्याची वेळ आणि तारीख 14.11.2025 रोजी दुपारी 2 वाजेपर्यंत असेल. ई-निविदाची संपूर्ण माहिती अधिकृत रेल्वे वेबसाइट :www.ireps.gov.in वर उपलब्ध आहे.

WM/KWV 598

अनाधिकृत रूप से रेल लाइन को पार करना दंडनीय अपराध है

### मध्य रेल्वे

**सोलापूर विभाग**
**निविदा सूचना क्रमांक 28-2025-SrDENS**

विभागीय रेल्वे व्यवस्थापक (काम), मध्य रेल्वे, सोलापूर यांनी राष्ट्रपतींच्या वतीने खालील कामांसाठी नामांकित कंपन्या / कंत्राटदारांकडून ई-निविदा मागवल्या आहेत: कामाचे नाव: ADEN/ KLBG उपविभागांतर्गत विद्यमान प्रकारच्या ट्रस आणि इतरची दुरुस्ती. कामाची अंदाजे किंमत: रु. 1,63,53,005.42. बयाणा रक्कम : रु. 2,31,800/- काम पूर्ण कालावधी : १२ महिने. देखभाल कालावधी : 06 महिने. www.ireps.gov.in वेबसाइटवर कोट केलेल्या निविदा अपलोड करण्याची अंतिम तारीख आणि वेळ: 19/11/2025 दुपारी 3:00 वाजेपर्यंत. www.ireps.gov.in वर निविदा उघडण्याची तारीख आणि वेळ - 19/11/2025 रोजी दुपारी 3:30 वाजता. संभाव्य निविदाधारकांना निविदा बंद होण्याच्या तारखेपूर्वी या निविदेत जारी केलेले कोणतेही बदल / सुधारणेची नोंद घेण्यासाठी वेबसाइटला वारंवार भेट देण्याचा सल्ला देण्यात येत आहे. वेबसाइट: www.ireps.gov.in

DRM (W), सोलापूर 69

अपने जानवरों को रेल लाइन से दूर रखे

### मध्य रेल्वे

**सोलापूर विभाग**
**विद्युत विभाग**
**ई-टेंडर सूचना**

भारताच्या राष्ट्रपतींच्या वतीने आणि त्यांच्या वतीने, मध्य रेल्वे, सोलापूर येथील वरिष्ठ विभागीय विद्युत अभियंता, जनरल, रेल्वे ई-प्रोक्योरमेंट वेबसाइट www.ireps.gov.in वर खालील कामांसाठी प्रतिष्ठित, अनुभवी आणि परवानाधारक विद्युत कंत्राटदारांकडून ऑनलाइन ई-निविदा मागवत आहेत. निविदा क्रमांक SUR/L/T2025/21. कामाचे नाव: विविध कर्मचारी निवासस्थाने, प्रशासकीय कार्यालये/सेवा इमारती; सोलापूर विभागातील स्टेशन इमारती येथे असलेल्या सर्व पारंपारिक सेलिंग पंख्यांना ऊर्जा कार्यक्षम पंख्यांनी बदलण्याच्या संबंधात कामाचा विद्युत सामान्य सेवा भाग. अंदाजे खर्च: रु. 88,78,056.66/- सुरक्षा रक्कम: रु. 1,77,600/- पूर्ण कालावधी: 09 महिने ऑफरची वैधता: ६० दिवस. वेबसाइटवर निविदा बंद करण्याची तारीख आणि वेळ: 21/11/2025 दुपारी 3.00 वाजता. www.ireps.gov.in या वेबसाइटवर ई-पेमेंटद्वारे बोली सुरक्षा खर्चाचा भरणा केला जाईल.

srDEE (G), सोलापूर 70

अपने जानवरों को रेल लाइन से दूर रखे

### मध्य रेल्वे

**सोलापूर विभाग**
**निविदा सूचना**

भारताच्या राष्ट्रपतींच्या वतीने मध्य रेल्वे, सोलापूर येथील विभागीय रेल्वे व्यवस्थापक (काम) यांनी खालील कामांसाठी नामांकित कंपन्या / कंत्राटदारांकडून ई-निविदा मागवल्या आहेत: निविदा सूचना क्रमांक: 26-2025- Sr.DENS. कामाचे नाव: 2025-26 आणि 26-27 या वर्षासाठी सोलापूर विभागातील लहान ट्रॅक मशीन्ससाठी स्पेअर पार्ट्सच्या ओव्हरहॉलिंग, मोठ्या दुरुस्तीसाठी एएमसी करण्यासाठी वार्षिक देखभाल करार. कामाची अंदाजे किंमत: रु. 66,57,432.10 बयाणा रक्कम: रु. 1,33,200/-काम पूर्ण करण्याचा कालावधी: 24 महिने. देखभाल कालावधी: NA www.ireps.gov.in वेबसाइटवर कोट केलेल्या निविदा अपलोड करण्याची अंतिम तारीख आणि वेळ: 11/11/2025 दुपारी 3:00 वाजेपर्यंत. www.ireps.gov.in वर निविदा उघडण्याची तारीख आणि वेळ: 11/11/2025 15:30 वाजता. या निविदेसाठी जारी केलेले कोणतेही बदल / शुद्धिपत्र लक्षात घेण्यासाठी संभाव्य निविदाकारांना निविदा बंद होण्याच्या तारखेपूर्वी वारंवार वेबसाइटला भेट देण्याचा सल्ला दिला जातो. वेबसाइट: www.ireps.gov.in

DRM (W), सोलापूर 68

असुरक्षित तथा अनाधिकृत रूप से रेल लाइन के पास कार्य करना दंडनीय अपराध है

### जाहीर प्रगटन

आमचे आशिल शुभम गंगाधर जाधव, रा. कासारी, ता. बार्शी, जि. सोलापूर यांनी दिलेल्या माहिती व अधिकारत्रावरुन सर्व जनतेस विशेषतः बार्शी तालुक्यातील जनतेस सुचित करण्यात येते की,

अ) मौजे कासारी, ता. बार्शी, जि. सोलापूर येथील गट नं. १६३/२/ब मधील गंगाधर किसन जाधव यांचे नावे असलेले क्षेत्र ०१ हे. ५२ आर. आकार ०० रु. ४४ पैसे ज्याच्या चतुःसिमा पुर्वेस-हणमंत नागनाथ अंबुरे यांची जमीन, पश्चिमेस-शालन सुर्यभान भोरे यांची जमीन, दक्षिणेस-प्रतिक दत्तात्रय जाधव अ.पा.क आज्जी लक्ष्मी किसन जाधव यांची जमीन उत्तरेस-अनिकेत आगंद चव्हाण यांची जमीन, तसेच ब) मौजे कासारी, ता. बार्शी, जि. सोलापूर येथील गट नं. २७९/१ मधील गंगाधर किसन जाधव यांचे नावे असलेले क्षेत्र ०१ हे. ५६ आर आकार ०२ रु. ०० पैसे जयाच्या चतुःसिमा पुर्वेस-सरकारी रस्ता. पश्चिमेस- जगदीश हरीदास वडणे यांची जमीन, दक्षिणेस-दत्तात्रय किसन जाधव यांची जमीन, उत्तरेस- आनंद बाबुराव घाटशिळे यांची शेतजमीन येणेप्रमाणे चतुःसिमेच्या आतील जमीन ही आमचे आशिल यांची वडीलोपार्जीत जमीन मिळकत असून, सदर मिळकतीमध्ये आमचे आशिल यांचा अविभक्त हक्क व हिस्सा आहे.

तरी गंगाधर किसन जाधव हे भोळसर असून, त्यांना लिहीता वाचता येत नाही त्यांना व्यावहारिक ज्ञान नाही ते अशिक्षीत, आडाणी आहेत, त्यांचा गैरफायदा घेवुन, गंगाधर किसन जाधव यांची फसवणुक करुन सदरील मिळकत ही त्यांचे वारसांचे परस्पर बेकायदेशीरपणे हस्तांतरण जसे की, खरेदी, दान, गहाण, कर्ज बोजा तसेच इतर कोणत्याही प्रकारे करु नये तसे केल्यास ते आमचे आशिलावर बंधनकारक राहणार नाही. सदरचे जाहीर प्रगटन हे कुणाचीही फसगत होऊ नये म्हणून प्रसिध्द केले आहे.

सबब ही जाहीर प्रगटन दिली असे. दिनांक :- २८/१०/२०२५.

मार्फत
सही/-
(ॲड. एन.बी. उंबरे)
दिवाणी व फौजदारी न्यायालय, तुळजापूर.
मो. नं. ८४५९७२७९७४

सही/-
जाहीर प्रगटन देणार,
शुभम गंगाधर जाधव

### हदगांव नगरपरिषदहदगांव

ता. हदगाव जि. नांदेड
फोन नं. ०२४६८ ऑफिस २२२४०८
Email id : cohadgaon@gmail.com स्थापना १९५४
ह.न.प.जा.क्र. बा.वि./३४३०/२०२५ दिनांक :२९/१०/२०२५

**ई-निविदा प्रसिद्धीकरण सूचना**
**(वैशिष्ट्य पूर्ण कामासाठी विशेष अनुदान योजना)**

मुख्याधिकारी नगर परिषद हदगाव खालील विकास कामाची निविदा शासनाकडील नोंदणीकृत अनुभवी ठेकेदार अथवा अहर्तापत्र तांत्रिक बी-१ नमुन्यात हिब्बी लिफाफा पद्धतीने स्पर्धात्मक निविदाद्वारे मागविण्यात येत आहे.

| अ. क्र. | कामाचे नाव | कामाची अंदाजित स्वकम | बयाणा रक्कम | सुरक्षा ठेव रक्कम | ठेकेदाराचा वर्ग | कामाचा कालावधी | ई-निविदा फार्म फी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | नगर परिषद हदगाव अंतर्गत प्रभाग क्र. ०४ मधील संभाजी नगर मध्ये सी.सी. रस्ते व नाली बांधकाम करणे. (डुरके यांचे घर ते बेलखेडे यांचे घर ते आझाद चौक पर्यंत सी.सी. रस्ता करणे आणि ज्ञानेश्वर जाधव ते देशमुख ते रायेवर यांच्या घरापर्यंत सी.सी. रस्ता व नाली आणि साहेबराव शिंदे ते वानखेडे यांच्या घरापर्यंत सी.सी. रस्ता व नाली तसेच सागर शिंदे ते महाजन ते झाडे यांच्या घरापर्यंत सी.सी. रस्ता व नाली बांधकाम करणे. | ११९९९०००/- | ११९९९०/- | करार करते वेळी १% बिलातून ८% | वर्ग ४ व त्यावरील | १८० दिवस | ५०००/- |

अटी व शर्तीसह सविस्तर ई-निविदा प्रपत्र महाराष्ट्र शासनाच्या www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर दि ३०.१०.२०२५ ते ०६.११.२०२५ रोजी सायंकाळी १७.०० वाजेपर्यंत उपलब्ध आहे. ऑनलाईन निविदा वरील संकेतस्थळावर दि. ०६.११.२०२५ रोजी सायंकाळी १७.०० वाजेपर्यंत स्वीकारण्यात येतील.

सही/-
मुख्याधिकारी
नगर परिषद हदगाव

सही/-
मा. प्रशासक
नगर परिषद हदगाव

### महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे- ११
**(महाराष्ट्र शासन उपक्रम)**

**कार्यकारी अभियंता, उजनी कालवा विभाग क्रमांक ८. सोलापूर यांचे कार्यालय**
**सिंचन भवन, गुरुमानक चौक, क्लव फॅटीन जवळ, सोलापूर**
**दूरध्वनी क्रमांक - ०२१७-२७३२८५३ ई-मेल** -ucd8.solapur@gmail.com

**ई निविदा सूचना क्रमांक ०७ सन २०२५-२६**

महाराष्ट्र राज्याच्या राज्यपालांच्या वतीने **कार्यकारी अभियंता, उजनी कालवा विभाग क्र. ८, सोलापूर, जलसंपदा विभाग,** महाराष्ट्र शासन हे सक्षम निविदाकारांकडून खालील कामाकरीता ई-निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाइन) निविदा मागवित आहेत. निविदा कागदपत्रे शासनाचे संकेतस्थळ: https://mahatenders.gov.in येथून डाऊनलोड करण्यात यावीत. सविस्तर निविदा सुचना व ई निविदेबाबत सर्व माहिती शासनाच्या संकेतस्थळावर व विभागीय कार्यालयाच्या सुचना फलकावर उपलब्ध आहे.

निविदा स्वीकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार **कार्यकारी अभियंता, उजनी कालवा विभाग क्र. ८, सोलापूर** यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही. सदर निविदा सुचनेमध्ये काही बदल होत असल्यास https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर कळविण्यात येईल.

| अ. क्र. | कामाचे नांव | जिल्हा | निविदेची किमत रु.लक्ष |
|---|---|---|---|
| १ | विश्रामगृहाची दुरूस्तीची कामे, फर्नीचर पुरवठा करणे | सोलापूर | ३१.८८ |
| २ | उजनी हॉल सांस्कृतीक भवन देखभाल दुरूस्तीची कामे. | सोलापूर | १९.५८ |

१. निविदा उपलब्ध कालावधी :- दि. ३०.१०.२०२५ ते दि. ०६.११.२०२५
२. निविदा उघडण्याचा दिनांक :- दि. ०७.११.२०२५ रोजी

जा.क्र. उकावि-८/निविदा/ /२०२५
उजनी कालवा विभाग क्र.८.
सोलापूर.

सही/-
कार्यकारी अभियंता
उजनी कालवा विभाग क्र.८.
सोलापूर

डीजीआयपीआर/नं.५/C३५८४

### हदगांव नगरपरिषदहदगांव

ता. हदगाव जि. नांदेड
फोन नं. ०२४६८ ऑफिस २२२४०८
Email id : cohadgaon@gmail.com स्थापना १९५४
ह.न.प.जा.क्र. बा.वि./३४१४/२०२५ दिनांक :२८/१०/२०२५

**ई-निविदा प्रसिद्धीकरण सूचना**
**(खासदार स्थानिक क्षेत्र विकास कार्यक्रम सन २०२४-२५ योजना)**

मुख्याधिकारी नगर परिषद हदगाव खालील विकास कामाची निविदा शासनाकडील नोंदणीकृत अनुभवी ठेकेदार अथवा अहर्तापत्र तांत्रिक बी-१ नमुन्यात हिब्बी लिफाफा पद्धतीने स्पर्धात्मक निविदाद्वारे मागविण्यात येत आहे.

| अ. क्र. | कामाचे नाव | कामाची अंदाजित स्वकम | बयाणा रक्कम | सुरक्षा ठेव रक्कम | ठेकेदाराचा वर्ग | कामाचा कालावधी | ई-निविदा फार्म फी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | हदगाव नागर परिषद अंतर्गत भोई समाज सांस्कृतिक सभागृह बांधकाम करणे | ९५९०००/- | ९५९०/- | करार करते वेळी १% बिलातून ८% | वर्ग ७ व त्यावरील | १८० दिवस | ५०००/- |

अटी व शर्तीसह सविस्तर ई-निविदा प्रपत्र महाराष्ट्र शासनाच्या www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर दि ३०.१०.२०२५ ते ०६.११.२०२५ रोजी सायंकाळी १७.०० वाजेपर्यंत उपलब्ध आहे. ऑनलाईन निविदा वरील संकेतस्थळावर दि. ०६.११.२०२५ रोजी सायंकाळी १७.०० वाजेपर्यंत स्वीकारण्यात येतील.

सही/-
मुख्याधिकारी
नगर परिषद हदगाव

सही/-
मा. प्रशासक
नगर परिषद हदगाव

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्त्वाचे

### कनिष्ठ हॉकी विश्वचषकात पाकिस्तानच्या जागी ओमान

**लुसाने** : आगामी २८ नोव्हेंबर ते १० डिसेंबर दरम्यान चेन्नई आणि मदुराई येथे होणाऱ्या कनिष्ठ पुरुष हॉकी विश्वचषक स्पर्धेतून पाकिस्तानने माघार घेतल्यामुळे आता पाकिस्तानच्या जागी स्पर्धेसाठी ओमानची निवड करण्यात आली आहे, अशी माहिती आंतरराष्ट्रीय हॉकी महासंघाने (एफआयएच) बुधवारी दिली. गत वर्षी आशिया कनिष्ठ चषक स्पर्धेत त्यांच्या संघाने या स्पर्धेसाठी पात्रता मिळवल्यानंतर, पाकिस्तान हॉकी महासंघाने आंतरराष्ट्रीय हॉकी महासंघाला (एफआयएच) आगामी एफआयएच कनिष्ठ पुरुष विश्वचषक तमिळनाडू २०२५ स्पर्धेत सहभागी होण्याचे आमंत्रण स्वीकारले नसल्याचे सूचित केल्यानंतर, ओमानचा कनिष्ठ पुरुष संघ आता २८ नोव्हेंबर ते १० डिसेंबर २०२५ दरम्यान भारतातील चेन्नई व मदुराई या शहरांमध्ये होणाऱ्या या स्पर्धेसाठी सहभागी संघांच्या यादीत सामील होईल, असे एफआयएचने एका निवेदनात म्हटले आहे.

### भारताने अतिरिक्त गोलंदाजासह उतरावे : बिशप

**नवी दिल्ली** : गुरुवारी महिला एकदिवसीय विश्वचषक उपांत्य सामन्यात यजमान भारताने बलाढ्य ऑस्ट्रेलियन संघाविरुद्ध एका अतिरिक्त गोलंदाजासह मैदानात उतरावे, असे मत वेस्ट इंडीजचे माजी वेगवान गोलंदाज इयान बिशप यांनी व्यक्त केले. गुरुवारी नवी मुंबईत दुसऱ्या उपांत्य सामन्यात भारत आणि ऑस्ट्रेलिया आमनेसामने येतील. पाच फलंदाज, एक यष्टिरक्षक आणि पाच गोलंदाज - त्यापैकी तीन अष्टपैलू खेळाडू - यांचे संयोजन या विश्वचषक चक्रातील बहुतेक काळात भारताचे विश्वासार्ह मॉडेल राहिले आहे, परंतु दक्षिण आफ्रिका, ऑस्ट्रेलिया आणि इंग्लंडविरुद्धच्या साखळी फेरीच्या सामन्यातील पराभवात त्याच्या मर्यादा निर्दयपणे उघड झाल्या. परिणामी, न्यूझीलंडविरुद्धच्या त्यांच्या विजयी सामन्यात भारताला वेगवान गोलंदाजी अष्टपैलू अमनजोत कौरच्या जागी विशेषज्ञ वेगवान गोलंदाज रेणुका ठाकूरला खेळवावे लागले. भारताकडे अतिरिक्त गोलंदाजीची मजबुती असावी आणि फलंदाजांना जबाबदारी घेण्याची संधी मिळावी अशी माझी इच्छा आहे, असे ते म्हणाले.

### न्यूझीलंडचा इंग्लंडवर ५ गडी राखून विजय

**हॅमिल्टन** : येथे बुधवारी खेळल्या गेलेल्या दुसऱ्या टी-२० आंतरराष्ट्रीय क्रिकेट सामन्यात न्यूझीलंडने इंग्लंडवर १०१ चेंडू शिल्लक ठेवत ५ गड्यांनी दणदणीत विजय नोंदविला. या विजयाबरोबरच न्यूझीलंडने पाच सामन्यांच्या टी-२० मालिकेत २-० अशी आघाडी घेतली. इंग्लंडची फलंदाजांची अव्वल फळी सपशेल अपयशी ठरल्यामुळे त्यांचा डाव केवळ ३६ षटकांत १७५ धावांवरच संपुष्टात आला आणि न्यूझीलंडने ३३.१ षटकांत ५ गडी गमावित लक्ष्य गाठले. डॅरिल मिशेलने नाबाद ५६ आणि रचिन रवींद्रने ५४ धावा केल्या. मिच सॅण्टनरने नाबाद ३४ धावा केल्या. शनिवारी मालिकेच्या पहिल्या सामन्यात इंग्लंड २२३ धावांवर गुंडाळल्यानंतर मिशेलने नाबाद ७८ धावा करून न्यूझीलंडला चार गड्यांनी विजय मिळवून दिला. इंग्लंडसाठी एक सकारात्मक कामगिरी म्हणजे वेगवान गोलंदाज जोफ्रा आर्चरचे पुनरागमन आहे. आर्चरने वेगाने गोलंदाजी केली आणि १० षटकांत २३ धावांत ३ बळी टिपले.

# भारत अ विरुद्ध दक्षिण आफ्रिका अ सामना आजपासून

### पंतवर लक्ष केंद्रित, सुदर्शनला कामगिरी सुधारण्याची संधी



ऋषभ पंत



बी. साई सुदर्शन



झुबेर हमझा

◆ **बंगळुरू, २९ ऑक्टोबर**

गुरुवारपासून येथे भारत अ विरुद्ध दक्षिण आफ्रिका अ संघादरम्यान चार दिवसीय क्रिकेट सामना खेळला जाणार आहे. दुखापतीतून तंदुरुस्त होऊन तीन महिन्यांनंतर स्पर्धात्मक क्रिकेटमध्ये पुनरागमन करीत असलेल्या ऋषभ पंतच्या कामगिरीकडे लक्ष केंद्रित आहे, तर बी. साई सुदर्शनला आपल्या कामगिरी सुधारण्याची संधी आहे.

२३ जुलै रोजी इंग्लंडविरुद्धच्या चौथ्या कसोटी सामन्यादरम्यान पंतच्या पायाला दुखापत झाली होती व तो तेव्हापासून पुनर्वसन मार्गावर आहे. पंत या काळात वेस्ट इंडीजविरुद्धच्या घरच्या कसोटी मालिकेला मुकला होता, परंतु बीसीसीआय सीओई मैदानावर झालेल्या या दोन चार दिवसीय सामन्यांमध्ये तो भारत अ संघाचे नेतृत्व करणार आहे. त्यामुळे त्याला विश्वविजेत्या दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या घरच्या कसोटी मालिकेपूर्वी आपल्या कामगिरीत सुधारणा करण्याची उत्तम संधी मिळेल.

२८ वर्षीय ऋषभ पंत हा वेस्ट इंडीजविरुद्ध उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या ध्रुव जुरेलची जागा घेऊ शकतो. तो दक्षिण आफ्रिकेविरुद्ध यष्टिरक्षक फलंदाज म्हणून खेळेल.

आता, सीओईमध्ये सराव करत असलेला पंत सामन्याच्या परिस्थितीत मैदानावर काही दर्जेदार वेळ घालवण्यास उत्सुक असेल. ऑफस्पिनर प्रेनेलन सुब्रायनसह दक्षिण आफ्रिका अ संघाचे गोलंदाज पंतला अडचणीत टाकण्याचा प्रयत्न करतील. त्याचप्रमाणे तो यष्टिरक्षक म्हणून पुन्हा फॉर्मात येण्यास उत्सुक असेल. सारांश जैन, मानव सुतार व हर्ष दुबेसारखे सक्षम भारत अ फिरकी गोलंदाज त्याला चांगली साथ देतील.

#### सुदर्शनला संधी

साई सुदर्शनचा शेवटचा सामना या महिन्याच्या सुरुवातीला दिल्लीत वेस्ट इंडीजविरुद्धच्या दुसऱ्या कसोटीत होता. या दोन अ सामन्यांमुळे दक्षिण आफ्रिका मालिकेपूर्वी त्याला आपल्या कामगिरीत सुधारणा करण्याची संधी मिळेल.

तामिळनाडूच्या या फलंदाजाने सध्या तिसऱ्या क्रमांकावर स्थान मिळवले आहे असे दिसते, पण लवकरच त्याच्या नावावर मोठी धावसंख्या उभारण्याची त्याला नक्कीच इच्छा असेल.

२४ वर्षीय साई सुदर्शनने आपल्या प्रतिभेची झलक दाखवली असली तरी, त्याच्याकडे नऊ डावांमध्ये केवळ दोन अर्धशतके आहेत. हा डावखुरा फलंदाज दक्षिण आफ्रिका अ विरुद्धच्या सामन्यांचा वापर आपल्या खेळाला आणखी चमक देण्यासाठी करण्यास उत्सुक असेल.

या दोन खेळाडूंशिवाय भारत अ संघात खलील अहमद, अंशुल कम्बोज, देवदत्त पडिक्कल, नारायण जगदीसन इत्यादी आशावादी खेळाडूंचा समावेश आहे. देवदत्त व जगदीशन दोघेही वेस्ट इंडीजविरुद्धच्या मालिकेसाठी भारतीय संघात होते. आता वरिष्ठ संघात स्थान मिळविण्याच्या शर्यतीत स्वतःला टिकवून ठेवण्यासाठी येथे फलदायी कामगिरीवर लक्ष केंद्रित करतील.

खलील व कम्बोज सारख्या वेगवान गोलंदाजांकडेही त्यांच्यासमोर तात्काळ सुरुवातीची संधी नाही, परंतु येथे चांगली उपस्थिती त्यांना निवडकर्त्यांच्या रडारवर ठेवेल. दक्षिण आफ्रिकेच्या दृष्टिकोनातून ते झुबेर हमझाच्या कामगिरीवर लक्ष ठेवतील. त्याला जवळजवळ दोन वर्षांच्या अंतरानंतर कसोटी संघात परत बोलावण्यात आले आहे. झुबेर हमझा गत काही काळात चांगल्या स्थितीत आहे, त्याने गत सहा प्रथम श्रेणी सामन्यांमध्ये दोन शतके आणि दोन अर्धशतके झळकावली आहेत. ◀(वृत्तसंस्था)

#### प्रतिस्पर्धी संघ असे

**भारत अ** : ऋषभ पंत (कर्णधार, यष्टिरक्षक), आयुष म्हात्रे, एन. जगदीसन (यष्टिरक्षक), बी. साई सुदर्शन (उपकर्णधार), देवदत्त पडिक्कल, रजत पाटीदार, हर्ष दुबे, तनुष कोटियन, मानव सुतार, खलील अहमद, गुरनूर ब्रार, अंशुल कम्बोज, यश ठाकूर, यश ठाकूर, आयुष बदोनी व सारांश जैन.

**दक्षिण आफ्रिका अ** : मार्क्स अकरमन, टेम्बा बावुमा, (केवळ दुसऱ्या चार दिवसीय सामन्यासाठी), ओकुहले सेले, झुबेर हमझा, जॉर्डन हरमन, रुबिन हरमन, रिवाल्डो मूनसामी, त्शेपो मोरेकी, मिहलाली म्पॉन्गवाना, लेसेगो सेनोकवाने, प्रिनेलन सुब्रेन, काइल ट्रामीन, काइल सिमंडवा, टी. व्हॅन वुरेन, कोडी युसूफ.

# पावसामुळे पहिला टी-२० सामना रद्द

◆ **कॅनबेरा, २९ ऑक्टोबर**

कॅनबेरा येथे भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्यातील टी-२० मालिकेतील पहिल्या सामन्यात पावसाने व्यत्यय आणला. या पहिल्या सामन्यात केवळ ९.४ षटकांचा खेळ शक्य झाला. पावसामुळे अखेर सामना रद्द करण्यापूर्वी भारतीय संघाचा कर्णधार सूर्यकुमार यादवला सूर गवसला.

कॅनबेरा येथे झालेल्या पावसामुळे ऑस्ट्रेलिया व भारत यांच्यातील पाच सामन्यांच्या मालिकेतील पहिला टी-२० सामना वाया गेला. कर्णधार सूर्यकुमार यादवचा लक्षवेधी खेळही वाया गेला. या वर्षीच्या सुरुवातीला आयपीएलमध्ये त्याने दाखवलेला फॉर्म पुन्हा जागृत करू लागला होता.

ऑस्ट्रेलियाचा कर्णधार मिचेल मार्शने नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करण्याचा निर्णय घेतला. अभिषेक शर्मा (१९) व शुभमन गिलने ३५ धावांची सलामी भागीदारी करून भारताच्या डावाची सुरुवात केली. पुढे सूर्यकुमार यादव व गिलने १० व्या षटकांत भारताला १ बाद ९७ धावांपर्यंत पोहोचवले होते. या सामन्यात आधीच १८ षटकांचा खेळ थांबवण्यात आला होता. मुसळधार पाऊस सुरू होण्याच्या काही क्षण आधी, सूर्यकुमारने नॅथन एलिसच्या दुसऱ्या षटकात दोन चौकार आणि एक षट्कार मारला. त्याला १८ धावांवर जीवनदान मिळाले होते जेव्हा जोश फिलिप मिड-ऑनवरून धावण्याची कठीण संधी मिळवू शकला नाही आणि त्याच्या शेवटच्या १५ टी-२० डावांमध्ये तो दुसऱ्यांदा २० धावा देऊ शकला.



पावसाच्या हजेरीमुळे तंबूत परतताना सूर्यकुमार यादव व शुभमन गिल

पावसामुळे खेळ थांबविण्यात आला व सामना रद्द करण्यात आला, तेव्हा भारताने ९.४ षटकांत १ बाद ९७ धावांची नोंद केली होती, त्यावेळी शुभमन गिल नाबाद ३७ धावांवर, तर सूर्यकुमार नाबाद ३९ धावांवर खेळ होते. सूर्यकुमारने २४ चेंडूंत ३ चौकार व २ षट्कारांच्या मदतीने नाबाद ३९ धावांची खेळी केली. गिलने चार चौकार व एक षट्कार हाणला. ◀(वृत्तसंस्था)

### कार्लसनला आघाडी, डी. गुकेश घसरला

**सेंट लुईस** : क्लच चेस चॅम्पियन्स स्पर्धेत विद्यमान विश्वविजेता गुकेश डोम्माराजूला कठीण दिवसाचा सामना करावा लागला. तो एकही विजय न मिळवता गुणतालिकेच्या तळाशी घसरला, तर मॅग्नस कार्लसनने दुसऱ्या दिवशी चार विजय आणि दोन पराभवांसह आघाडी घेतली. एकमेव आघाडीने दिवसाची सुरुवात करणाऱ्या गुकेशला कार्लसनविरुद्ध दोन पराभवांना सामोरे जावे लागले. त्यानंतर, त्याने हिकारू नाकामुराविरुद्ध पहिला सामना अनिर्णीत राखला. मी आपल्या खेळावर खूश नव्हतो व आज तो फक्त तीक्ष्ण होऊ शकला नाही. मी खूप वेळ घेत होतो, जो मला करायला नको होते. ते घडले, असे गुकेश म्हणाला. कार्लसनने या स्पर्धेतील पहिला सामना कारुआनाविरुद्ध गमावला.

### नितीश कुमार रेड्डीच्या मानेला दुखापत

◆ **कॅनबेरा, २९ ऑक्टोबर**

अष्टपैलू नितीश कुमार रेड्डी याच्या मानेला दुखापत झाली असून त्याला ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या पाच सामन्यांच्या टी-२० मालिकेतील पहिल्या तीन टी-२० सामन्यांमधून बाहेर काढण्यात आले आहे, असे बीसीसीआयने बुधवारी सांगितले.

क्वाड्रिसेप्सच्या दुखापतीमुळे सिडनी येथे झालेल्या ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या तिसऱ्या एकदिवसीय सामन्यातून बाहेर पडलेल्या रेड्डीला आता एक नवीन दुखापत झाली आहे.

पहिल्या तीन टी-२० सामन्यांसाठी नितीश कुमार रेड्डीला बाहेर काढण्यात आले आहे. ॲडलेडमधील दुसऱ्या एकदिवसीय सामन्यादरम्यान झालेल्या डाव्या क्वाड्रिसेप्सच्या दुखापतीतून बरे होणाऱ्या या अष्टपैलू खेळाडूने मानेला दुखापत झाल्याची तक्रार केली होती, त्यामुळे त्याच्या पुनर्प्राप्ती व हालचालींवर परिणाम झाला आहे. बीसीसीआयची वैद्यकीय चमू त्याच्या प्रकृतीवर लक्ष ठेवून आहे, असे बीसीसीआयने म्हटले आहे. २२ वर्षीय खेळाडू गत एका वर्षात विविध दुखापतींमुळे वेळोवेळी मैदानाबाहेर होता. ◀(वृत्तसंस्था)

# लक्ष्य सेन दुसऱ्या फेरीत

### हायलो ओपन बॅडमिंटन

### श्रीकांत पहिल्याच फेरीत पराभव

◆ **सारब्रुकेन (जर्मनी), २९ ऑक्टोबर**

भारताचा स्टार बॅडमिंटनपटू लक्ष्य सेनने बुधवारी येथे झालेल्या ४७५,००० अमेरिकन डॉलर्सच्या हायलो ओपन सुपर ५०० बॅडमिंटन स्पर्धेत पाचव्या मानांकित क्रिस्टो पोपोव्हला सरळ गेममध्ये पराभूत करून पुरुष एकेरीच्या उप-उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश केला.

२०२१ च्या जागतिक अजिंक्यपद स्पर्धेत कांस्यपदक विजेता लक्ष्यने पहिल्या फेरीत उच्च मानांकित पोपोव्हला २१-१६, २२-२० असे पराभूत केले. लक्ष्यचा पुढील सामना देशबांधव एस. शंकर मुथुस्वामी सुब्रमण्यमशी होईल. मुथुस्वामीने पहिल्या फेरीच्या सामन्यात मलेशियाच्या जुन हाओ लिओंगला २१-१४, १८-२१, २१-१६ असे पराभूत केले.

तथापि, किदाम्बी श्रीकांतचे आव्हान संपुष्टात आले. त्याला पुरुष एकेरीत त्याच्याच देशाच्या किरण जॉर्जकडून १९-२१, ११-२१ असा पराभव पत्करावा लागला. जॉर्जचा पुढील सामना फ्रान्सच्या आठ मानांकित टोमा ज्युनियर पोपोव्हशी होईल.



टोमाने इंग्लंडच्या हॅरी हुआंगचा २१-१७, १९-२१, २१-१९ असा पराभव केला.

महिला एकेरीतही काही उत्साहवर्धक निकाल मिळाले. बिगरमानांकित श्रीयांशी वॅलिशेट्टीने डेन्मार्कच्या तिसऱ्या मानांकित लाइन होजमार्क कजार्सफेल्डचा केवळ ३३ मिनिटांत २१-१९, २१-१२ असा पराभव केला.

तरुण रक्षिता संतोष रामराजनेही स्पेनच्या क्लारा अझुरमेंडीवर २१-१४, २१-१६ असा विजय मिळवत १६ व्या फेरीत प्रवेश केला. वॅलिशेट्टी आणि रामराज दुसऱ्या फेरीत अखिल भारतीय सामन्यात एकमेकांविरुद्ध उभे ठाकतील.

तथापि, अनमोल खरबला महिला एकेरीच्या पहिल्या फेरीच्या सामन्यात डेन्मार्कच्या आठव्या मानांकित ज्युली डावल जेकोबसेनविरुद्ध २४-२६, २१-२३ असा पराभव पत्करावा लागला. ◀(वृत्तसंस्था)

# अनाहतचा गतविजेत्या टिन गिलिसला पराभवाचा धक्का

◆ **टोरंटो, २९ ऑक्टोबर**

भारताची १७ वर्षीय उदयोन्मुख स्टार स्क्वॅशपटू अनाहत सिंगने गतविजेती व द्वितीय मानांकित बेल्जियमची टिन गिलिसला पराभवाचा धक्का देत कॅनेडियन महिला ओपन स्क्वॅश स्पर्धेच्या उपांत्य फेरीत धडक मारली.

३६ मिनिटे चाललेल्या उपांत्यपूर्व सामन्यात बिगरमानांकित अनाहतने आपल्या सातव्या विश्वमानांकित प्रतिस्पर्धीविरुद्ध ३-० (१२-१०, ११-९, ११-९) असा विजय मिळवला. अनाहत भारतीय खेळाडू सध्या जगात ४३ व्या क्रमांकावर आहे.

अनाहतचा तिच्या कारकिर्दीतील सर्वात मोठा आणि अव्वल-१० खेळाडूविरुद्धचा हा पहिला विजय होता.



ती या स्पर्धेत जबरदस्त फॉर्ममध्ये आहे. पीएसए टूर रौप्य पातळीवरील स्पर्धेत तिने उप-उपांत्यपूर्व सामन्यात जागतिक क्रमवारीत २० व्या क्रमांकावर असलेल्या फ्रान्सच्या मेलिसा अल्वेसलाही हरवले आहे. उपांत्य फेरीत तिचा सामना जागतिक क्रमवारीत १० व्या व चौथ्या मानांकित इंग्लंडची गिना केनेडीशी होईल.

मी खूप उत्साहित आहे व टिन गिलिस अव्वल १० मध्ये आहे. अव्वल १० मधील खेळाडूला हरवण्याची ही माझी पहिलीच वेळ आहे, असे अनाहत म्हणाली.

''या आठवड्यात मी ज्या पद्धतीने खेळत आहे त्यावर मी खूप आनंदी आहे. मी आज माझ्या प्रशिक्षकांशी संवाद साधला, तेव्हा त्यांनी सांगितले की जर मी काल खेळल्याप्रमाणे आजसुद्धा खेळली तर मी कोणाविरुद्धही विजय नोंदवू शकेल. मी केवळ अशी मानसिकता घेऊन आली होती की मी केवळ माझा सर्वोत्तम स्क्वॅश खेळण्यासाठी आली आहे व शेवटी त्याचे मला फळ मिळाले.'' ◀(वृत्तसंस्था)

### पुणेरी पलटन, दबंग दिल्ली अंतिम फेरीत

◆ **नवी दिल्ली, २९ ऑक्टोबर**

येथील त्यागराज इनडोअर स्टेडियममध्येखेळल्या गेलेल्या दुसऱ्या क्वॉलिफायर सामन्यात पुणेरी पलटनने तेलुगू टायटन्सवर ५०-४५ असा विजय नोंदवून अंतिम फेरीत धडक मारली. आता विजेतेपदासाठी ३१ ऑक्टोबर रोजी दबंग दिल्ली आणि पुणेरी पलटन यांच्यादरम्यान अंतिम सामना खेळला जाणार आहे. क्वॉलिफायर-१ सामन्यात दिल्लीने पुणेरी पलटनवर विजय नोंदवून अंतिम फेरीत धडक मारली.

# भारत-ऑस्ट्रेलिया उपांत्य सामना आज

### आयसीसी महिला वन-डे क्रिकेट विश्वचषक

◆ **नवी मुंबई, २९ ऑक्टोबर**

आयसीसी महिला एकदिवसीय विश्वचषक क्रिकेट स्पर्धेत गुरुवारी नवी मुंबईतील डॉ. डीवाय पाटील क्रीडा अकादमीच्या मैदानावर भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्यादरम्यान दुसरा उपांत्य सामना खेळला जाणार आहे. स्पर्धेच्या अंतिम फेरीत स्थान मिळविण्यासाठी भारतीय महिला संघाला गतविजेत्या ऑस्ट्रेलियाविरुद्ध आपली सर्व शक्तीपणाला लावावी लागणार आहेत. जर नियोजित दिवशी खेळ शक्य झाला नाही, तर आयसीसी प्लेइंग कंडिशनमध्ये शुक्रवारी राखीव दिवसाची उपलब्धता नमूद केली आहे.

ऑस्ट्रेलियाचा संघ गुणतालिकेत अव्वल स्थानावर असूनही, त्यांना सर्वात मोठी चिंता ही आहे की, कर्णधार एलिसा हिली या अत्यंत महत्त्वाच्या सामन्यात मैदानात उतरण्यासाठी उपलब्ध असेल का. तथापि, मंगळवारी सराव सत्रादरम्यान तिने बरे होण्याची सकारात्मक चिन्हे दर्शविली, त्यामुळे ती कदाचित बरी झाली असेल असे सूचित होते. अंतिम फेरीत रिक्त स्थानासाठी दावेदार होण्यासाठी हिली आपल्या आदर्श प्लेइंग कॉम्बिनेशनसह मैदानावर उतरू इच्छित असेल.

#### आजचा उपांत्य सामना

**भारत वि. ऑस्ट्रेलिया**
**स्थळ** : डी. वाय. पाटील स्पोर्ट्स अकादमी स्टेडियम, नवी मुंबई
**वेळ** : दुपारी ३.०० वाजतापासून
**थेट प्रसारण** : स्टार स्पोर्ट्सवर

दुसरीकडे, भारत उपांत्य फेरीत पोहोचणारा चौथा व शेवटचा संघ होता. सलामीवीर प्रतीका रावलच्या घोट्याला दुखापत झाल्यानंतर शेफाली वर्माचे संघात स्वागत करण्यात आले आहे. प्रतीका रावल आता उर्वरित सामन्यातून बाहेर झाली आहे. शेफाली उपकर्णधार व स्टार फलंदाज स्मृती मंधानासोबत सलामीला उतरेल. सध्या फलंदाजी संघ स्थिर दिसत असला तरी, गुरुवारी कर्णधार हरमनप्रीत कौर कोणत्या प्रकारच्या गोलंदाजी संयोजनाची निवड करते हे बघणे मनोरंजक ठरेल.

नवी मुंबईतील डॉ. डी. वाय. पाटील क्रीडा संकुलाचे मैदान गत काही वर्षांत महिला क्रिकेटसाठी एक प्रतिष्ठित ठिकाण झाले आहे. तथापि, चालू विश्वचषक या मैदानावर एकदिवसीय पदार्पण करणारा ठरला. आतापर्यंत येथे खेळल्या गेलेल्या तीन सामन्यांपैकी भारत महिला आणि बांगलादेश महिला यांच्यातील एक सामना पावसामुळे रद्द झाला होता, तर उर्वरित दोन्ही सामने प्रथम फलंदाजी करणाऱ्या संघांनी जिंकले होते. तथापि, दुसऱ्या उपांत्य फेरीच्या दिवशीही पावसाची शक्यता आहे आणि हे लक्षात घेऊन, नाणेफेक जिंकणाऱ्या संघासाठी पाठलाग करण्याचा निर्णय घेणे फायदेशीर ठरू शकते.



सराव सत्रादरम्यान स्मृती मंधाना व शेफाली वर्मा

**ऑस्ट्रेलिया महिला:** एलिसा हिली (कर्णधार आणि यष्टिरक्षक), फोबी लिचफिल्ड, एलिस पेरी, बेथ मूनी, ॲनाबेल सदरलँड, ॲशले गार्डनर, ताहलिया मॅकग्रा, जॉर्जिया वेअरहॅम, अलाना किंग, किम गार्थ, मेगन शट

**भारतीय महिला संघ** : शेफाली वर्मा, स्मृती मानधना, जेमिमा रॉड्रिग्ज, हरमनप्रीत कौर (कर्णधार), हरलीन देओल, रिचा घोष (यष्टिरक्षक), दीप्ती शर्मा, अमनजोत कौर, स्नेह राणा, रेणुका सिंग ठाकूर, एनएस श्री चरणी. ◀(वृत्तसंस्था)

# फुटबॉल विश्वचषकासाठी सौदी अरब बांधणार जगातील पहिले स्काय स्टेडियम

◆ **दुबई, २९ ऑक्टोबर**

२०३४ मध्ये सौदी अरेबिया फिफा विश्वचषक आयोजित करणार आहे. त्याआधी देश जगातील पहिले स्काय स्टेडियम बांधण्याची तयारी करत आहे. निओम असे स्टेडियमला नाव देण्यात आले आहे. हे जमिनीपासून ३५० मीटर (१,१५० फूट) उंचीवर असेल. त्यात एका वेळी ४६,००० लोक खेळाचा आनंद घेऊ शकतील. स्मार्ट सिटी असलेल्या निओममधील द लाईन प्रकल्पात हे स्टेडियम बांधले जाणार आहे.

या प्रकल्पाची किंमत अंदाजे १ अब्ज अमेरिकन डॉलर्स इतकी आहे. २०२७ मध्ये बांधकाम सुरू होऊन २०३२ मध्ये पूर्ण होणार आहे. विश्वचषकाच्या दोन वर्षे आधी हे स्टेडियम बांधून पूर्ण होईल. हे स्टेडियम पूर्णपणे सौर आणि पवन ऊर्जेसारख्या अक्षय्य ऊर्जा स्रोतांवर चालेल. हे अशा प्रकारचे पहिले स्टेडियम असेल, जे पूर्णपणे पर्यावरणपूरक असेल. निओम स्काय स्टेडियममध्ये विश्वचषकाच्या गट टप्प्यातील, ३२ फेरीतील, १६ फेरीतील आणि क्वार्टर फायनलमधील सामने होतील. स्टेडियमच्या संकल्पनेचा व्हिडिओ सोशल



मीडियावर व्हायरल झाला आहे, ज्यामुळे फुटबॉल चाहते खूप उत्साहित झाले आहेत.

#### बांधकामातील आव्हाने कोणती आहेत?

अभियंत्यांसाठी हा प्रकल्प अत्यंत आव्हानात्मक आहे, कारण इतक्या उंचीवर स्टेडियम बांधणे सोपे नाही. निओम प्रकल्पाचे काही भाग उभारायला आधीच उशीर झाला आहे, परंतु अधिकाऱ्यांचे म्हणणे आहे की विश्वचषकाशी संबंधित सर्व कामे वेळेवर पूर्ण होतील.

कन्स्ट्रक्शन रिव्ह्यू मॅगझिन आणि सौदी गीगा प्रोजेक्ट्सच्या अहवालानुसार, हे स्टेडियम शाश्वत साहित्य वापरून बांधले जाईल आणि त्यात कूलिंग सिस्टम, स्मार्ट लाइटिंग आणि डिजिटल फॅन अनुभव यासारख्या आधुनिक सुविधा असतील. विश्वचषकानंतर, हे स्टेडियम निओम प्रदेशातील एका व्यावसायिक फुटबॉल क्लबचे होम ग्राउंड बनेल. ते संगीत मैफिली आणि इतर कार्यक्रमांसाठी देखील वापरले जाईल. फिफाने निओम स्टेडियमला क्रीडा पायाभूत सुविधांसाठी एक नवीन मानक म्हणून वर्णन केले आहे. संपूर्ण प्रकल्प २०४५ पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन आहे, परंतु स्टेडियमचा भाग २०३२ मध्ये तयार होईल. सौदी अरेबिया रियादमध्ये किंग सलमान आंतरराष्ट्रीय स्टेडियम देखील बांधत आहेत, ज्याची क्षमता ९२७६० प्रेक्षकांची असेल आणि ते २०२९ पर्यंत पूर्ण होण्याची अपेक्षा आहे. ◀(वृत्तसंस्था)

# रोहित शर्मा प्रथमच फलंदाजी क्रमवारीत अव्वल

◆ **दुबई, २९ ऑक्टोबर**

भारतीय क्रिकेट संघाचा माजी कर्णधार रोहित शर्माने बुधवारी आपल्या प्रतिष्ठित कारकिर्दीत पहिल्यांदाच आयसीसी पुरुषांच्या एकदिवसीय फलंदाजांच्या क्रमवारीत अव्वल स्थान पटकावले.

३८ वर्षीय रोहितने सिडनी येथे भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्यातील तिसऱ्या व शेवटच्या एकदिवसीय सामन्यात आपल्या शानदार नाबाद शतकाच्या (नाबाद १२१) जोरावर दोन स्थानांची प्रगती करत इतिहास रचला. त्याने आपल्या संघाला नऊ गड्यांनी शानदार विजय मिळवून दिला.

अनुभवी उजव्या हाताचा फलंदाज भारताचा दिग्गज विराट कोहली (नाबाद ७४) सोबत जबरदस्त फॉर्मात होता. त्याने आपल्या देशासाठी



३३ वे एकदिवसीय शतक झळकावण्याच्या मार्गावर १३ चौकार आणि तीन उत्तुंग षट्कार ठोकले.

या प्रयत्नांमुळे रोहितने अफगाणिस्तानचा धडाकेबाज इब्राहिम झद्रान व भारताचा सहकारी शुभमन गिलला मागे टाकले व पहिल्यांदाच एकदिवसीय क्रिकेटमध्ये फलंदाजांच्या क्रमवारीत अव्वल स्थान मिळविले. गत दशकात बहुतेक वेळा तो नेहमीच अव्वल १० मध्ये स्थान राखत होता.

या आठवड्यात सुधारित क्रमवारीत स्थान मिळवणारा माजी कर्णधार हा एकमेव भारतीय खेळाडू नव्हता, तर सिडनीमध्ये झालेल्या दमदार खेळामुळे फिरकी गोलंदाज अक्षर पटेलला गोलंदाजी आणि अष्टपैलू खेळाडूंच्या श्रेणीत सुधारणा झाली आहे. एकदिवसीय गोलंदाजांच्या यादीत पहिल्या क्रमांकावर असलेल्या रशीद खानच्या मागे अक्षर सहा स्थानांनी झेप घेऊन ३१ व्या स्थानावर पोहोचला आहे आणि एकदिवसीय अष्टपैलू खेळाडूंच्या क्रमवारीत अझमतुल्लाह उमरझाईच्या मागे एकूण आठव्या स्थानावर पोहोचला आहे. एकदिवसीय गोलंदाजांच्या यादीत अव्वल १० मध्ये न्यूझीलंडचा फिरकी गोलंदाज मिचेल सॅण्टनर (तीन स्थानांनी चौथ्या स्थानावर) आणि ऑस्ट्रेलियाचा वेगवान गोलंदाज जोश हेझलवूड (दोन स्थानांनी पुढे) यांनी झेप घेतली आहे. ◀(वृत्तसंस्था)

CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्वाचे...



## सभासद हेच संस्थेचे खरे मालक : आ. सुभाष देशमुख

**अक्कलकोट दि. २९ ऑक्टोबर**

लोकमंगलने आर्थिक शिस्त आणि सभासदांच्या हिताचा विचार केल्यामुळेच संस्थेची प्रगती झपाट्याने झाले आहे. सभासद हेच संस्थेचे खरे मालक असून ते जर जागृत असतील तर कोणत्याही संस्थेला धोका निर्माण होणार नाही. म्हणून सभासद मालकांनी नेहमीच लोकमंगल बँक व पतसंस्थेच्या संपर्कात राहून अडचणी समस्याचे निराकरण करावे, असे आवाहन लोकमंगल परिवाराचे संस्थापक माजी सहकार मंत्री आमदार सुभाष देशमुख यांनी केले. लोकमंगल परिवाराच्यावतीने अक्कलकोट येथील सर्जेराव जाधव सभागृहात दिवाळी फराळाचे आयोजन आणि स्नेह मेळावा मोठ्या जल्लोष्यात साजरी करण्यात आला. प्रारंभी श्री स्वामी समर्थांच्या प्रतिमेचे पूजन करून मेळाव्याचा शुभारंभ करण्यात आला. यावेळी लोकमंगल पतसंस्थेचे चेअरमन गुरण्णा तेली यांनी स्वागत आणि प्रास्ताविक केले संस्थेच्या आर्थिक प्रगतीचा आढावा घेतला.याप्रसंगी बोलताना आमदार सुभाष देशमुख म्हणाले लोकमंगल बँक आणि लोकमंगल पतसंस्थेच्या माध्यमातून अनेक विविध योजनांना अर्थ पुरवठा केला जातोय या माध्यमातून अनेकांनी आपले उद्योगधंदे आणि रोजगार निर्मिती केली आहे. लोकमंगल्ये महिलांच्यासाठी अनेक आर्थिक योजना सुरू केल्या आहेत याचा लाभ घेऊन महिला आर्थिक दृष्ट्या आत्मनिर्भर बनल्यास समाज देखील संपन्न होऊ शकतो. याप्रसंगी ज्येष्ठ नेते सिद्धेश्वर कल्याण शेट्टी यांनी प्रविण शहा यांच्या निवासस्थानी आमदार सुभाष देशमुख यांची सदिच्छा भेट घेतली आणि राजकारणा पलिकडचे ऋणानुबंध जपले. याप्रसंगी बँक आणि पतसंस्थेच्या अनेक सभासदांनी आपले मनोगत व्यक्त केले आणि संस्थेच्या कार्याविषयी समाधान व्यक्त केले. या कार्यक्रमाला प्रवीण शहा शिवशरण जोजन, शिवशरण वाले, दयानंद बिडवे, ,सुभाष गडसिंग,निलप्पा घोडके,अतुल जाधव ओम प्रकाश तळेकर बाळासाहेब कलशेट्टी श्रीमती मल्लम्मा पसारे, सौ. सुवर्णा साखरे,सौ.वर्षा चव्हाण, ॲड.श्रीमती बाके श्रीकांत सोमवंशी, शाखाधिकारी सविता लोकापुरे, स्वप्ना कदम, सिंदलिंग लालशेरी, सागर शिंदे सूत्रसंचलन सतिश लोंढे यांनी केले.

## नगरसेवक सोमेश यावलकर यांच्या वाढदिनी सांगोल्यात जनकल्याणकारी उपक्रम

**सांगोला,दि.२९ ऑक्टोबर -**



माजी आ.शहाजीबापू पाटील यांचे विश्वासू सहकारी माजी नगरसेवक सोमेश यावलकर यांच्या वाढदिवसानिमित्त सांगोला शहरातील महिला व पुरुष यांच्यासाठी शुक्रवार दि.३१ ऑक्टोबर ते रविवार दि.२ नोव्हेंबर दरम्यान स.१० ते संध्या.६ या वेळेत रेशन धान्य दुकान शेजारी, वज्राबाद पेठ, सांगोला येथे विविध शासकीय सेवा मोफत उपलब्ध करून देण्याची योजना त्यांच्या मित्रपरिवाराच्या वतीने आयोजित करण्यात आली आहे. या उपक्रमांतर्गत आयुष्मान भारत कार्ड, लाडकी बहीण ई-केवायसी कागदपत्रे, आधारकार्ड दुरुस्ती तसेच नवीन आधारकार्ड काढणे या महत्त्वाच्या सेवा नागरिकांना एका ठिकाणी सुलभपणे मिळणार आहेत.आयुष्मान भारत कार्डसाठी ७० वर्षांवरील वृद्धांना रेशनकार्ड व आधारकार्डच्या आधारे कार्ड मिळणार आहे. लाडकी बहीण योजनेसाठी लाभार्थ्यांनी स्वतःचा आधारकार्ड, आधार लिंक असलेला मोबाईल क्रमांक तसेच वडिलांचे आधारकार्ड किंवा विवाहित महिलांनी पतीचे आधारकार्ड सादर करणे आवश्यक आहे. तसेच आधारकार्ड दुरुस्तीसाठी मतदान कार्ड, डोमिसाइल किंवा मॅरेज सर्टिफिकेट आवश्यक राहणार आहे. नवीन आधारकार्ड बनविण्यासाठी ५ वर्षांतील जन्मदाखला तसेच पालकांचे आधारकार्ड आवश्यक आहे. तरी नागरिकांनी आवश्यक कागदपत्रांसह वेळेत हजेरी लावून या उपक्रमाचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांकडून व सोमेश यावलकर यांचेकडून करण्यात आले आहे.



## सुस्ते येथील श्री दत्त विद्या मंदिर प्रशालेत माजी विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा संपन्न

**सुस्ते दि.२९ ऑक्टोंबर-**

श्री दादासाहेब सोमदळे शिक्षण प्रसारक मंडळ, पंढरपूर संचलित पंढरपूर तालुक्यातील सुस्ते येथील श्री दत्त विद्या मंदिर व कनिष्ठ महाविद्यालयात सन २००६-२००७ या शैक्षणिक वर्षातील माजी विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा तब्बल १८ वर्षांनंतर मोठ्या उत्साहात संपन्न झाला. बालपणीच्या गोड आठवणींना उजाळा देत त्यांनी शाळेच्या ऋणातून मुक्त होण्याचा प्रयत्न म्हणून शाळेला प्रिंटर आणि संगणक सेट भेट दिला आहे. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी श्री दत्त विद्या मंदिर व कनिष्ठ महाविद्यालयाचे विद्यमान प्राचार्य अविनाश कटकधोंड होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. गणेश चव्हाण यांनी केले.आपल्या प्रस्तावनेत चव्हाण सरांनी मार्गदर्शन करणाऱ्या शिक्षकांविषयी आठवणी सांगून साउथ कोरियातील स्वतःचे अनुभव सांगितले. विद्यार्थी मनोगतामध्ये असिस्टंट प्रोफेसर राजेंद्र गायकवाड सरांनी स्वतःचे अनुभव सांगितले. याचबरोबर विद्यार्थी संतोष बोबडे यांनी स्वतःचे अनुभव व्यक्त केले. प्रशालेचे प्राचार्य कटकधोंड यांनी उद्योजक संतोष बोबडे यांचा विशेष सत्कार केला. तसेच मेजर गणेश चव्हाण यांनी दूरध्वनीवरून माजी विद्यार्थी मेळाव्यास शुभेच्छा दिल्या. सूत्रसंचालन राजेंद्र गायकवाड तर आभार सुकुमार वाघमोडे यांनी मानले. मेळावा यशस्वी करण्यासाठी नितीन लोखंडे, संतोष बोबडे, डॉ गणेश चव्हाण, धीरज पाटील, मोहसीन तांबोळी, आदम मुलाणी, प्रिती घाडगे, शुभांगी पाटील, ललिता करपे या सर्व माजी विद्यार्थ्यांनी परिश्रम घेतले.

## राजू जाधव यांचे निधन



**श्रीपूर, दि. २९ ऑक्टोबर-**

श्रीपूर येथील राजू (मामा ) शिवाजी जाधव (वय-६४) यांचे हृदयविकाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, नात असा परिवार आहे. कर्मयोगी सुधाकरपंत पांडुरंग सहकारी साखर कारखान्याचे माळशिरस तालुका राष्ट्रीय साखर कामगार संघटनेचे प्रतिनिधी अनंत जाधव यांचे ते थोरले बंधू होत.

# वडगाव-शिर्पनहळ्ळीच्या सरपंच दुसऱ्यांदा अपात्र

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर दि.२९ ऑक्टोबर**

ग्रामपंचायतीचा कर थकविल्याप्रकरणी दक्षिण सोलापूर तालुक्यातील वडगाव-शिर्पनहळ्ळी येथील ग्रुप ग्रामपंचायतीच्या महिला सरपंच रुपाली प्रशांत लोहार व सदस्या रेणुका काशीनाथ बिराजदार यांना आपल्या पदावर पाणी सोडावे लागणार आहे. जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी दोघींनाही दणका देत सरपंच व सदस्यत्व रद्द केले आहे.

विशेष म्हणजे सरपंच रुपाली लोहार यांना दुर्सयांदा अपात्र ठरविले आहे. यापूर्वीही ठेकेदारांची बिले अडविल्याप्रकरणी लोहार यांचे सरपंचपद विभागीय आयुक्तांनी रद्द ठरविले होते. या कारवाईला त्यांनी उच्च न्यायालयात आव्हान दिले असून हे प्रकरण प्रलंबित आहे. आता सरपंचपदाची मुदत संपायला साडेतीन महिने शिल्लक असताना दुर्सयांदा पद गमावण्याची नामुष्की लोहार यांच्यावर ओढवली आहे.

केवळ १४ हजार ९३१ रुपयाचा कर थकविल्याने सरपंच लोहार यांचे सदस्यत्व व सरपंचपद तर २ हजार ९५४ रुपयाचा कर थकीत राहिल्याने सदस्या रेणुका बिराजदार यांचेही सदस्यत्व रद्द करण्याचे आदेश जिल्हाधिकार्यांनी दिले आहेत.

याप्रकरणी सिध्दाराम नागनाथ दिंडुरे यांनी सरपंच रुपाली लोहार व सदस्या रेणुका बिराजदार यांची पदे रद्द करण्याची मागणी जिल्हाधिकारी आशीर्वाद यांच्याकडे केली होती. याप्रकरणी पहिली सुनावणी २१ फेब्रुवारी २०२३ तर अंतिम सुनावणी १४ ऑक्टोबर २०२५ रोजी झाली. दोन्ही बाजुंच्या वकिलांनी युक्तिवाद केल्यानंतर जिल्हाधिकार्यांनी सरपंच लोहार व सदस्या बिराजदार यांची पदे रद्द केली. जिल्हाधिकार्यांच्या या निर्णयाने कर थकविर्णाया व अतिक्रमण करर्णाया ग्रामपंचायत सदस्य व आगामी निवडणुकीसाठी इच्छुक असलेल्यांमध्ये एकच खळबळ उडाली आहे. यात सिध्दाराम दिंडुरे यांच्यातर्फे ॲड. लक्ष्मिकांत गवई तर अपात्र ठरलेल्या सरपंच लोहार व सदस्या बिराजदार यांच्यातर्फे ॲड. शरद पाटील यांनी काम पाहिले. यापूर्वीही सरपंच लोहार या गावात राहत नसल्याने विकासकामे ठप्प झाली होती तसेच विकासकामे केलेल्या ठेकेदारांची बिले न काढता त्यांची अडवणूक केली जात असल्याची तक्रार उपसरपंच सिध्दाराम बिराजदार यांनी केली होती. त्यावरुन त्यांचे सरपंचपद रद्द झाले होते. हे प्रकरण आता उच्च न्यायालयात प्रलंबित आहे.



## अंदेवाडी येथे हेब्बाळ नदीत बुडाला तरुण; शोध सुरूच

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि.२९ ऑक्टोबर**

तालुक्यातील अंदेवाडी बु व अंदेवाडी खु या दोन्ही गावाच्या दरम्यान असलेला हेब्बाळ ओढा मध्ये प्रशांत गेनसिद्ध चाबुकस्वार अंदाजे वय १२ हे पाण्याचा अंदाज न आल्याने आज दुपारी पाण्यातून वाहून गेला. अद्याप शोध कार्य सुरूच आहे. तालुक्यातील अंदेवाडी बु व अंदेवाडी खु या दोन्ही गावांमध्ये असलेला हेब्बाळ ओढा वरून बुधवारी २९ रोजी दुपारी पलीकडचे गावात त्यांच्या मामाच्या जेवणाचे डबा देऊन येताना पाण्याच्या अंदाजा न आल्यामुळे वाहून गेलेले आहे. या बाबत शोध कार्य सुरू आहे.

## श्री सद्गुरू प्रभाकर स्वामी महाराज भक्तांचा आज रक्तदान महायज्ञ

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर दि.२९ ऑक्टोबर**

सोलापूरातील रक्त तुटवड्यामुळे रुग्णांना कमतरता भासू नये यासाठी श्री सद्गुरू प्रभाकर स्वामी महाराज भक्तांतर्फे गुरुवारी सम्राट चौकातील मंदिरात सकाळी ९ ते दुपारी २ यावेळेत रक्तदान शिबिर होणार असल्याचे मंदिर ट्रस्टचे प्रमुख विश्वस्त मोहन बोड्डू यांनी सांगितले.

शहरात सध्या रक्ताचा तीव्र तुटवडा आहे. रुग्णांना वेळेवर रक्तपुरवठा होत नसल्याने अनेकांच्या जीवाला धोका निमर्िण झाला आहे. त्यामुळे स्वामी महाराज भक्तांनी रक्तदान महायज्ञाचे आयोजन केले आहे. यासाठी डॉ. हेडगेवार रक्तपेढीचे सहकार्य लाभणार आहे. या पवित्र उपक्रमात सहभागी होताना प्रत्येक भक्ताने श्री महाराजांचे दर्शन घेऊन त्यांनी प्रदान केलेला गुरुमंत्र जपत रक्तदान करावे, असे आवाहन आयोजक चीफ ट्रस्टी बोड्डू यांनी केले आहे. हा उपक्रम केवळ रक्तदानापुरता मर्यादित नसून, श्री महाराजांच्या भक्तीमार्गातील एक महत्त्वपूर्ण पाऊल आहे, ज्यामुळे समाजसेवेचा व भक्तीचा संगम साधला जाईल. सोलापूरकरांनी या श्रेष्ठ रक्तदान महायज्ञात सहभागी व्हावे आणि अधिक माहितीसाठी मंदिराचे व्यवस्थापक निरंजन दंतकाळे यांच्याशी ८९९९७३९७८९ या भ्रमणध्वनीवर संपर्क साधावा असे आवाहन ट्रस्टी उदय वैद्य यांनी केले आहे.

## बुक्कानुरे यांची प्रकृती खालावली; रुग्णालयातही उपोषण

### आज शेतकरी करणार रस्ता रोको आंदोलन

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. २९ ऑक्टोबर-**

गेल्या सहा दिवसापासून शेतकऱ्यांच्या विविध १४ मागण्यांबाबत आमरण उपोषणास बसलेले शिवसेना ठाकरे गटाचे तालुका प्रमुख आनंद बुक्कानुरे यांची प्रकृती खालवल्याने प्रशासनाकडून सरकारी दवाखान्यात दाखल करण्यात आले मात्र बुक्कानुरे यांनी कोणतेही उपचार न घेता आमरण उपोषण आंदोलन सुरूच ठेवण्याचा निर्धार केल्याने आंदोलन चिघळण्याची शक्यता आहे.



> गुरूवारी सकाळी ११ वाजता तालुक्यातील तमाम शेतकरी बंधूंच्या वतीने एम एस बी बायपास चौक जवळ सोलापूर हायवेवर रस्ता रोको आंदोलन करण्यात येणार आहे.

या आंदोलनाकडे शासन स्तरवरुन दुर्लक्ष होत असल्याने तालुक्यातील अनेक शेतकरी ग्रामीण रुग्णालयात भेट देऊन जाहीर पाठिंबा देत आहेत. तालुक्यातील अवैध व्यवसाय बंद करावे. शासनाच्या हमीभावाप्रमाणे शासनाने कृषी उत्पन्न बाजार समितीमार्फत खरेदी करावी. अतिवृष्टीमुळे व पुरपरिस्थितीमुळे शेतक-यांना कमीत कमी हेक्टरी ५० हजार रुपये पीक विमा रक्कम मिळावा. याबाबत शासन गांभीर्य दाखवत नसल्याने शेतकऱ्यांमध्ये प्रचंड संताप आहे.

## कार्तिकीमुळे पंढरपूर शहरात मांस, मटण विक्रीस मनाई

**बतभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर दि.२९ ऑक्टोबर**

कार्तिकी एकादशी २ नोव्हेंबर रोजी असून, कार्तिकी यात्रा कालावधी दि.२२ ऑक्टोबर ते ५ नोव्हेंबर आहे.

या यात्रा कालावधीत शहरात श्री विठ्ठल रुक्मिणी दर्शनासाठी मोठ्या प्रमाणात भाविक येतात. या वारी कालावधीमध्ये दि. ३० ऑक्टोबर ते ३ नोव्हेंबर २०२५ या कालावधीत पंढरपूर शहरातील मांस, मटण, मासे विक्री व प्राणी कत्तल तसेच मांसजन्य पदार्थ विक्री करणे यावर बंदी घालण्यात आल्याचे आदेश उपविभागीय दंडाधिकारी सचिन इथापे यांनी निर्गमित केले आहेत.

भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १६३ अन्वये प्रदान करण्यात आलेल्या शक्तीचा वापर करुन उपविभागीय दंडाधिकारी श्री.इथापे यांनी ऑक्टोबर ते ३ नोव्हेंबर २०२५ या कालावधीत पंढरपूर शहरातील मांस, मटण, मासे विक्री व प्राणी कत्तल तसेच मांसजन्य पदार्थ विक्री करणे यावर घालण्यात आली आहे.

## बार्शीत कॉलेज ऑफ एज्युकेशनच्या माजी विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि.२९ ऑक्टोबर**

येथील श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ संचलित कॉलेज ऑफ एज्युकेशनच्या १९९८-९९ या सुवर्ण बॅचचा 'माजी विद्यार्थी स्नेह मेळावा' उत्साहात पार पडला. 'आमचा प्रवास आमचे अनुभव' या शीर्षकाखाली आयोजित या मेळाव्यात, माजी विद्यार्थ्यांनी आपल्या स्मृतींचा मागोवा घेत, जीवनातील कर्तृत्वाचे अनुभव कथन केले.



अध्यक्षस्थानी प्र.प्राचार्य डॉ. विष्णु शिखरे होते. यावेळी प्रा. एम. डी. मोहिते, प्रा. एम. ए. गायकवाड, प्रा. डॉ. व्ही. यू. पवार, प्रा. डॉ. एस. डी. भिलेगांवकर, डॉ ए.जी.कांबळे, डॉ एम. एस. डिसले, डॉ. पी. ए. पाटील, डॉ पंकज नरळे उपस्थित होते. किरण चव्हाण यांनी प्रास्ताविक केले. अनेक विद्यार्थ्यांनी त्यांच्या महाविद्यालयीन जीवनातील आठवणींना उजाळा दिला. 'आमचा प्रवास' त्यांनी अतिशय बोलक्या शब्दांत मांडला. प्रा. मोहिते आणि प्रा. गायकवाड यांनी विद्यार्थ्यांच्या प्रगतीचा गौरव केला. माजी प्राचार्य डॉ. व्ही. यू. पवार, प्रा. डॉ. एस.डी. भिलेगावकर आणि डॉ ए.जी. कांबळे यांनी पुढील वाटचालीस प्रेरणा दिली. प्र.प्राचार्य डॉ. शिखरे यांनी समारोपात माजी विद्यार्थ्यांचे योगदान हेच महाविद्यालयाचे खरे वैभव असल्याचे सांगितले. प्रा. मंगेश कांबळे यांनी सूत्रसंचालन केले. वैशाली तांबीले यांनी आभार मानले. या सोहळ्याला समन्वयक डॉ. एम. एस. डिसले, माजी विद्यार्थी असोसिएशनचे समन्वयक डॉ. ए. जी.कांबळे, डॉ. परमेश्वर पाटील, डॉ. पंकज नरळे आणि शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. लखन डिकुळे, संदेश घाडगे, किरण चव्हाण, राजकुमार कुलकर्णी, मंगेश कांबळे, वैशाली तांबिले आदी माजी विद्यार्थ्यांनी परिश्रम घेतले.

## चितेला भडाग्री द्यायला मुलगाच कशाला पाहिजे !

**कौडगाव येथे जन्मदात्या पित्याच्या अंतिम संस्कारानंतर, पंच्चाहत्तरी ओलांडलेल्या पाटलीण मावशीने दिलेल्या उपयुक्त सल्लूयामुळे पाच लेकीने टाहो फोडून आक्रोश करत बसण्यापेक्षा तब्बल आठ दिवस काळ्या आईची मशागत करुन वाहीली आगळीवेगळी श्रमातून श्रध्दांजली. त्यामुळे दुःखी बहीणीच्या संसाराला मिळाला थोडासा दिलासा**

----------------------

धाराशिव जिल्ह्यातील कौडगाव येथील सकल मराठा समाजाचे, चंद्रभान शिवाजी थोरात वय ८८ वर्षे यांचे बुधवार दिनांक १५/१०/२०२५ रोजी वृद्धापकाळाने निधन झाले.ते अगोदरच आपल्या पित्याच्या तब्येतीची विचारपूस करायला माहेरी आल्या होत्या.

आपल्या जन्मदात्या पित्याच्या मृत्युमुळे हातबल झालेल्या पाची लेकी, अहो दादा आता आम्ही काय करावं, आईच व श्रावणीच कसं होईल,म्हणून टाहो फोडून मोठमोठ्याने रडत होत्या.यावेळी त्यांना समजावून धीर देण्याचे काम वयाने पंच्चाहत्तरी ओलांडलेल्या तुळजापूर तालुक्यातील जळकोटवाडी येथील त्यांच्या सख्ख्या मावशी कमल प्रल्हाद पाटील करीत होत्या.

> माझ्या पत्नीची भाची श्रावणी समाधान थोरात हीला तीच्या जन्मदात्या आईने ती सहा महिन्याची चिमुकली असतानाच सासुबाई च्या पदरी टाकून गेली.श्रावणी च्या जन्मदात्या पित्याच्या निधनानंतर तीला मी दोन वर्षाची असताना मुंबईला घेवून आलो आहे. सध्या ती इयत्ता सहावी मध्ये इंग्रजी माध्यमातून शिकत असुन ती अतिशय हुशार व हजरजबाबी आहे.तीच्या पालनपोषण व शिक्षणाची संपूर्ण जबाबदारी मी घेतली आहे.ती उच्च शिक्षित होवून मेव्हणा समाधान थोरात व कौडगाव चे नाव नक्कीच उज्वल करेल याची मला खात्री वाटते.
>
> **- विलास लोकरे- सध्या मुंबई-फपाळवाडी**

अल्पभूधारक शेतकरी होते. त्यानिमित्ताने ही हृदयस्पर्शी कहाणी. काल्पनिक नव्हे सत्य घटनेवर आधारित. त्यांच्या निधनाची बातमी सर्व सग्यासोयऱ्यांना व पाच लेकीना ही कळाली. त्यानंतर त्यांची थोरली लेक उषा गोरख चौधरी ही बार्शी तालुक्यातील तांदुळवाडी येथून, दुसरी लेक रुक्मिणी सुर्यकांत येवले ही धाराशिव तालुक्यातील उपळा(मा)येथून, पाचवी लेक लता विठ्ठल येवले ही बार्शी तालुक्यातील भातंबरे येथून आल्या व चौथी लेक बार्शी तालुक्यातील फपाळवाडी येथील अंजली विलास लोकरे पण सध्या ती मुंबई वरुन एकुलती एक भाची श्रावणी समाधान थोरात हीला घेवून अंतिम संस्कारानंतर कौडगावला रात्री उशिरा पोहचली. या सर्वांना भ्रमणध्वनीवरून संपर्क साधण्याचे काम, उत्तर सोलापूर तालुक्यातील श्रीक्षेत्र मार्डी येथील त्यांची तिसरी लेक मनिषा विष्णू जगताप यांनी केले. त्या दोन दिवस

यावेळी त्यांनी पाची लेकीना शांत करीत उपयुक्त सल्ला दिला की,अवकाळी पावसाची संततधार सुरूच आहे,आपण जन्मदात्या आई व चिमुकली एकुलती एक भाची श्रावणी या दोघींच्या समोर रडत बसण्यापेक्षा,तीच्या संसाराला हातभार लावयाचा असेल तर चला माझ्या बरोबर पदर खोचून काळ्या आईची मशागत करायला म्हणून. ते त्या सर्व लेकीने ऐकून सोबत मावशीला घेवून,थेट चौथ्या दिवशी शेत गाठून आठ दिवस श्रम करीत शेतातील सोयाबीनची काढणी,मळणी व कांदा खुरपणी ची दिवसभर हाती पडेल ती कामे करत आपल्या जन्मदात्या पित्याला आगळीवेगळी श्रमातून श्रध्दांजली वाहिली. स्वर्गीय चंद्रभान थोरात यांच्या कुटुंबीयांनी अनेक देवाला नवस बोलून पाच मुलींच्या नंतर वंशाला दिवा लावायला मुलगाच असावा म्हणून प्रण केले होते.त्यानंतर देवानं समाधान चंद्रभान थोरात या नावाचा मुलगा जन्माला दिला होता.ऐन उमेदीच्या काळात त्याचा विवाह झाला होता.

त्यानंतर त्याला कन्यारत्न जन्माला आले होते.तीचा जन्मच पवित्र अशा श्रावण महिन्यात झाल्याने,देवदेवतांच्या नावाला साजेसे असे श्रावणी समाधान थोरात असे नामकरण केले होते.परंतु ती चिमुकली असतानाच आपला पती समाधान च्या दुखण्याचा बहाना करून श्रावणी ची जन्मदाती आई ही त्या चिमुकल्या श्रावणी ला समाधान ची आई तथा सासुबाई सखुबाई चंद्रभान थोरात हिच्या हवाली करून आजपावेतो परागंदा झाली आहे.



दिलेला वंशाचा दिवाच विझला तसेच माझ्या चिमुकल्या श्रावणी नातीला तीची जन्मदाती आईही तीला आमच्या पदरी टाकून गेली या निराशेच्या पोटी विरह सहन न झाल्याने,तसेच उपळा(मा) येथील दुसऱ्या मुलीचे पती तथा जावाई सुर्यकांत दत्तात्रय येवले यांचेही अपघाती निधन झाल्याने,ते गेल्या दहा वर्षापासून अंथरुणालाच खिळून होते.अंथरुण हेच आपलं स्वर्ग समजून परमेश्वराकडे रोज दोन हात जोडून प्रार्थना करायचे की,देवा माझं काय चुकलं असेल तर त्याची सजा मला दे तु माझ्या कुटुंबाला का? वेठीस धरतोय,लवकर मला या संसारातून मुक्त करुन घेवुन जा.असे भेटायला येणाऱ्या सर्व सग्यासोयऱ्यांना म्हणायचे.

> मागील दहा वर्षापूर्वी,देवानं आमच्या वंशाला दिवा लावायला दिलेला समाधान नावाचा मुलगा,ऐन उमेदीच्या काळातच दीपावलीत काळाने हिरावून नेला.त्यानंतर दुसऱ्या मुलीच्या मालकाचे अपघातानं निधन झाले.त्या दुःखातून सावरत असतानाच पुन्हा दिपावलीतंच,माझ्या हळदी कुंकवाचा धनी काळाने नेला. 'देवानं मला ही नेलं तर बरं झालं असतं',अशी व्यथित भावना व्यक्त करुन,आता जगायचं तर फक्त नात श्रावणी साठीच,तीला आपल्या प्रपंचातून थोडासा आर्थिक हातभार लावून उच्च शिक्षण घेण्यासाठी प्रयत्न करुन,तीने उच्च पदाला गवसणी घातल्याचे,माझ्या हयातीत डोळ्यासमोर पहावयास मिळावे,एवढंच मागणं मी देवाला दोन्ही हात जोडून प्रार्थना करते.दुःखाच्या प्रसंगी माझ्या व नातीच्या पाठीमागे पाची मुली सावली सारख्या उभा राहिल्या तसेच चारी जावायांनी माझ्या कुटुंबाची जबाबदारी संभाळत,समाधान मुलाची आठवणही येवू दिली नाही.
>
> **- सखुबाई चंद्रभान थोरात,कौडगाव**

त्यानंतर ती पतीच्या,नणंदेचे मालक व सासऱ्याच्याही अंतिम संस्काराला आली नाही.किती निष्ठूर म्हणावं अशा व्यक्तीला.

त्यानंतर समाधान दुर्दैवाने वयाच्या सत्तावीसाव्या वर्षी परागंदा झालेल्या पत्नीच्या विरहाने व लिव्हर च्या दुखण्याने अखेर त्याची प्राणज्योत दिनांक १/११/२०१५ रोजी मालवली. देवानं

सध्या मोठमोठ्या दिवंगत नेतेमंडळी,सिनेसृष्टीतील कलावंत यांच्या अंतिम संस्काराचा विधी दूरचित्रवाणीच्या माध्यमातून पाहताना जन्मताच मुलगा नाही म्हणून निराश न होता जन्मदात्या मुली सदरच्या विधीमध्ये हिरारीने भाग घेत असल्याचे चित्र सगळीकडे पहावयास मिळत असताना ग्रामीण भागात अजूनही ते जास्त रुजल्याचे दिसून येत नाही.

परंतु ग्रामीण भागातील रुढी परंपरेला फाटा देवून समाज काय म्हणेल ? याचा विचार न करता मोठ्या हिम्मतीने,स्वर्गीय चंद्रभान थोरात यांच्या अंतिम संस्काराचा विधी व चीतेला भडाग्री त्यांची बार्शी तालुक्यातील तांदुळवाडी येथील थोरली लेक उषा गोरख चौधरी यांनी दिली.

मंगळवार दिनांक २८/१०/२०२५ रोजी वैकुंठवास चतुर्दशी श्राद्ध चा विधी उरकून,जन्मदात्या आईला समजावून सांगून धीर देत पाच लेकी आपल्या कौडगाव माहेर वरुन सासरला तर चौथी लेक अंजली विलास लोकरे व स्वर्गीय जन्मदात्या पित्या मुळे तसेच परागंदा जन्मदात्या आईमुळेच मुंबईला पुढील उपजिविकेकरीता व शिक्षणासाठी हुंदके आवरत,अश्रू ढाळत,जड अंतःकरणाने सायंकाळी मार्गस्थ झाली.यावेळी दिड वर्षापूर्वी स्वःताच्या धन्याचेही निधन झाले असताना,त्या आपल्या दुःखाला सावरुन बहीणी च्या सांत्वनासाठी आपल्या प्रपंचेचा विचार न करता सर्व सग्यासोयऱ्यांना व मुलींना धीर देवून प्रत्येकाला समजावण्याचे काम मोठ्या धाडसाने जळकोटवाडी येथील कमल प्रल्हाद पाटील ह्या करीत होत्या.सर्व पाहुण्यांना सुखरूप पोहचा म्हणून सांगत,त्या आपल्या बहिणीच्या सांत्वनासाठी शेवटी मुक्कामी कौडगाव लाच राहिल्या. सदरच्या प्रसंगी उपस्थितांच्या डोळ्यात अश्रू अनावर झाले होते.स्वर्गीय चंद्रभान शिवाजी थोरात यांच्या कुटुंबात कोणीच पुरुष उरला नसल्याने गावात हळहळ व्यक्त केली जात आहे. सदरच्या कुटुंबात कर्ता पुरुष नसल्याचे सामाजिक भान ठेवून त्यांना शासकीय कामात अडथळा येवू नये म्हणून स्वता जातीने लक्ष घालून,कौडगाव चे लोकनियुक्त विद्यमान सरपंच दयानंद थोरात व ग्रामपंचायत अधिकारी विद्या ओहोळ यांनी तातडीने ग्रामपंचायतकडील मृत्यू रजिस्टर ला मृत्युची नोंद करून ग्राम पंचायतीचे कर्मचारी वाजीद शेख यांच्या मार्फत स्वर्गीय चंद्रभान शिवाजी थोरात यांचा मृत्यू दाखला घरपोच केला.

ते विश्व हिंदू परिषद सोलापूर जिल्ह्याचे सहमंत्री विष्णू श्रीरंग जगताप यांचे ते सासरे होत.

# पंढरपूर कॉरिडॉर; आम्ही देत असलेल्या मोबदल्याने अनेक प्रकल्पग्रस्त समाधानी : आशिर्वाद



### भुसंपादन कायदा २०१३ नुसार भुसंपादन प्रक्रिया नही

जिल्हाधिकारी आशीर्वाद म्हणाले, आम्ही जी भुसंपादन प्रक्रिया राबवित आहोत ती भुसंपादन कायदा २0१३ च्या अंतर्गत करीत नाही आहोत. तर आम्ही एमआरपीपी कायदा १९६६ च्या अंतर्गत करीत आहोत. त्या कायद्यामध्ये सेक्शन १२६ (१) नुसार वाटाघाटीव्दारे भुसंपादनाची प्रक्रिया नमूद आहे. प्रत्येकाचे प्रॉब्लेम वेगळे असल्यामुळेच प्रत्येकाशी वाटाघाटी करुन त्याना सुखकर पध्दतीने हाताळता यावे यासाठी आम्ही या १९६६ च्या कायद्याव्दारे प्रक्रिया राबविण्याचे ठरविले आहे. भुसंपादन कायदा २0१३ मध्ये अशा प्रकारे वाटाघाटीची तरतूदच नाही आहे. त्यामुळे कोणीही सर्वांसाठी ऐवढाच मोबदल्याचा आग्रह धरणे चुकीचे आहे.

### काही लोक बाधित मंडळींना मिसगाईड करता आहेत

कॉरिडोर रद्द करणे हा शासनाचा अधिकार आहे पण हा प्रकल्पच रद्द करा यासाठी एखाद्याने किंवा व्यक्तीसमुहाने कोर्टात याचिका दाखल केल्यास कोर्ट त्याची फारशी दखल घेणार नाही. कोर्ट मोबदला वाढवुन देण्यासाठी सांगु शकेल. पण कोर्ट प्रकल्पच रद्द करा असे सांगणार नाही. कारण आज पर्यंत कोर्टाने एखादा तरी प्रकल्प रद्द केला आहे का ? मात्र आपण येथे पाहतो आहे की काही मंडळी प्रकल्पग्रस्तांना मिसगाईड करीत आहेत. आपण कोर्टात जावू आणि कोर्टाकडून हा कॉरिडोर प्रकल्पच रद्द करु. हा प्रकल्प राबविण्याच्या प्रक्रिये मध्ये काही त्रुटी असतील तर त्या आमच्या निदर्शनास कोर्ट आणून देईल मात्र प्रकल्प रद्द करा असे कोर्ट सांगू शकेल असे आपल्या तरी ज्ञानात नाही. आपण काही फारमोठा कायदेशीरएक्सपर्ट नाही आहोत असे देखील जिल्हाधिकाऱ्यांनी यावेळी पत्रकारांना सांगितले.

### प्रकल्पग्रस्तांपैकी कोणत्याही ग्रुपने अशा प्रकारची जबाबदारी घेवू नये

आम्हा सगळ्यां प्रकल्पग्रस्तांसाठी किती मोबदला मिळणार आहे, किंवा सगळ्या प्रकल्पग्रस्तांना ऐवढाच मोबदला मिळाला पाहिजे अशा प्रकारे वाटाघाटासाठी कोणत्याही एका ग्रुपने पुढाकार किंवा जबाबदारी घेऊ नये. कारण प्रत्येक प्रकल्पग्रस्ताची परिस्थिती सारखी नाही. ती वेगळी आहे. इथे माझ्या माहिती प्रमाणे असा एकही ग्रुप नाही की जो म्हणतो की आम्हा सर्व प्रकल्पग्रस्तांना ऐवढा मोबदला मिळणार असेल ? तर आम्ही सगळ्या प्रकल्पग्रस्तांची सहमती घेऊन तुम्हाला तसे लिहून देवु. तसे एखाद्या ग्रुपने सर्वांसाठी पुढाकार घेणे देखील उचित नाही. कारण प्रत्येक प्रकल्पग्रस्तांचे प्रॉब्लेम किंवा अडचणी वेगवेगळ्या आहेत. त्यामुळे अशा प्रकारे कोणत्याही एका ग्रुपने सर्व प्रकल्पग्रस्तांसाठी पुढाकार घेऊ नये असे आपल्याला वाटते असे जिल्हाधिकाऱ्यांनी सांगितले.

### कितीही कालावधी लागला तरी प्रत्येकाचे समाधान करणार

या प्रकल्पा मध्ये बाधित होणाऱ्या प्रत्येक बाधितांची परिस्थिती सारखी नाही आहे. प्रत्येकाची परिस्थिती वेगळी आहे. अनेकांच्या आजोबा,पणजोबाच्या नावावर अद्याप प्रापर्टी आहे. काही लोकांच्या स्वत:च्या नावावर प्रापर्टी आहे. काहींच्या दोन भावांच्या नावावर आहेत. काहींना वाटते की आपल्याला दुकान मिळणार आहे आपण दुकान घेऊ, काहींना दुकान आणि घरे हवी आहेत. काहींच्या प्रापर्टीचे पैसे सात, आठ जणांना वाटून पाहिजे आहेत. अशा प्रकारे प्रत्येकाची परिस्थिती वेगवेगळी आहे. त्यामुळे प्रत्येक बाधितांशी आम्ही वैयक्तीक चर्चा केलेली आहे. आणखीन चर्चा करावयाची असल्यास आम्ही तयार आहोत त्यासाठी कितीही कालावधी लागला तरी आम्ही तो देवून त्यांचे समाधान करणार आहोत असेही जिल्हाधिकाऱ्यांनी सांगितले.

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.२९ ऑक्टोबर-**

कॉरिडोर प्रकल्पग्रस्तां पैकी बरेच प्रकल्पग्रस्त आमच्या संपर्कात आहेत. आम्ही देत असलेल्या मोबदल्या बद्दल ते समाधानी आहेत. या प्रकल्पग्रस्तांपैकी बऱ्याच मंडळींनी बाहेर फ्लॅट, प्लॉट तसेच घरे देखील खरेदी केलेले आहेत. दरम्यान कॉरिडोर प्रकल्पग्रस्तांना आपल्याला मिळणाऱ्या मोबदल्या विषयी असमाधानी असल्यास त्या संदर्भात कोर्टात जाता येईल.

मात्र हा प्रकल्पच रद्द करा यासाठी कोर्ट त्यांचे ऐकुन घेणार नाही. कारण आज पर्यंत कोर्टाने कोणता एखादा प्रकल्प रद्द केला आहे आम्हाला दाखवुन द्या असा उलट सवाल जिल्हाधिकारी कुमार आर्शीर्वाद यांनीच पत्रकार मंडळींना केला. कार्तिकी यात्रेच्या नियोजनाची पाहणी करण्यासाठी जिल्हाधिकारी आशीर्वाद हे बुधवारी (ता.२९) पंढरपूरात आलेले होते. त्यावेळी पत्रकारांशी त्यांनी संवाद साधला. या मध्ये कॉरिडोर प्रकल्पा बद्दल



**कॉरिडोर रद्द करणे हा शासनाचा अधिकार आहे पण हा प्रकल्पच रद्द करा यासाठी एखाद्याने किंवा व्यक्ती समुहाने कोर्टात याचिका दाखल केल्यास कोर्ट त्याची दखल घेणार नाही. कारण आजपर्यंत कोर्टाने एखादा तरी प्रकल्प रद्द केला आहे का ? जिल्हाधिकाऱ्यांनीच असा प्रश्न उपस्थित केला.**

पत्रकारांनी विचारणा केली असता त्याबाबत जिल्हाधिकाऱ्यांनी सविस्तर माहिती दिली. जिल्हाधिकारी म्हणाले, आम्ही प्रकल्पग्रस्तांच्या सतत संपर्कात आहोत. बरेच प्रकल्पग्रस्त आम्ही देत असलेल्या मोबदल्या बद्दल समाधानी आहेत. प्रकल्पग्रस्तांचा कोणताही एखादा ग्रुप आमच्याकडे येवून आम्हाला ऐवढा मोबदला हवा आहे जर तुम्ही त्यास तयार असाल तर आम्ही सर्व प्रकल्पग्रस्तांची या प्रकल्पासाठी सहमती देण्यास तयार आहोत असे म्हणून आमच्यापर्यंत आलेला नाही. कारण प्रत्येक प्रकल्पग्रस्तांची परिस्थिती वेगळी आहे. ती सारखी नाही आहे. त्यामुळे आम्ही प्रत्येक प्रकल्पग्रस्तांची वैयक्तीक चर्चा केलेली आहे. त्यामधुन आम्हाला बऱ्याच प्रकल्पग्रस्तांची सहमती असल्याचे निदर्शनास आलेले आहे. अनेक प्रकल्पग्रस्त हा प्रकल्प केव्हा राबविला जाईल या बद्दल आमच्याकडे वारंवार विचारणा करीत आहेत असेही त्यांनी सांगितले.



# गोल्डन सिताफळाला आले सोनेरी दिवस

- बाजार समितीमध्ये वाढली गोल्डन सिताफळची उलाढाल

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २९ ऑक्टोबर-**

श्री सिद्धेश्वर कृषी उत्पन्न बाजार समिती सोलापूर येथे सीताफळाची आवक वाढली आहे. बाजारात गोल्डन सीताफळ ४० ते ८० रुपये किलो आणि गावरान सीताफळ ८० ते १२० रुपये किलो दराने विक्री केली जात आहे.

विशेषत: सीताफळाचा मुख्य हंगाम सुरू झाल्यामुळे बाजारात सीताफळ खरेदीसाठी गर्दी वाढली आहे. सीताफळासोबतच पेरू आणि सफरचंदासारख्या इतर फळांचीही आवक वाढली असल्याचे फळांचे व्यापारी मतीन बागवान यांनी सांगितले. सोलापूरसह इतर जिल्ह्यातून सीताफळची आवक होत आहे. यासह बाजारात सीताफळची मागणी देखील वाढत आहे. दरम्यान, थंडीचा मौसम लवकरच सुरू होणार असल्याने सिताफळ आणि पेरू या फळांना विशेष करून ग्राहक पसंती दर्शवतात. त्यामुळे फळांची आवक गेल्या काही दिवसांपासून वाढत असल्याचे बाजार समिती मध्ये दिसून येत आहे. सोलापूर बाजार समितीमध्ये गावरान आणि गोल्डन अशा दोन पद्धतीचे सीताफळ विक्रीसाठी येत आहेत. नव्या पद्धतीचे गोल्डन सिताफळ ग्राहकांसाठी आकर्षणाचे केंद्र आहे. त्यासह ड्रॅगन, पेरू, पपई, चिकू, सफरचंद यांची देखील मागणी आहे. जिल्ह्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे अनेक फळबागा नष्ट झाल्यामुळे फळांचे दर सध्या तेजीत आहेत.

सीताफळ आरोग्यासाठी फायदेशीर आहे. त्यामध्ये फायबर, व्हिटॅमिन सी, पोटॅशियम, मॅग्नेशियम आणि कॅल्शियम यांसारखे पोषक तत्त्वं आहेत. हे पचन सुधारते, रोगप्रतिकारशक्ती वाढवते, हाडे आणि दात मजबूत करते, त्वचेचे आरोग्य सुधारते, हृदयाचे कार्य सुरळीत ठेवण्यास मदत करते.



**सोलापूर : पूर्व भागातील दाजी पेठेतील श्री व्यंकटेश्वर देवस्थानात बुधवारी सायंकाळी ५३ व्या ब्रह्मोत्सव कार्यक्रमाची सुरुवात झाली.**

# तीन नोव्हेंबरपासून 'मुख्यमंत्री सुंदर शाळा' अभियानाचा तिसरा टप्पा होणार सुरु

### शाळांना मिळणार ८७ कोटींची बक्षिसे

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २९ ऑक्टोबर-**

उपमुख्यमंत्री व तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सुरू केलेली 'मुख्यमंत्री सुंदर शाळा' योजनेचा तिसरा टप्पा तीन नोव्हेंबरपासून सुरू होणार आहे. लोकसहभाग, सांघिक प्रयत्नांसह, नावीन्यपूर्ण उपक्रमांची विद्यार्थ्यांना प्रेरणा मिळावी, या उद्देशाने मुख्यमंत्री सुंदर शाळा अभियानाचा तिसरा टप्पा तीन नोव्हेंबरपासून सुरू करण्याचे जाहीर करण्यात आले आहे. यामध्ये विजेत्या शाळांना कोट्यवधींची बक्षिसे देण्यात येणार आहेत.

या अभियानात राज्यातील सर्व माध्यमांच्या शाळांना सहभागी होता येणार आहे. 'मुख्यमंत्री सुंदर शाळा' या अभियानामध्ये विविध स्तर आणि वर्गवारीमध्ये विजेत्या शाळांना एकूण ८६ कोटी ७३ लाख रुपयांची बक्षिसे दिली जाणार आहेत. या अभियानासाठी शाळांची विभागणी शासकीय व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळा आणि उर्वरित इतर सर्व व्यवस्थापनांच्या शाळा अशा दोन वर्गवारीत विभागण्यात आले आहे. या दोन्ही वर्गवारीसाठी प्रत्येक स्तरावरील विजेता स्वतंत्रपणे निवडण्यात येणार आहे. ३ नोव्हेंबर ते ३१ डिसेंबर या कालावधीत हे अभियान राबवण्यात येणार आहे.

२०२५-२६ मध्ये हे स्पर्धात्मक अभियान नवीन उपक्रमांसह राबवण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता, त्यानुसार हा निर्णय घेण्यात आला आहे. २०२५-२६ या शैक्षणिक वर्षासाठी ही योजना सुधारित निकषांसह राबवली जाणार आहे आणि त्यासाठी ८६ कोटी ७३ लाख रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. या अभियानाला दोन वर्षात राज्यात चांगला प्रतिसाद मिळाले आहे. त्यामुळे शिक्षण आयुक्तांनी शासनस्तरावर कार्यवाही सुरू केली आहे.. यामध्ये १०० गुणांच्या आधारे शाळांचे मूल्यांकन केले जाणार असून विद्यार्थी-केंद्रित उपक्रम आणि स्वच्छतेसारख्या गोष्टींचा समावेश आहे. या अभियानात निवडलेल्या शाळांना राज्य आणि जिल्हा स्तरावर रोख बक्षिसे दिली जाणार आहेत. राज्य स्तरावर प्रथम क्रमांकासाठी २१ लाख रुपये आहे. शिवाय विविध स्तरावर ८६ कोटी ७३ लाख रूपयांची बक्षिसे जाहीर करण्यात आली आहे. मुख्यमंत्री माझी सुंदर शाळा' ही महाराष्ट्र शासनाची एक स्पर्धात्मक योजना आहे. जी शाळांचा दर्जा सुधारण्यासाठी आणि विद्यार्थ्यांना शाळेत अधिक सक्रिय करण्यासाठी राबवली जात आहे . या योजनेत शाळांची निवड विद्यार्थी-केंद्रित उपक्रम, स्वच्छता आणि इतर निकषांवर आधारित केली जाणार आहे.

# अतिवृष्टी भरपाई न मिळाल्यास उद्या ताळेठोको आंदोलन

**तभा वृत्तसेवा**
**बार्शी, दि. २९ ऑक्टोबर-**

अतिवृष्टीग्रस्तांना निधी न मिळाल्यास गुरुवार शासकीय कार्यालयांना ताळेठोक आंदोलनाचा इशारा शेतकरी संघटनेने दिला आहे.

सप्टेंबर २०२५ मध्ये झालेल्या अतिवृष्टीमुळे बार्शी तालुक्यातील शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणावर शेती पिकांचे नुकसान झाले. या नुकसानीची दखल घेऊन शासनाने बाधित शेतकऱ्यांना मदत जाहीर केली होती. संबंधित निधी शासनाकडून प्राप्तही झाल्याची माहिती असून दिवाळीपूर्वी तो थेट शेतकऱ्यांच्या खात्यात जमा करण्याचे आश्वासन प्रशासनाने दिले होते. मात्र आज दि. २९ ऑक्टोबर २०२५ पर्यंत बार्शी तालुक्यातील निम्म्या शेतकऱ्याच्या खात्यात नुकसानभरपाई जमा झालेली नाही. प्रशासनाच्या निष्काळजीपणामुळे शेतकऱ्यांमध्ये तीव्र नाराजी निर्माण झाली आहे.शेतकरी संघटनेचे अध्यक्ष हनुमंत भोसले यांनी इशारा दिला आहे. यावेळी तालुक्यातील शेतकरी संघटनेची कार्यकर्ते उपस्थित होते.






# सोयाबीन खरेदीसाठी शासनाच्या आदेशाची प्रतीक्षा

**▸▸जिल्ह्यात सोयाबीन हमीभाव खरेदी केंद्राची तयारी पूर्ण : जिल्हा पणन अधिकारी बाजपेयी**



**तभा वृत्तसेवा । यशवंत गुरव**
**सोलापूर, दि.२९ ऑक्टोबर-**

राज्यात सोयाबीनचे उत्पादन मोठ्या प्रमाणात झाल्याने सोयाबीनचे दर घसरले जात आहेत. व्यापाऱ्यांकडून शेतकऱ्यांची पिळवणूक होत असल्याने सोयाबीनची खरेदी शासनाने हमीभाव खरेदी केंद्राच्या मार्फत करावी, यासाठी विविध शेतकरी संघटना आग्रही भूमिका घेत असताना, राज्य शासनाने मात्र अद्याप याबाबत कोणताच निर्णय घेतला नसल्याने, सोयाबीन खरेदीसाठी शासनाच्या ग्रीन सिग्नलची वाट पाहिली जात आहे. सोलापूर जिल्ह्यातील सोयाबीनच्या खरेदीसाठी हमीभाव खरेदी केंद्राची तयारी पूर्ण झाली आहे.

राष्ट्रीय ग्राहक महासंघ यांच्यावतीने हमीभाव खरेदी केंद्र सुरू केले जाणार आहे. केवळ शासनाच्या आदेशाची प्रतीक्षा पाहिली जात असल्याचे सोलापूर जिल्हा पणन अधिकारी मनोज कुमार बाजपेयी यांनी दैनिक तरुण भारतशी बोलताना सांगितले. दरम्यान, सोयाबीन हमीभाव खरेदी केंद्र सुरू करण्याच्या अनुषंगाने जिल्ह्यात सर्व पूर्व तयारी करण्यात आली आहे. यासंबंधी व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे बैठक घेऊन जिल्ह्यातील विविध नऊ खरेदी केंद्राची माहिती घेण्यात आली आहे. खरेदी केलेल्या सोयाबीनच्या साठवणुकीसाठी गोदाम स्वच्छ करणे, आद्रता चेक केल्या जाणाऱ्या मशनरी अद्ययावत करणे, चाळणी यंत्र तयार ठेवणे, केंद्राचे तसेच बाजार समितीचे कर्मचाऱ्यांची नेमणूक करणे, गतवर्षी प्रमाणे खरेदीचे नियोजन करण्यात आले आहे.

राज्य शासनाच्या एन.ई.एम.एल. या अधिकृत पोर्टलवर शेतकऱ्यांनी सोयाबीनची माहिती भरावयाची आहे. ई पीक पाहणी प आणि एन. इ.एम.एल हे पोर्टल शासनाने लिंक केले आहे. जितके क्षेत्र सोयाबीनच्या लागवडीखाली आहे. त्याची इत्यंभूत माहिती शासनाला याद्वारे मिळणार आहे. त्यानुसारच किती प्रमाणात सोयाबीनची हमीभावाने खरेदी करायची, हे शासन ठरवणार आहे. त्यानुसार सोयाबीनची खरेदी केली जाणार आहे. राज्य शासनाच्या नियमानुसार प्रत्येक शेतकऱ्यांचे ठराविक क्विंटल सोयाबीन हे हमीभावाप्रमाणे खरेदी केले जाणार आहे. यामध्ये केंद्राचे तसेच संबंधित बाजार समितीचे कर्मचारी नियुक्त केले जाणार आहेत.

### शासनाच्या आदेशानंतर हमीभावाने सोयाबीनची खरेदी

सोयाबीनची हमीभाव खरेदी केंद्रातून खरेदीसाठी सर्व तयारी करण्यात आली आहे. जिल्ह्यातील नऊ विविध खरेदी केंद्रांवर पॉस मशीन, संगणक प्रणाली विकसित करण्यात आली आहे. शेतकऱ्यांनी राज्य शासनाच्या एन. ई. एम.एल या अधिकृत पोर्टलद्वारे आपल्या शेताची तसेच सोयाबीनची माहिती अपलोड करायचे आहे. पोर्टलद्वारे प्राप्त झालेल्या शेतकऱ्यांचे सोयाबीन खरेदी करण्यात येणार आहे. सोयाबीनला राज्य शासनाने पाच हजार ३२८ प्रतिक्विंटल असा दर निश्चित केला आहे. केवळ राज्य शासनाच्या आदेशाची प्रतीक्षा आहे. आदेश आल्यानंतर तात्काळ सोयाबीन हमीभाव खरेदी प्रक्रिया सुरू केली जाईल.

**- मनोज कुमार बाजपेयी,**
जिल्हा पणन अधिकारी सोलापूर




**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून तरुण भारत कार्यालय, स्वेतसागर निवास, राजमाता जिजामाता महाविद्यालयजवळ, पत्रकार रोड, शिवनगर, जि. लातूर - ४१३५१२. कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. दूरध्वनी : ८८८८८४७२३९ ● मुख्य समुह संपादक : **दिलीप यशवंत पेठे.** ● मुख्य संपादक : **प्रशांत वसंतराव माने** (पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर आहे) दैनिक सोलापूर तरुण भारत. **RNI No. MAHMAR/2023/86477. E-mail starunbharatgmail.com.** ● **Websate:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही.

**Owned by, SOLAPUR TARUN BHARAT MEDIA LTD. Printed by, Published by** DILIP SHIVMURTI DULANGE **Printed at** SOLAPUR TARUN BHARAT MEDIA LT. 19,20 INDUSTRIAL ESTATE, HOTGI ROAD, SOLAPUR, Dist. SOLAPUR, 413003. **Publised at** TARUN BHARAT OFFICE, SwetSagar Niwas, Near Rajmata Jijamata College, Patrakar Road, Shivnagar, Dist. Latur Pin 413512, **RNI No. MAHMAR/2023/86477**
● **CHIEF GROUP EDITOR :** DILIP YASHWANT PETHE ● **CHIEF EDITOR :** PRASHANT VASANTRAO MANE

लातूर
# दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## सततच्या पावसामुळे रब्बी हंगाम धोक्यात : शेतकऱ्यांची चिंता वाढली

**तभा वृत्तसेवा**
**उदगीर, दि.२९ ऑक्टोबर -**
हे वर्ष पावसाचेच आहे की काय? असा प्रश्न आता उदगीर तालुक्यातील शेतकऱ्यांमध्ये पुन्हा ऐकू येत आहे. कारण, मे महिन्यापासून सुरू असलेला पाऊस अजूनही थांबायचे नाव घेत नाही. गेल्या दोन दिवसांपासून उदगीर शहरासह संपूर्ण तालुक्यात रिमझिम स्वरूपात पाऊस सुरू असून, त्यामुळे रब्बी हंगामाच्या पूर्वमशागतीची कामे ठप्प झाली आहेत.

यावर्षी पावसाळ्यात मुसळधार पावसाने शेतकऱ्यांची मोठी हानी केली होती. खरीप पिकांचे नुकसान झाल्याने शासनाकडून पंचनामे करण्यात आले व काहींना आर्थिक मदत मिळाली; मात्र अनेक शेतकऱ्यांच्या खात्यावर अद्याप ती मदत जमा झालेली नाही.

रब्बी हंगामासाठी शेतकरी उत्साहात तयारी करत होते. नांगरटी, पेरणीपूर्व मशागती तसेच खरीप पिकांचे अवशेष हटविण्याचे काम सुरू होते. परंतु, गेल्या दोन दिवसांपासून सुरू असलेल्या पावसामुळे शेतशिवारात पुन्हा चिखल साचला आहे. त्यामुळे ट्रॅक्टरसारखी यंत्रे शेतात नेणे कठीण झाले असून, अनेक शेतकऱ्यांच्या सोयाबीनच्या राशीदेखील अजून वाळवता आल्या नाहीत.

सध्या आकाशात ढगांचे साम्राज्य असून, पावसाचा जोर वाढल्यास रब्बी हंगामावर संकट येण्याची भीती व्यक्त केली जात आहे. या परिस्थितीमुळे शेतकरी गोंधळात आहेत.



# पहिल्या मजल्याच्या बांधकामासाठी ३ कोटी ३४ लाखांचा निधी मंजूर

### औसा पंचायत समितीला नवा चेहरा

**तभा वृत्तसेवा**
**औसा, दि.२९, ऑक्टोबर -**
औसा तालुक्याच्या विकास आराखड्यातील एक महत्त्वाचा टप्पा पूर्ण झाला आहे. आमदार अभिमन्यू पवार यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे औसा पंचायत समितीच्या प्रशासकीय इमारतीच्या पहिल्या मजल्याच्या बांधकामासाठी तब्बल ३ कोटी ३४ लाख रुपयांचा निधी मंजूर झाला आहे. या कामामुळे तालुक्याच्या प्रशासकीय कार्यात अधिक सुलभता, कार्यक्षमता आणि पारदर्शकता येणार आहे.



प्रस्तावित पहिल्या मजल्याचे बांधकाम ९९५ चौरस मीटर क्षेत्रफळात करण्यात येणार आहे. काम पूर्ण झाल्यानंतर सध्या तात्पुरत्या ठिकाणी चालू असलेली शिक्षण विभाग, पशुसंवर्धन विभाग, पाणीपुरवठा उपविभाग, बांधकाम उपविभाग यांसारखी अनेक कार्यालये पंचायत समितीच्या मुख्य प्रशासकीय इमारतीत स्थलांतरित केली जातील.

यामुळे औसा पंचायत समिती परिसरात सर्व विभागांची कार्यालये एकाच ठिकाणी उपलब्ध होतील. ग्रामीण भागातील नागरिकांना त्यांच्या दैनंदिन शासकीय कामांसाठी आता वेगवेगळ्या ठिकाणी धावाधाव करण्याची गरज राहणार नाही. एकाच ठिकाणी सर्व सेवा मिळाल्याने वेळ वाचेल, प्रशासन अधिक कार्यक्षम बनेल आणि नागरिकांना सेवांचा जलद लाभ मिळेल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला आहे.

महत्त्वपूर्ण विकासकामासाठी निधी मंजूर झाल्याबद्दल आमदार अभिमन्यू पवार यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व अजित पवार, तसेच ग्राम विकास मंत्री जयकुमारजी गोरे आणि लातूर जिल्ह्याचे पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांचे मनःपूर्वक आभार मानले आहेत.

औसा तालुक्याच्या सर्वांगीण विकासाच्या दिशेने हा निर्णय एक महत्त्वपूर्ण टप्पा ठरला असून, ग्रामीण जनतेला सर्व शासकीय सुविधा एकाच ठिकाणी मिळण्याचा मार्ग आता मोकळा झाला आहे.

# वहीवाटीचा शेतरस्ता पुन्हा खुला करण्याची डिगोळ शेतकऱ्यांची मागणी

### तहसील प्रशासनाने तात्काळ कारवाई करावी : शेतकऱ्यांची अपेक्षा



**तभा वृत्तसेवा**
**डिगोळ, दि.२९, ऑक्टोबर -**
डिगोळ येथील शेतकऱ्यांनी अनेक वर्षांपासून वापरात असलेला वहीवाटी सर्वे नंबरचा शेतरस्ता पुन्हा खुला करण्याची मागणी तहसील प्रशासनाकडे केली आहे. या संदर्भात गावातील शेतकऱ्यांनी एकत्र येऊन तहसीलदार शिरूर (अनंतपाळ) यांना सविस्तर अर्ज सादर केला.

शेतकऱ्यांनी दिलेल्या अर्जात नमूद केले आहे की, सर्वे नं. २९६, ३००, २८९ आणि २८८ या गटांमधून जाणारा पारंपरिक शेतरस्ता काही शेजारच्या शेतकऱ्यांनी अडवून बंद केला आहे. हा रस्ता अनेक वर्षांपासून शेतीकामासाठी व वाहतुकीसाठी वापरात असल्याने त्याचे बंद होणे शेतकऱ्यांसाठी मोठी अडचण ठरत आहे. या संदर्भात दि.१० फेब्रुवारी २०१४ व २९ जानेवारी रोजी तक्रार दाखल करून तहसील प्रशासनाने मंडळ अधिकारी साकोळ यांना कार्यवाहीचे आदेश दिले होते.

त्यानंतर दि. ७ एप्रिल २०२५ रोजी तलाठी गणेश राठोड यांनी पंचनामा करून स्थळ पाहणी केली. पाहणीत सर्वे नं. २९६ व ३०० च्या मालकांनी हद्द कायम करण्यासाठी फी भरण्याचे मान्य केले आणि तोपर्यंत तात्पुरता रस्ता चालू ठेवण्यास हरकत नसल्याचे सांगितले होते.

मात्र, प्रशासनाचा संबंधित अधिकारी अनुपस्थित असल्याने रस्ता प्रत्यक्षात खुला करण्यात आला नाही. त्यामुळे शेतकऱ्यांमध्ये नाराजीचे वातावरण निर्माण झाले आहे. तहसील प्रशासनाने ठोस भूमिका न घेतल्यामुळे रस्ता आजही बंद आहे, अशी भावना शेतकऱ्यांनी व्यक्त केली. नायब तहसीलदार यादव यांच्याकडे शेतकऱ्यांनी यासंबंधी विचारणा केली असता, त्यांनी पोलीस तक्रार करण्याचा सल्ला दिला असल्याचे शेतकऱ्यांचे म्हणणे आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी पुन्हा एकदा लोक सहभागातून वहीवाटीचा रस्ता काढून देण्यात यावा अशी मागणी तहसीलदारांकडे केली आहे.

या अर्जावर इंदुमती वैजनाथ चावरे, गुंडेराव संभाजी चावरे, शिवहार संभाजी चावरे, त्र्यंबक श्रीपती शेळके, उमाकांत गोविंद शेळके, चंद्रकांत गोविंद शेळके, बालाजी विठ्ठल शेळके, सिंधुबाई गोविंद शेळके, वामन हाणमंतराव बिरादार (तंटामुक्ती अध्यक्ष), संजय प्रकाश बिरादार, धनराज वैजनाथ चावरे, राजकुमार सदाशिव चावरे आदींसह गावातील अनेक शेतकऱ्यांनी सही केली आहे.

# ना. बाबासाहेब पाटील यांचा आदर्श उपक्रम : एक महिन्याचे वेतन मुख्यमंत्री सहाय्यता निधीसाठी

### अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांच्या मदतीसाठी पुढाकार; सहकारमंत्र्यांची संवेदनशील भूमिका

**तभा वृत्तसेवा**
**चाकूर, दि.२९, ऑक्टोबर -**
महाराष्ट्र राज्याचे सहकार मंत्री ना. बाबासाहेब पाटील यांनी अतिवृष्टीमुळे मराठवाड्यातील शेतकऱ्यांवर आलेल्या संकटात संवेदनशीलता दाखवत एक आदर्श निर्णय घेतला आहे. त्यांनी आपल्या मंत्रीपदाचे एक महिन्याचे वेतन मुख्यमंत्री सहाय्यता निधीसाठी कपात करण्याचे पत्र राज्याच्या सामान्य प्रशासन विभागाच्या अप्पर मुख्य सचिवांना सादर केले आहे.



अलीकडच्या अतिवृष्टीमुळे राज्यातील अनेक जिल्ह्यांमध्ये शेतीचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. पिके, जनावरे आणि घरांचे झालेल्या नुकसानीमुळे शेतकऱ्यांवर आर्थिक संकट कोसळले आहे.

या पार्श्वभूमीवर ना. पाटील यांनी शासनाबरोबरच वैयक्तिक पातळीवर मदतीचा हात पुढे करत एक अनुकरणीय उदाहरण घातले आहे.

ना. बाबासाहेब पाटील म्हणाले, सर्वसामान्यांचे झालेले नुकसान अतिशय वेदनादायी आहे. राज्य सरकारने शक्य तितक्या तातडीने मदत करण्याचा प्रयत्न केला आहे.

मी स्वतः शेतकरी कुटुंबातून आलो असल्याने शेतकरी बांधवांच्या दुःखाची मला पूर्ण जाणीव आहे.

म्हणूनच अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्या बांधवांसाठी मदतीचा हात म्हणून माझे ऑक्टोबर महिन्याचे वेतन मुख्यमंत्री सहायता निधीत जमा करण्याचा निर्णय घेतला आहे.

ना. पाटील यांच्या या निर्णयाचे सर्वत्र स्वागत होत असून, शेतकऱ्यांप्रती दाखविलेल्या त्यांच्या संवेदनशीलतेचे आणि सामाजिक बांधिलकीचे कौतुक केले जात आहे.

### उपमुख्यमंत्री अजित पवार यांचा लातूर जिल्हा दौरा आज

**तुळजापूर, दि.२९, ऑक्टोबर**
राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार हे गुरुवार, ३० ऑक्टोबर २०२५ रोजी लातूर जिल्हा दौऱ्यावर येत आहेत. त्यांच्या दौऱ्याचा कार्यक्रम आहे.

सायंकाळी ७ वाजता उपमुख्यमंत्री पवार यांचे उदगीर येथे आगमन होईल. याठिकाणी त्यांच्या हस्ते भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा पूर्णाकृती पुतळा व स्मारकाचे लोकार्पण करण्यात येणार आहे. यानंतर सायंकाळी ७.१५ वाजता दसरा मैदान, तालुका क्रीडा संकुल (जिल्हा परिषद मैदान), उदगीर येथे त्यांच्या उपस्थितीत जाहीर सभा होईल. तसेच रात्री ९ वाजता उदयगिरी लायन्स आय हॉस्पिटल, उदगीर येथे नेत्र रुग्ण धर्मशाळा व दंत चिकित्सा रुग्णालयाचे लोकार्पण उपमुख्यमंत्री करतील.

## आस्मानी संकटग्रस्त शेतकऱ्यांना आदर्श मैत्री फाऊंडेशनचा दिलासा

**लातूर, दि.२९, ऑक्टोबर -**
नुकत्याच झालेल्या आसमानी संकटामुळे हतबल झालेल्या २५ शेतकऱ्यांना मदतीचा हात नव्हे तर कर्तव्य समजून आज आदर्श मैत्री फाऊंडेशनच्या वतीने खत व बी-बियाण्यांचे वाटप करण्यात आले.

या प्रसंगी फाउंडेशनचे अध्यक्ष संतोष बिराजदार म्हणाले की, सध्या निसर्ग शेतकऱ्यावर कोपलेला आहे. अशा काळात शेतकऱ्यांनी टोकाचे पाऊल न उचलता धैर्य राखावे.

आम्ही फाउंडेशनच्या वतीने ही मदत नव्हे तर कर्तव्य समजून करत आहोत. भविष्यात शेतकऱ्यांच्या मुलांच्या शिक्षणासाठीही सर्वतोपरी मदत केली जाईल.

## कामाच्या शोधात मजुरांची शिवाजी चौकात दररोज ‘जत्रा’

**तभा वृत्तसेवा / प्रमोद सुरवसे**
**लातूर, दि.२९, ऑक्टोबर -**
आजकाल चांगले कामगार मिळणे कठीण झाले आहे, तसेच कामगारांना चांगले मालक किंवा गुत्तेदार मिळत नाहीत हेही कटू सत्य आहे. सध्या बांधकाम क्षेत्रात कामांची कमतरता निर्माण झाल्याने अनेक कामगार बेरोजगार झाले आहेत. त्यामुळे शहरात बेकारीची संख्या झपाट्याने वाढत आहे.

याच पार्श्वभूमीवर दररोज सकाळी लातूरच्या शिवाजी महाराज चौकात बांधकाम करणारे किंवा त्यासंबंधित मजूर एकत्र येतात. कामाच्या शोधात येणाऱ्या या कामगारांची दृश्यं अक्षरशः ‘जत्रा’ भरल्याचा आभास निर्माण करतात. कोणाला मातीकामाचे, कोणाला प्लास्टरचे, तर कोणाला दगडी बांधकामाचे काम हवे असते - त्यामुळे येथे कामगार आणि गुत्तेदार यांच्यात व्यवहार ठरवण्याची गर्दी दिसते.

**बांधकाम क्षेत्रातील मंदीमुळे बेकारीत वाढ; कामगार व गुत्तेदार दोघांनाही संकट**

बांधकाम व्यावसायिक आणि ठेकेदार या ठिकाणी येऊन आपल्याला हव्या त्या प्रकारचे कामगार निवडून घेऊन जातात. काही वेळा रोजंदारी ठरते, तर काहीवेळा आठवड्याच्या किंवा ठेक्याच्या स्वरूपात करार होतो.

या अनौपचारिक रोजगार बाजारामुळे काहींना रोजीरोटी मिळत असली तरी कामाची अनिश्चितता, मजुरीतील अस्थिरता आणि विम्याअभावी धोके हे प्रश्न कायम आहेत. कामगार संघटनांनी प्रशासनाकडे या मजुरांच्या नोंदणीसाठी व हमी मजुरीसाठी यंत्रणा उभी करण्याची मागणी केली आहे.

शहरात वाढत्या बांधकामांनंतरही कामगार आणि ठेकेदार यांच्यातील विश्वासाचा तुटलेला पूल हीच आजची खरी समस्या बनली असल्याचे जाणकारांचे मत आहे.

## चाकूरच्या अभिषेक देशपांडेची भारतीय कर्णबधिर क्रिकेट संघात निवड

### भारत-नेपाळ टी-२० मालिकेत करणार देशाचे प्रतिनिधित्व

**तभा वृत्तसेवा**
**चाकूर, दि.२९, ऑक्टोबर -**
चाकूर तालुक्यातील सांडोळ गावचा अभिषेक श्रीरंग देशपांडे या तरुणाची भारतीय कर्णबधिर क्रिकेट संघात निवड झाली असून तो भारत आणि नेपाळ यांच्यात २७ ऑक्टोबरपासून चंदीगड येथे होणाऱ्या आंतरराष्ट्रीय टी-२० मालिकेत भारताकडून खेळणार आहे. ही निवड केवळ चाकूर तालुक्याचाच नव्हे, तर संपूर्ण लातूर जिल्ह्याचा अभिमानाचा क्षण ठरली आहे.



छोट्याशा ग्रामीण भागातील कर्णबधिर तरुणाने राष्ट्रीय स्तरावर पोहोचत जिद्द आणि मेहनतीच्या जोरावर मर्यादा कशा ओलांडता येतात याचे प्रेरणादायी उदाहरण साकारले आहे. भारतीय कर्णबधिर क्रिकेट संघासाठी अभिषेकची निवड झाल्याचे पत्र ऑल इंडिया स्पोर्ट्स कौन्सिल ऑफ द डेफकडून २५ सप्टेंबर रोजी प्राप्त झाले. तीन सामन्यांची ही टी-२० मालिका २७, २८ आणि २९ ऑक्टोबर रोजी चंदीगड येथे खेळवली जाणार असून, पंजाब डेफ अँड डंब स्पोर्ट्स असोसिएशन, पटियाला यांच्या वतीने या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. भारतीय संघातील १६ खेळाडूंमध्ये अभिषेकचा क्रमांक सहावा असून त्याची निवड मुख्य फलंदाज म्हणून करण्यात आली आहे.

अभिषेक श्रीरंग देशपांडे हा राज्य परिवहन महामंडळातील चालकाचा मुलगा असून तो जन्मजात कर्णबधिर आहे. त्याचे दहावीपर्यंतचे शिक्षण लातूर येथील विजयगोपाल मूकबधिर विद्यालयात झाले. सध्या तो मध्य प्रदेशातील इंदूर येथे वाणिज्य शाखेत शिक्षण घेत आहे. शिक्षणासोबतच गेल्या तीन वर्षांपासून तो कर्णबधिर क्रिकेट क्षेत्रात सातत्याने उत्कृष्ट कामगिरी करत आहे.

त्याच्या अष्टपैलू खेळामुळे, फलंदाजीतील आत्मविश्वास आणि शिस्तबद्ध खेळामुळे निवड समितीने त्याच्यावर विश्वास दाखविला आहे. राज्य व राष्ट्रीय पातळीवरील विविध स्पर्धांमध्ये उल्लेखनीय कामगिरी करत त्याने अनेक पारितोषिकेही मिळवली आहेत.

अभिषेकच्या या यशामुळे सांडोळ गावासह संपूर्ण चाकूर तालुक्यात आनंदाचे वातावरण असून, सामाजिक संस्था, स्थानिक नागरिक आणि क्रीडाप्रेमींकडून त्याचे जोरदार अभिनंदन केले जात आहे.

### रेल्वे तिकिटे आता पोस्ट ऑफिसमध्येही उपलब्ध होणार!

## ग्रामीण भागातील प्रवाशांना मोठा दिलासा; रेल्वे-डाक विभागामध्ये थेट जोडणी

**तभा वृत्तसेवा**
**उदगीर, दि.२९, ऑक्टोबर -**
सणासुदीच्या काळात रेल्वे तिकिटांसाठी काउंटरवर लागणारी गर्दी आणि आयआरसीटीसी संकेतस्थळावरील तांत्रिक अडचणींमुळे प्रवाशांना नेहमीच त्रासाला सामोरे जावे लागते. मात्र आता प्रवाशांसाठी एक दिलासादायक बातमी आहे - लवकरच पोस्ट ऑफिसमधूनही रेल्वे तिकिटांचे आरक्षण करता येणार आहे.

> **उदगीर पोस्ट ऑफिसमध्ये लवकरच सेवा सुरु**
> रेल्वे आरक्षणासाठी डाक विभागाकडून करार झालेला आहे. सध्या उदगीर शहरातील पोस्ट ऑफिसमध्ये ही सुविधा उपलब्ध नाही, परंतु लवकरच रेल्वे बुकिंग सेवा सुरू करण्यासाठी प्रशासकीय हालचाली सुरू आहेत.
> **- भीमराव पाटील,** पोस्टमास्टर, उदगीर

भारतीय डाक विभागाने भारतीय रेल्वेच्या प्रवासी आरक्षित यंत्रणेशी थेट जोडणी करून ही सेवा सुरू करण्याची तयारी केली आहे.

या उपक्रमामुळे आता ग्रामीण भागातील प्रवाशांना रेल्वे तिकीट घेण्यासाठी २० ते ३० किलोमीटर प्रवास करावा लागणार नाही. गावातीलच पोस्ट ऑफिसमधून तिकीट बुकिंगची सोय उपलब्ध होणार असल्याने वेळ आणि खर्च दोन्ही वाचतील.

प्रवाशांनी जवळच्या पोस्ट ऑफिसमध्ये जाऊन संपर्क साधायचा आहे. गाडीचे नाव, क्रमांक, प्रवास दिनांक, प्रवास सुरू करण्याचे ठिकाण आणि प्रवाशांची माहिती देऊन ओळखपत्र सादर करावे लागेल.

आवश्यक भाडे भरल्यानंतर तिकीटाची छापील पावती मिळेल. तिकीट रद्द करणे आणि परतावा मिळविणे हे सर्व व्यवहार याच पोस्ट ऑफिसमधून करता येतील. पीआरएस प्रणालीमुळे आता पोस्ट ऑफिसमध्ये २४ तास रेल्वे बुकिंग सेवा उपलब्ध राहणार आहे. रात्रीच्या गाड्यांसाठी किंवा तत्काळ आरक्षणासाठी ही सुविधा अत्यंत उपयुक्त ठरणार आहे.

पोस्ट ऑफिसमध्ये पीआरएस टर्मिनल बसवले जाणार असून, त्याद्वारे रेल्वे आरक्षण प्रणालीशी थेट जोडणी होईल. बुकिंगसाठी आवश्यक सॉफ्टवेअर, प्रिंटर आणि इंटरनेट कनेक्शनची सुविधा उपलब्ध करून दिली जाणार आहे.

### धाराशिव पोलीस दलाचा ‘सुरक्षादूत’ व्हॉट्सअॅप चॅटबॉट सुरू

**तुळजापूर, दि.२९, ऑक्टोबर -**
पोलीस अधीक्षक श्रीमती रितु खोखर यांच्या संकल्पनेतून धाराशिव पोलीस दलात ‘सुरक्षादूत’ नावाचा व्हॉट्सअॅप चॅटबॉट सुरू करण्यात आला आहे. नागरिकांना सुरक्षित, त्वरीत व पारदर्शक सेवा मिळाव्यात हा या उपक्रमाचा उद्देश आहे.या चॅटबॉटद्वारे गुन्हा नोंदवा (सिटीजन पोर्टल), वाहतूक सेवा, महिला व बाल सुरक्षा, सायबर गुन्हे जनजागृती, भाडेकरू माहिती, आपले सरकार सेवा, अभिप्राय आणि आपत्कालीन संपर्क अशा आठ सेवा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. नागरिकांनी ७७९६४२२५२५ या क्रमांकावर व्हॉट्सअॅपद्वारे Hi असा संदेश पाठवल्यास सर्व सेवांची यादी दिसेल. या उपक्रमाचे उद्घाटन विशेष पोलीस महानिरीक्षक विरेंद्र मिश्र यांच्या हस्ते करण्यात आले.

# सोशल मीडिया व नेटच्या जगात भारतीय संकृती जपा : शिवाजीराव भिकाणे

### ढाळेगाव पोस्ट बेसिक आश्रम शाळेत १९९२ आणि २००७ च्या विद्यार्थ्यांचा भावनिक मेळावा उत्साहात संपन्न...

**तभा वृत्तसेवा**
**अहमदपूर, दि.२९, ऑक्टोबर-**
दि. २५ ऑक्टोबर रोजी ढाळेगाव (ता. अहमदपूर) येथील पोस्ट बेसिक आश्रम शाळेत सन १९९२ आणि २००७ च्या इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांचा गेट-टुगेदर मेळावा मोठ्या उत्साहात पार पडला. तब्बल ३३ वर्षांनंतर भेटलेल्या जुन्या मित्रांच्या या मेळाव्याने शाळेचे परिसर जत्रेसारखे उत्साहमय वातावरण निर्माण झाले होते.

कार्यक्रमात विद्यार्थ्यांमध्ये आपुलकीचे संवाद, शिक्षक-विद्यार्थी यांचे आदरयुक्त भेटी, जुन्या आठवणींचा गोफ आणि भावनिक क्षणांची देवाणघेवाण झाली. अनेक विद्यार्थ्यांनी आपल्या आजच्या यशस्वी वाटचालीबद्दल बोलताना शाळेच्या आठवणींना उजाळा दिला.

या मेळाव्याचे अध्यक्षस्थानी भाजपचे ज्येष्ठ नेते व ढाळेगावचे उपसरपंच श्री. शिवाजीराव भिकाणे होते. आपल्या मार्गदर्शनपर भाषणात त्यांनी सांगितले की, आजचे युग गतिशील असून एआय आणि इंटरनेटच्या युगात आपल्या देशाची संस्कृती जपणे



ही प्रत्येकाची जबाबदारी आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ हे रामभक्त हनुमानांप्रमाणे राष्ट्रसेवेचे कार्य करीत आहेत, हे आपल्यासाठी प्रेरणादायी आहे.

कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे मुद्रिकाबाई भिकाणे, मोरे, पिचारे, माने, गोंड, घोगरे, कराड, तसेच सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक भारत गुंडरे यांनी केले, तर पिचारे आणि नितीन भिकाणे यांनी मार्गदर्शन केले. मेळाव्यात स्वर्गीय विठ्ठल जाधव यांच्या निधनाचा उल्लेख करून त्यांच्या कुटुंबाला मदत म्हणून सर्व वर्गमित्रांनी मिळून २८ हजार रूपयांची आर्थिक मदत ज्योती विठ्ठल जाधव यांच्या हस्ते सुपूर्द केली, ज्यामुळे कार्यक्रम भावनिक वातावरणात पार पडला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन महारुद्र कराड व रेखा बने यांनी केले, तर आभार प्रदर्शन सचिनराव भिकाणे यांनी मानले. या मैत्री मेळाव्याने जुन्या आठवणींना नवसंजीवनी देत, विद्यार्थ्यांमधील नाती आणखी दृढ केली.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, धाराशिव, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.
सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

# व्हिजन : श्री तीर्थक्षेत्र तुळजापूर विकासाचे...




तुळजापूर हे महाराष्ट्रातील साडेतीन शक्तिपीठांपैकी एक पूर्ण शक्तिपीठ असून छत्रपती शिवाजी म हाराजांना प्रेरणा देणारी कुलस्वामिनी आई श्री तुळजाभवानी देवी ही महिषासुर मर्दिनी, जगदंबा, तुकाई, रामवरदायिनी अशा विविध रूपांमध्ये पूजली जाते ते तीर्थक्षेत्र म्हणजे तुळजापूर नगरी होय.

हवा पाणी अन आई श्री तुळजाभवानी अशी बिरूदावली मिरवणाऱ्या धाराशिव जिल्ह्याची अभिमानास्पद ओळख असलेल्या तीर्थक्षेत्र तुळजापूरचा आता पूर्णतः कायापालट होणार आहे. जिल्ह्याला ऐतिहासिक,भौगोलिक आणि प्राचीन पर्यटनस्थळांचा वैभवशाली वारसा लाभला आहे. तुळजापूर विकास आराखड्याची कामे आगामी तीन वर्षांत पूर्ण होतील आणि मग तुळजापूरच्या नागरिकांसह देशभरातून येणाऱ्या भाविकांना विविध सुविधा मिळतील.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आमदार राणाजगजितसिंह पाटील यांच्या या स्वप्नाला बळ देत तुळजापूर तीर्थक्षेत्राच्या विकासासाठी १८६६ कोटी रुपयांचा निधी मंजूर केला आहे. स्वप्नांचा पाठलाग करणे तितके सोपे नसते. त्यासाठी तहान-भूक विसरून काम करावे लागते.

तुळजापूरचे आमदार, विकासाचे राज्याच्या धोरण ठरवणाऱ्या महाराष्ट्र इन्स्टिट्यूशन फॉर ट्रॉन्स्फॉर्मेशन अर्थात मित्रचे उपाध्यक्ष राणाजगजितसिंह पाटील यांनी तुळजाभवानी मातेच्या तीर्थक्षेत्राच्या विकासाचे स्वप्न पाहिले आहे. २०१९ विधानसभा निवडणुक प्रचारावेळी केंद्रीय गृहमंत्री अमित शहा भारतीय जनता पक्षाच्या प्रचारार्थ येथे आल्यानंतर वैष्णव देवीच्या धर्तीवर आणि वैश्विक दर्जाचे तुळजापूर तीर्थक्षेत्र करण्याचे आश्वासन त्यांनी दिले होते. प्रथमच तुळजापूर विधानसभा क्षेत्राचे आमदार प्रतिनिधी म्हणून राणाजगजितसिंह पाटील यांच्या



सातत्यपूर्ण प्रयत्नामुळे महाराष्ट्राची कुलस्वामिनी आई तुळजाभवानी देवीच्या तीर्थक्षेत्र विकासासाठी राज्य सरकारने ऐतिहासिक निर्णय घेतला आहे. तुळजापूर विकास आराखडा राज्य सरकारने मंजूर केला आहे. त्याचा भाविकांना फायदा होणार आहे.

तुळजापूर विकास आराखड्याची सुरूवात १९९२ मध्ये तिर्थक्षेत्र विकास योजना या माध्यमातून झाली. तत्कालीन मुख्यमंत्री आणि ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी तिर्थक्षेत्र विकास योजना जाहीर केली. ३ कोटी ६० लाख रूपये तुळजापूरसाठी मंजूर झाले. नगरविकास खात्याचे राज्यमंत्री अशोक चव्हाण असताना त्यांनी तुळजापूरमध्ये दिवसभर फिरून विकास आराखड्याच्या कामाला सुरूवात केली. राज्याचे तत्कालीन अर्थराज्यमंत्री दिलीपराव देशमुख हे राज्याच्या मंत्रिमंडळात असताना त्यांनी तुळजापूर विकासासाठी मोठे पाऊल उचलले. राज्याचे तत्कालीन मुख्यमंत्री विलासराव देशमुख झाल्यानंतर त्यांनी २००८ साली ३२५ कोटी रूपये देऊन तुळजापूर प्राधिकरणाचा आराखडा जाहीर केला होता.

कुलस्वामिनी आई तुळजाभवानी देवीच्या तीर्थक्षेत्र विकासासाठी देवेंद्र फडणवीस सरकारने ऐतिहासिक निर्णय घेतला आहे. १८६६ कोटी रूपयांच्या तुळजापूर तीर्थक्षेत्र विकास आराखड्यास शिखर समितीसह मंत्रिमंडळाने मान्यता दिली आहे. धाराशिव जिल्ह्याची अभिमानास्पद ओळख असलेल्या तीर्थक्षेत्र तुळजापूरचा आता पूर्णतः कायापालट होणार आहे. आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी कुलस्वामिनी तुळजाभवानी देवीच्या तीर्थक्षेत्र विकासासाठी व्यापक विकास आराखड्याची संकल्पना आपण मांडली होती. मात्र राज्यात महायुती सरकार आल्यानंतर प्राधान्याने हा विषय मार्गी लागला आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या महत्त्वाच्या आराखड्याकडे व्यक्तिशः लक्ष घातले असून तुळजापूर दौऱ्यावर आले असता त्यांनी जीर्णोध्दाराच्या कामांची पाहणी केली होती. आराखड्याचे सादरीकरण पाहत सर्व बाबी अत्यंत गांभीर्याने जाणून घेत काही महत्वाच्या सूचनाही केल्या होत्या व तत्वतः मंजुर देखील केला आहे.

या तीर्थक्षेत्र विकास आराखड्यात मुख्य दर्शन मंडपासह तेथील अनुषंगिक सोयी-सुविधांचा समावेश असणार आहे.

श्री तुळजाभवानी माता छत्रपती शिवाजी महाराजांना भवानी तलवार देत असतानाचा १०८ फुटाचे भव्य शिल्प जाणार आहे.

त्याचबरोबर घाटशीळ, सोलापूर महामार्ग, हडको आदी ठिकाणी भक्तनिवास, प्रसादालय, पुस्तकालय, भोजनालय आणि भाविकांसाठी विविध सोयी-सुविधांचे सुसज्ज केंद्र तयार केले जाणार आहे. तसेच वाहनतळ आणि वृंदावन गार्डनप्रमाणे अत्याधुनिक उद्यानही साकारले जाणार आहे. श्री तुळजाभवानी देवीच्या दर्शनासाठी येणाऱ्या वृध्द व दिव्यांग भाविकांकरिता लिफ्ट, ट्रॅव्हलेटर आदी बाबींचाही यात अंतर्भाव करण्यात आला आहे.

अंतिम विकास आराखड्याप्रमाणे प्रस्तावित करण्यात आलेल्या विकासकामांसाठी आवश्यक असलेल्या भूसंपादनाकरिता देखील मोठ्या प्रमाणात निधीची तरतूद यात करण्यात आली आहे. भूसंपादनाबरोबर शासनाच्या विविध करासाठी लागणारे शुल्क तसेच विकासकामांसाठी लागणारा निधी आदी बाबींना हिरवा कंदील मिळाल्यामुळे तुळजापूर आणि परिसराचा चेहरामोहरा अधिक ठळकपणे बदलला जाणार आहे. श्री तुळजाभवानी देवीचे तीर्थक्षेत्र वैश्विक दर्जाचे धार्मिक पर्यटन केंद्र म्हणून विकसित व्हावे यासाठी सर्वांच्या सहमतीने हा आराखडा स्वीकारण्यात आला आहे. पुजारी, भाविक व शहरवासीयांच्या सूचनांचा अभ्यास करून त्या सर्वांचे आक्षेप आणि सूचनांचा गांभीर्याने विचार करून या आराखड्यात समावेश करण्यात आला आहे. शहरात तसेच शहराकडून सोलापूर, बार्शी, धाराशिव, औसा आणि नळदुर्ग या पाचही दिशेला जाणार्या प्रमुख रस्त्यांवर तुळजापूर शहराच्या प्रवेशाजवळ आकर्षक आणि भव्य कमानी बसविण्यात येणार आहेत.

विकास आराखड्यासाठी जमिनीचे भूसंपादन केले जाणार आहे. त्यासाठी मंजूर करण्यात आलेल्या या अंतिम विकास आराखड्यात ३० % आर्थिक तरतूद केवळ भूसंपादन प्रक्रियेसाठी करण्यात आली आहे. त्यामुळे ज्यांची जागा तीर्थक्षेत्र विकासासाठी संपादीत केली जाणार आहे. भूसंपादनासाठी तुळजापूर शहरातील नागरिक आणि पुजारी बांधवांना विश्वासात घेवून भूसंपादन प्रक्रिया राबविली जाणार आहे.



### तुळजापूर येणार रेल्वेच्या नकाशावर!

सोलापूर- तुळजापूर- धाराशिव रेल्वेमार्गाचे काम सुरू आहे. हे काम येत्या दोन तीन वर्षांत पूर्ण होईल आणि तुळजापूर तीर्थक्षेत्र रेल्वेच्या नकाशावर येईल. त्यामुळे देशभरातील भाविकांना तुळजापूर गाठणे सोपे होणार आहे. सोलापूर- अक्कलकोट पंढरपूर तुळजापूर असेही एक सर्किट त्यानंतर तयार होईल. धार्मिक आस्थेचा हा सर्किट पर्यटन म्हणूनही विकसित होणार आहे. त्याद्वारे वर्षाकाठी येणाऱ्या भाविकांची संख्या ३ कोटींवर जाईल. या ३ कोटी भाविकांपैकी एक टक्का भाविकांनीही नळदुर्ग, तेर, येडशीचे पर्यटन केले तर या परिसराचा कायापालट होईल.

### शिवभवानीचे १०८ फूट शिल्प उभारणी

तुळजाभवानी माता छत्रपती शिवरायांना आशीर्वाद देत असतानाचे १०८ फूट उंचीचे भव्य शिल्प तुळजापुरात आता लवकरच साकारले जाणार आहे. अष्टभुजा 'शिवभवानी'चा अंगावर शहारे आणणारा प्रेरणादायी विचार त्यानिमित्ताने सर्व भाविकांना अनुभवता येणार आहे. हे शिल्प शिवछत्रपतींनी स्थापन केलेल्या स्वराज्याच्या प्रेरणेची जाज्वल्य गाथा आहे. या नियोजित भव्य शिल्पामुळे भाविकांना केवळ धार्मिक अनुभूतीच नव्हे तर स्वराज्यनिर्माते छत्रपती शिवाजी महाराज आणि छत्रपतींचे प्रेरणास्थान असलेल्या आई तुळजाभवानी देवीचा आशीर्वाद घेत असलेला अद्वितीय आणि अनुपम देखावा अनुभवता येणार आहे. हे शिल्प श्रद्धा आणि प्रेरणेचे रोमांचक प्रतीक असणार आहे. या प्रेरणादायी आणि भव्य शिल्पाभोवती आकर्षक परिसर विकास, प्रकाश योजना, संग्रहालय व माहिती केंद्र उभारण्यात येणार आहे. त्यामुळे तीर्थक्षेत्र तुळजापूरच्या सौंदर्यात आणखी वाढ होणार आहे. यामुळे तुळजापूरचे आध्यात्मिक आणि सांस्कृतिक वैभव नव्याने खुलणार आहे.

### पर्यटनातून रोजगारनिर्मितीला प्राधान्य !

धाराशिव जिल्ह्याला ऐतिहासिक, भौगोलिक आणि प्राचीन पर्यटनस्थळांचा वैभवशाली वारसा लाभला आहे. महाराष्ट्राची कुलस्वामिनी आई तुळजाभवानी देवीचे शक्तिपीठ आणि संतश्रेष्ठ गोरोबाकाका यांच्या भक्तिपीठाचे त्याला मोठे आशीर्वाद लाभलेले आहेत. पर्यटन विकासाच्या माध्यमातून रोजगार निर्मितीला प्रथम प्राधान्य देण्यासाठी जिल्ह्यातील सर्व पर्यटन स्थळांचा एकत्रित प्रारूप आराखडा करण्याचे निश्चित करण्यात आले आहे. धाराशिव जिल्ह्यातील पर्यटन विकासाच्या माध्यमातून रोजगार निर्मिती व आर्थिक सबलीकरणाच्या हेतूने नळदुर्ग, येडशी, तेर व येरमाळा आदी पर्यटन स्थळांचा एकात्मिक विकास करण्याचे निश्चित करण्यात आले आहे. नळदुर्ग येथील किल्ला व सभोवतालच्या नैसर्गिक संपत्तीचा योग्य वापर करत विकास साधला जाणार आहे. तसेच बसवसृष्टी व वसंतराव नाईक स्मारकासह इतर बाबींचा विचार करून ' रोप-वे', ' हॉट एअर बलून' यासारख्या साहसी क्रीडा प्रकारांचा देखील या आराखड्यात समावेश करण्यात येणार आहे. जिल्ह्यातील पर्यटनस्थळे विकसित करण्यासाठी युद्धपातळीवर काम हाती घेण्यात आले आहे.

### श्री तुळजाभवानी अभियांत्रिकी महाविद्यालय शासकीय बनणार !

तुळजाभवानी मंदिर संस्थान संचलित तीर्थक्षेत्र तुळजापूर येथील तुळजाभवानी अभियांत्रिकी महाविद्यालय राज्य शासनाला हस्तांतरित करण्याच्या प्रक्रियेला आता वेग आला आहे. उच्च व तंत्रशिक्षण विभागाने त्यासाठी पाच तज्ञ मान्यवरांची समिती गठित केली असून तुळजाभवानी अभियांत्रिकी महाविद्यालयाचा शासकीय महाविद्यालय होणार आहे. त्यामुळे मराठवाड्यातील हे तिसरे शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय ठरणार आहे. मराठवाड्यासह धाराशिव जिल्ह्यातील गरीब व होतकरु विद्यार्थ्यांची तुलनेत कमी असलेल्या शासकीय शुल्कामध्ये अभियांत्रिकी शिक्षणाची सोय होऊन या भागाचा शैक्षणिक व आर्थिक विकास व्हावा यासाठी श्री तुळजाभवानी मंदिर संस्थान संचलित श्री तुळजाभवानी अभियांत्रिकी महाविद्यालय शासनाकडे हस्तांतरित करावे यासाठी आमदार राणाजगजितसिंह पाटील यांचा आग्रह होता. त्याला आता यश मिळताना दिसत आहे. या निर्णयामुळे जिल्ह्यातील अर्थकारणाला आणखी बळकटी मिळणार आहे. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक शुल्कामध्येही मोठी बचत होणार आहे. तसेच विद्यार्थ्यांची शैक्षणिक गुणवत्ता व महाविद्यालयाचा दर्जा सुधारण्याकरिता मदत होणार आहे. या निर्णयामुळे धाराशिव जिल्ह्याच्या अर्थकारणाला बळकटी मिळणार असून गरीब व होतकरू विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षणासह मंदिर संस्थानच्या खर्चात देखील कपात होणार आहे. मराठवाड्यातील विद्यार्थ्यांसाठी जागा आरक्षित राहणार असल्याने गरीब व होतकरू विद्यार्थ्यांना याचा मोठा लाभ होणार आहे. महाविद्यालयाच्या कर्मचाऱ्यांना ७ व्या वेतन आयोगाप्रमाणे वेतन मिळणार आहे. तसेच शैक्षणिक दर्जा आणि गुणवत्ता वाढणार आहे.

### भाविक वाढले की, व्यवसायही वाढणार!

तुळजापुरात येणाऱ्या भाविकांना सर्व प्रकारच्या सुविधा मिळाव्यात, याकडे लक्ष देण्यात आले आहे. तुळजाभवानी मातेच्या दर्शनासाठी भाविकांना अडचण येणार नाही, याची काळजी घेतली जात आहे. परिणामी तुळजापुरात आलेल्या भाविकांना समाधान, आनंद मिळेल आणि तो पुन्हा दर्शनासाठी येईल. भाविकांची संख्या वाढली की तुळजापुरातील व्यवसायात नक्कीच वाढतील,यासाठी नियोजनबध्द काम हाती घेण्यात आले आहे. तीर्थक्षेत्रात येणारे भाविक वाढले की तुळजापूरचे अर्थकारणही वाढणार आहे. तुळजापूर आणि परिसराचा कायापलाट होणार हे नक्कीच.

**अनिल बाळू आगलावे**
**(तरुण भारत जिल्हा प्रतिनिधी धाराशिव)**

---

# केवळ दिवे लावणे नव्हे, तर दुसऱ्यांच्या आयुष्यातही उजेड निर्माण करणे हीच खरी दिवाळी : आ. राणाजगजितसिंह पाटील

**प्रभाग क्रमांक २० मधील १२७५ गरजू महिलांना दीपावली फराळ किटचे वाटप...**



## भाजप कार्यकर्ते विलास बापू लोंढे यांचा अभिनव उपक्रम

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.३० ऑक्टोबर -**

दीपावली हा आनंद, मंगल्यता आणि तेजाचा सण आहे. मात्र खऱ्या अर्थाने दिवाळी तीच, जी दुसऱ्यांच्या आयुष्यात उजेड पसरवते, असे प्रतिपादन तुळजापूर विधानसभा मतदारसंघाचे आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी केले.

प्रभाग क्रमांक २० मध्ये भाजप कार्यकर्ते विलास बापू लोंढे यांच्या पुढाकाराने तब्बल १२७५ गरजू महिलांना स्वादिष्ट दीपावली फराळ किटचे वाटप आ. पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. शेव, चकली, चिवडा, अनारसे, करंजी, पेढे, सोनपापडी, रसगुल्ले आदी विविध गोड पदार्थांचा समावेश असलेल्या या फराळ किटमुळे लाभार्थी महिलांच्या चेहऱ्यावर आनंद फुलला. कार्यक्रमात बोलताना आ. पाटील म्हणाले की, घरातील दिवे काही काळासाठी उजेड देतात, पण दुसऱ्याच्या आयुष्यात लावलेला दिवा कायमस्वरूपी प्रकाश निर्माण करतो. समाजातील गरजू घटकांपर्यंत मदतीचा हात पोहोचवणे, हीच खरी दिवाळी आहे. ते पुढे म्हणाले, आज समाजाला संवेदनशीलतेची आणि सहानुभूतीची गरज आहे. सण केवळ दिखाऊपणाचा नव्हे, तर माणुसकीचा उत्सव असावा. लोंढे यांनी गरजू महिलांना म णुसकीचा हात देत दिवाळीचा खरा गोडवा जपला आहे. त्यांच्या या कार्यातून अनेक तरुणांना समाजसेवेची प्रेरणा मिळेल.

आ. पाटील यांनी एकनिष्ठ कार्यकर्ते विलास बापू लोंढे यांच्या या सामाजिक उपक्रमाचे कौतुक करताना सांगितले की, लोंढे हे प्रभागातील नागरिकांना शासकीय योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी सदैव प्रयत्नशील असतात. त्यांच्या कार्यामुळे अनेक महिलांना आत्मनिर्भरतेचा नवा मार्ग सापडला आहे. त्यांच्या मागे आम्ही नेहमी खंबीरपणे उभे राहू. भावनिक स्वरात प्रतिक्रिया देताना विलास बापू लोंढे म्हणाले, प्रभाग क्रमांक २० हेच माझे कुटुंब आहे. या सर्व महिला माझ्या भगिनी आहेत. त्यांच्या आनंदात सहभागी होणे, ही माझी जबाबदारी आहे. मी जो काही आहे, तो केवळ राणादादांमुळे. त्यांनी आम्हाला सामाजिक बांधिलकीचा खरा अर्थ शिकवला आहे.

या कार्यक्रमाला आमदार राणाजगजितसिंह पाटील, भाजप कार्यकर्ते विलास बापू लोंढे, बिभीषण लोंढे, किसन पेठे, अजय चव्हाण, धीरज ताटे, वैभव नागठाणे, ओमकार झालटे, सद्दाम शेख, बापू चव्हाण, पंकज बनसोडे, सुरज कदम, रशीद शेख, गौस तांबोळी, महादेव पाटोळे, राजेंद्र मगर, योगेश थोरात यांच्यासह भाजप पदाधिकारी, कार्यकर्ते आणि लाभार्थी महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

# नळदुर्गात श्री ज्ञानेश्वरी पारायण सोहळ्याची भक्तिमय सांगता

## टाळ-मृदंगाचा गजर, विठूनामाचा जयघोष आणि फुगड्यांसह माऊलीच्या पालखीची भव्य मिरवणूक

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.३० ऑक्टोबर -**

टाळ-मृदंगाचा गजर, विठुनामचा जयघोष आणि फुगड्यांच्या रंगात न्हालेल्या भव्य माऊलीच्या पालखी मिरवणुकीने नळदुर्ग शहर भक्तिभावाने दुमदुमले. मराठा गल्ली येथे २३ ऑक्टोबरपासून सुरू असलेल्या श्री ज्ञानेश्वरी पारायण सोहळ्याची सांगता २९ ऑक्टोबर रोजी उत्साहात व भक्तिमय वातावरणात पार पडली.

गेल्या सात दिवसांपासून सुरू असलेल्या या पारायण सोहळ्यामुळे शहरात धार्मिकतेचे आणि अध्यात्मिकतेचे वातावरण निर्माण झाले होते. या काळात भजन, कीर्तन, गाथा भजन, काकडा आणि प्रवचनांसह विविध धार्मिक कार्यक्रम पार पडले.

२९ ऑक्टोबर रोजी सकाळी पसायदानानंतर श्री ढेरे महाराज यांचे काल्याचे कीर्तन पार पडले. या कार्यक्रमास शेकडो भाविक, विशेषतः महिलांचा उत्स्फूर्त सहभाग होता. त्यानंतर दुपारी सव्वा एक वाजता फुलांनी सजविलेल्या पालखीतून श्री माऊलींची भव्य मिरवणूक काढण्यात आली. ही मिरवणूक मराठा गल्ली येथून प्रारंभ होऊन पांचपीर चौक, भोई गल्ली, क्रांती चौक, चावडी चौक, महात्मा बसवेश्वर चौक, भवानी चौक, राम मंदिर, वीर सावरकर चौक, धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज चौक मार्गे पुन्हा मराठा गल्ली येथे संपन्न झाली. मार्गावरील प्रत्येक चौकात भाविकांनी रांगोळ्यांनी सजावट करून, फुलांची उधळण करत आणि विठूनामाचा जयघोष करत पालखीचं स्वागत केलं.



वीर सावरकर चौकात माजी नगरसेवक विनायक अहंकारी यांनी त्यांच्या निवासस्थानासमोर पालखीचे उत्साहात स्वागत केले. बाल वारकऱ्यांनी टाळ-मृदंगाच्या तालावर आकर्षक फुगड्या आणि पाऊलखेळ सादर करत वातावरण अधिक भक्तिमय बनवले.या संपूर्ण सोहळ्याच्या यशस्वी आयोजनासाठी पारायण समिती व शिवशाही तरुण मंडळाच्या पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले.

भक्तिभाव, उत्साह आणि अनुशासन यांचा सुंदर संगम घडवणारा हा सोहळा भाविकांच्या मनात कायमचा घर करून गेला.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



# सरदार १५० एकता अभियानात सहभागी व्हावे : जिल्हाधिकारी राहुल कर्डिले

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. २९ ऑक्टोबर-**

भारताचे लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल यांच्या १५० व्या जयंतीनिमित्त 'सरदार १५० एकता अभियान' अंतर्गत ३१ ऑक्टोबर ते १५ नोव्हेंबर २०२५ या कालावधीत विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. या अभियानात जिल्ह्यात ३१ ऑक्टोबर व ७ नोव्हेंबर २०२५ रोजी भव्य पदयात्रेचे आयोजन करण्यात आले आहे. या उपक्रमात जिल्ह्यातील महाविद्यालयीन विद्यार्थी, युवक आणि नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी केले आहे.

जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते. यावेळी जिल्हा युवा अधिकारी चंदा रावळकर, तसेच विविध प्रसारमाध्यमांचे प्रतिनिधी आदी उपस्थित होते.



या अभियानांतर्गत भारत सरकारच्या माय भारतच्या नेतृत्वाखाली 'सरदार१५० युनिटी मार्च' या देशव्यापी उपक्रमाची सुरुवात करण्यात येत आहे. याचे उद्दिष्ट देशातील युवकांमध्ये एकता, देशभक्ती आणि नागरी जबाबदारीची भावना जागृत करणे हे आहे. या मोहिमेद्वारे युवकांना त्यांच्या दैनंदिन जीवनात आणि नागरी सहभागातून 'एक भारत, आत्मनिर्भर भारत' या संकल्पनेची अंमलबजावणी करण्यास प्रोत्साहित केले जाईल.

या कालावधीत पदयात्रा, विविध स्पर्धा आणि प्रेरणादायी कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे. यामध्ये डिजिटल फेसवर सोशल मीडिया रील स्पर्धा, निबंध स्पर्धा, सरदार यंग लीडर्स प्रोग्राम अंतर्गत प्रश्नमंजुषा स्पर्धा, आरोग्य शिबिरे, सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जीवनावर व्याख्याने, ड्रग्ज मुक्त भारत प्रतिज्ञा इ. उपक्रमांचा समावेश आहे.

जिल्हाधिकारी कर्डिले यांनी सांगितले की, युवकांमध्ये राष्ट्रीय एकात्मतेची भावना बळकट करणे, तसेच विकसित आणि आत्मनिर्भर भारताच्या उभारणीत युवा पिढीला सक्रिय योगदान देण्यासाठी हे अभियान महत्त्वपूर्ण ठरणार आहे. यावेळी जिल्हास्तरीय पदयात्रा पोस्टरचे प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

नांदेड येथे ३१ ऑक्टोबर व ७ नोव्हेंबर रोजी जिल्हास्तरीय भव्य पदयात्रेचे आयोजन करण्यात आले आहे. ३१ ऑक्टोबर रोजी ही पदयात्रा जुना मोंढा ते जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन भवनापर्यंत काढण्यात येणार आहे. तरी या पदयात्रेत सर्व विद्यार्थी, नागरिक यांनी सहभागी व्हावे असे आवाहन करण्यात आले आहे. नांदेड जिल्ह्यातील सर्व विभाग, महाविद्यालयीन विद्यार्थी, युवक आणि नागरिकांनी या राष्ट्रीय उपक्रमात सक्रिय सहभाग नोंदवावा असे आवाहन जिल्हाधिकाऱ्यांनी केले आहे.

# भाजपा पक्षाच्या हाती सत्ता द्या,पुन्हा डबल विकासाचे पर्व सुरू होईल : आ. पवार

**तभा वृतसेवा**
**उमरी, दि. २९ ऑक्टोबर-**

उमरी शहरासाठी आमदार म्हणून आज पर्यंत कोट्यावधी विकासाठी निधी दिला या पेक्षा ही अधिक विकास असेल तर भाजप युती सरकारचे सत्तेत नगराध्यक्ष , नगरसेवक निवडून द्या मी विकास कामात कमी पडणार नाही अशी गव्हावी आमदार राजेश पवार यांनी उमरी शहरातील विकास कामाच्या उदघाटन सोळ्यात बोलत होते .

विकास कामाच्या मुद्दावर लोकाप्रिय जनता मला आमदार म्हणून दुसऱ्यादां निवडून दिली आहे त्यांचा परतफेड मी विकासाच्या माध्यामातून करणार आहे . केंद्रात व राज्यात भाजप युतीचे सरकार असून उमरी शहरातचा विकास अधिकरित्या हवा असेल तर भाजपाचा नगराध्यक्ष नगरसेवक असने आवश्यक आहे .

त्या अनुषंगाने भाजपा च्या हाती सत्ता द्या मी विकासाठी कमी पडू देणार नाही असे अभिवचन आ . राजेश पवार यांनी दिले आहे . उद्योजक मारोतराव कवळे यांनी राजकीय प्रहार करीत माझ्यावर



अरोप करण्याऱ्यानी पाच खांडसरी सारखे कारखान हडप्प केले त्यामुळे ग्रामीण भागातील तरुणाचा रोजगगर कमी झाला असा ही अरोप गोरठेकर यांचे नाव न घेता अप्रत्यक्ष टोला लगावला आहे .

या संदर्भात विकास कामाचे धुमधड्यात उदगाटन झाले तरी गोरठेकर घराण्या सोबत राहीलेली मंडळी व विरोद्धक एकत्र दिसून आल्याने पुन्हा राजकीय चर्चेला डाव मतदारा पुढे प्रश्न चिन्ह उभा राहीला आहे. मात्र आजच्या चर्चेत गोरठेकर घराण्याला १५ वर्ष सत्ता दिली आता इतर पक्षानां संधी द्यावी अशी चर्चा रंगत आहे पण गोरठेकर की भाजप महायुती हा प्रश्न समोर येत आहे.

राजकीय पक्ष परिर्वनचा गोलमाल , विकासाचे मुद्दे जन सामान्यात रुजणार विषय ठरला आहे . आ. राजेश पवार यांच्या हस्ते उमरी शहरात विविध विकास कामांचे भूमीपूजन झाले आहे. विकासाचे पर्व घेऊन लोकप्रतिनिधी आले असे ऐकीव होते पण प्रत्यक्षात त्याचे प्रत्यंतर उमरी शहरातील जनता घेत आहे.

शहरात सामाजिक सभागृहासाठी पूर्वी रु. १४.५० लक्ष निधी वितरित केला होता त्या सभागृहाचे एअरकुलिंग व फर्निचरसाठी आ. राजेश पवार यांनी दोन कोटीचा अतिरिक्त निधी दिलेला असून हुतात्मा स्मारक गोरठा रोडवर सदरचे काम प्रगतीपथावर आहे. उमरी शहरातील श्री. संत दासगणू नगरमधील मार्कंडेश्वर मंदीराचे परिसरात रु. १.५१ लक्ष ३० हजाराचे निधीतून संरक्षण भिंत, पार्किंग शेड, गार्डन, ओपनजिम व खेळाचे साहित्य अशा अद्ययावत गार्डनची भूमीपूजन, बौध्द विहार (व्यंकटेशनगर शेजारील भागात) रु. २२ लक्ष चे १३३३ स्केअर फुटसभागृहाचे बांधकामाचे भूमीपूजन, श्रीमती जानकाबाई माने यांचे घर ते नगर परिषद कार्यालय सी. सी. रोडचे भूमीपूजन अंदाजित किंमत रू. ५४ लक्ष, तसेच शहरातील पाणी पुरवठा व्यवस्थापनासाठी रु. २४ कोटी ज्यामध्ये २ पाणी साठवणूक टाकी, ज्याची क्षमता ६८८,०००,०० लिटर, १८०,०००,०० लिटर व ११०,०००,०० लिटर आहे तसेच २७ कि. मि. पाईप लाईन आदीं विकास कामांचा समावेश असून त्यासंपूर्ण कामांचे भूमीपूजन आ. राजेश पवार यांचे शुभ हस्ते करण्यात आला असून त्या कार्यक्रमास उद्योगपती तथा शेतकरी नेते मारोतराव कवळे गुरुजी ,माजी नगराध्यक्ष संजय कुलकर्णी, विजयकुमार उत्तरवार, शिवसेना शिंदे गटाचे तालूका अध्यक्ष तथा माजी नगराध्यक्ष सुभाष पेरेवार, उद्योजक म. खाजा म. सजन सेठ, भाजपाचे तालूका अध्यक्ष ज्ञानेश्वर सावंत, उमरी शहराध्यक्ष बालाजीराव ढगे, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रदेश सरचिटणीस डॉ. विक्रम देशमुख, तालूका अध्यक्ष ज्ञानेश्वर कदम, भाजपा जिल्हा उपाध्यक्ष बापुसाहेब कौडगावकर, शासकिय ठेकेदार संजीव सवई, बालाजीराव माचेवाड, किशोर पबितवार, सोनू वाघमारे, सौ. प्रणिता जोशी, सौ. दवनेताई, सौ. कांचन लोद, सौ. राणी ताई पोटेवाड, श्रीमती भारतबाई दुधंबे, नगरसेवक रतन खंदारे , संदिप गोवंदे संचिन खंडेलोटे , रोहीत देवसकवाड आदी मान्यवर अपस्थित होते भूमी पुजनाचे हे संपूर्ण कार्यक्रम आज दुपारी १२ वाजताचे पासून सुरू झाला असुन शहरातील नागरिकांनी ह्या भूमीपूजन कार्यक्रमास उपस्थित रहावे असे आवाहन भाजपा तालूका अध्यक्ष ज्ञानेश्वर सावंत आणि शहराध्यक्ष बालाजीराव ढगे यांनी केले आहे होते .

## भाजपाच्या वतीने शिंदे यांनी धनेगाव सर्कलमध्ये मतदारांशी साधला संवाद

**नवीन नांदेड-** नांदेड दक्षिण मतदार संघातील नव्याने उदयास आलेल्या जिल्हा परिषद सर्कल हे सर्वसाधारण महिलांसाठी सुटल्याने माजी जिल्हा



परिषद सदस्य मनोहर पाटील शिंदे यांनी दिनांक २९ सप्टेंबर रोजी सर्कलमधील गावोगावी जाऊन मतदारांच्या भेटीगाठी घेऊन संवाद साधला. नांदेड जिल्ह्यातील नांदेड दक्षिण मतदार संघात नव्याने निर्माण झालेले जिल्हा परिषद सर्कल हे सर्वसाधारण महिला आरक्षण सुटल्याने या सर्कल मधील सर्वच गावातून मतदारांच्या गाठीभेटी घेऊन आपला मतदारांना विश्वासात घेऊन आश्वासन दिले की गेली पाच वर्ष आपण या सर्कलमध्ये जिल्हा परिषद सदस्य असताना भरपूर विकासात्मक कामे केली यापुढेही सर्कल मधील कुठलीही विकासात्मक कामे अपुरे राहू देणार नाही असे मत मनोहर पाटील शिंदे यांनी मतदारासमोर व्यक्त केले.यावेळी सर्कलमधी मतदारांशी संवाद अभियान राबवत धनेगाव सर्कल मध्ये कमळमय वातावरण तयार केले असल्याचे चित्र दिसून येते. संवाद अभियानात माजी सरपंच भुजंगराव भालके, सरपंच पिंटू पाटील शिंदे, रमेश वाघमारे, राजेश बोटलवार, शिवाजी बुचडे, शेख एजाज, तातेराव ढवळे, निलेश भालके, जळबाजी बुचडे, गोपीचंद धनेगावकर, मारुती संगेकर, शैलेश ठाकूर, मारुती तळणे आदींचा सहभाग होता.

## राष्ट्रवादी काँग्रेसच्या कंधार-लोहा तालुका निरीक्षकपदी मोहनअण्णा हंबर्डे

**नवीन नांदेड** -आगामी स्थानिक स्वराज संस्था निवडणुकीच्या अनुषंगाने



राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्यावतीने कंधार आणि लोहा तालुक्यासाठी निरीक्षक म्हणून दक्षिण विधानसभा मतदारसंघाचे माजी आमदार मोहनअण्णा हंबर्डे नेताजीराव भोसले व डॉ.आशिया कौसर यांची नियुक्ती करण्यात आली आहे. जिल्हा परिषद, पंचायत समिती व नगर परिषद निवडणुकीच्या अनुषंगाने कंधार शहरातील आ.प्रतापराव पाटील चिखलीकर यांचे कार्यालय येथे शुक्रवार, दि.३१ ऑक्टोबर २०२५ रोजी स.१०.०० वाजता इच्छुक उमेदवारांच्या मुलाखती घेण्यात येणार आहेत. व दुपारी १.०० वाजता आ.प्रतापराव पाटील चिखलीकर यांचे लोहा शहरातील बस स्थानकाजवळील संपर्क कार्यालयात इच्छुकांच्या मुलाखती माजी आ.मोहनअण्णा हंबर्डे, नेताजीराव भोसले डॉ.आशिया कौसर यांच्या उपस्थितीत पार पडणार आहेत. जिल्हा परिषद पंचायत समिती नगरपरिषद निवडणुक लढू इच्छुक पदाधिकाऱ्यांनी वरील ठिकाणी उपस्थित राहून मुलाखती देण्याचे आव्हान राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे कंधार तालुकाध्यक्ष मनोहरराव भोसीकर व लोहा राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे तालुकाध्यक्ष छत्रपती स्वामी यांनी केले आहे.

## आमदार चिखलीकर यांनी संधी दिल्यास पं.स.हळदा गणातुन निवडणुक लढवणार

**कंधार** -आगामी होणाऱ्या स्थानीक स्वराज निवडणुकीत शिराढोण



जिल्हा परीषेद सर्कल मधील पंचायत समिती हाळदा गणातुन कंधार लोहा मतदार संघाचे आमदार प्रतापराव पाटिल चिखलीकर यांनी संधी दिल्यास राष्ट्रवादी काग्रेस अजित पवार गटाकडून पुर्ण ताकदिनीशी निवडणुक लढवणार आसल्याची माहीती सचिन पाटिल शिंदे यांनी दैनिक तरुण भारत प्रतीनिधीशी बोलताना दिली . सचिन पाटील शिंदे हे राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे माजी तालुकाध्यक्ष आणि हाळदा ग्रामपंचायत चे माजी उपसरपंच व माजी सरपंच अशा विविध पदावर आसताना हाळदा गणातील जनतेंची अनेक प्रश्न मार्गी लावलेले आहेत त्याच बरोबर सामाजीक चळवळीत सक्रिय सहभाग घेणारे गावातील व परिसरातील गोरगरिबांचे प्रश्न तळमळीने सोडविणारा कार्यकर्ता म्हणून त्यांची ओळख शिराढोण सर्कलमध्ये निर्माण केलेली आहे . राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी व आमदार चिखलीकर या युवा नेत्यास संधी देतील का हे तितकेच महत्त्वाचे आहे .हाळदा गणातील व परिसरातील गावांमधुन सचिन पाटील शिंदे यांनाच उमेदवारी मिळावी अशी मागणी सर्व सामान्य गोरगरीब जनतेतुन जोरदार पणे होत आसताना दिसत आहे.

## काँग्रेस प्रदेशाध्यक्ष सपकाळ यांचा माहूरच्या तुपदाळे दाम्पत्यांकडून सत्कार

**माहूर**-जिल्हा काँग्रेस पक्ष कार्यालय, नांदेड येथे प्रदेश अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्या प्रमुख उपस्थितीत त्यांचे मार्गदर्शनाखाली पक्षाची आढावा बैठक नुकतीच संपन्न झाली. यावेळी नांदेड लोकसभेचे खासदार रविंद्र चव्हाण, जिल्हा अध्यक्ष राजेश पावडे यांची प्रमुख उपस्थिती होती.यावेळी प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांचा माहूर नगरपंचायतच्या माजी उपनगराध्यक्षा सौ.अश्विनी आनंद पाटील तुपदाळे व काँग्रेसचे जिल्हा सरचिटणीस आनंद गंगाधरराव पाटील तुपदाळे या दंपतीकडून हृदय सत्कार करण्यात आला.याप्रसंगी जगदीश गंगाधरराव पाटील तुपदाळे,जमीर खान,सादिक शेख,शरीफ शेख, मन्नाण शेख इत्यादी माहूर तालुका काँग्रेस कमिटीचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# अवैध रेती उत्खनन करणारे साहित्य नष्ट; नांदेड महसूल पथकाची कारवाई

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. २९ ऑक्टोबर-**

जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांच्या मार्गदर्शनाखाली आज २९ ऑक्टोबर २०२५ रोजी उपविभागीय अधिकारी डॉ. सचिन खल्लाळ, तहसीलदार संजय वारकड, नायब तहसीलदार स्वप्निल दिगलवार, मंडळ अधिकारी कुणाल जगताप, अनिरुद्ध जोंधळे, मोहसीन सय्यद, ग्राम महसूल अधिकारी, मनोज जाधव, माधव भिसे, बरोडा श्रीरामे, जमदाडे, मनोज सरपे, महेश जोशी, महसूल सेवक बालाजी सोनटक्के, शिवा तेलंगे या महसूल पथकाने विष्णुपुरी



परिसरामध्ये पहाटे ५ वाजता अवैध रेती उत्खनन प्रतिबंधासाठी गस्तीवर असताना रेती उत्खनन करणारे २ मोठ्या बोटी, एक छोटी बोट व ४ इंजिन आढळून आले.

या पथकाने मजुरांच्या साह्याने ३ बोटी व ४ इंजिन जिलेटीने स्फोट करून नष्ट केले. तसेच ३० तराफे जाळून नष्ट केले, असे एकूण ६३ लाख किंमतीचा मुद्देमाल जाग्यावरच स्फोट करून नष्ट केला. एक अवैध वाहतूक करणारी हायवा एमएच २६ बीसी ४८९२ जप्त करून तहसील कार्यालय परिसरामध्ये लावण्यात आला आहे. सदर हायवावर दंडात्मक फौजदारी स्वरूपाची कारवाई करण्याची तजवीच करण्यात आली आहे.

या कारवाई दरम्यान पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांनी नांदेड ग्रामीण पोलीस स्टेशनचे पोलीस उपनिरीक्षक ज्ञानेश्वर भोसले व पोलीस जमादार शिंदे, श्री. घुगे व श्री. जाधव यांचे पोलीस पथक उपलब्ध करून दिले. अवैध उत्खननासंदर्भात नांदेड महसूल प्रशासन सक्तीने कारवाई करेल असा इशारा नांदेडचे उपविभागीय अधिकारी डॉ. सचिन खल्लाळ व तहसीलदार संजय वारकड यांनी दिला आहे.

## पशुधन पर्यवेक्षक भरतीसाठी लवकरच मंत्रालयात उपोषण

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. २९ ऑक्टोबर-**

महाराष्ट्रातील पशुसंवर्धन विभागातील पशुधन पर्यवेक्षक पदभरती तात्काळ जाहीर करण्याच्या मागणीसाठी राज्यातील असंख्य विद्यार्थी लवकरच मंत्रालय, मुंबई येथे अमरन उपोषणास बसण्याच्या तयारीत आहेत. या आंदोलनाला राष्ट्रवादी विद्यार्थी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाकडून ठाम पाठींबा देण्यात आला असून फैसल सिद्दीकी यांनी याबाबत तीव्र भूमिका घेतली आहे.

ग्रामीण भागात लम्पी (चर्मरोग) या रोगाने मोठ्या प्रमाणावर जनावरे बाधित होत असून पूर आणि पावसाने पशुधनाचे मोठे नुकसान झाले आहे. एक जनावर दगावणे म्हणजे गोरगरीब शेतकऱ्याच्या संसाराचा आधार कोसळणे, असे या आंदोलनकर्त्यांचे मत आहे.

## लोहगावात श्रावण पाटील भिलवंडेंची 'राजकीय चाल आ.अंतापुरकरांच्या उपस्थितीत उमेदवारी अर्ज दाखल ; प्रतिस्पर्ध्यांच्या गोटात खळबळ

**तभा वृतसेवा**
**नरसी, दि. २९ ऑक्टोबर-**

येथून जवळ असलेल्या लोहगाव जिल्हा परिषद गटात आगामी निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर आज एक मोठी राजकीय चाल खेळली गेली. श्रावण पाटील भिलवंडे यांनी आज (दि. २९ ऑक्टोबर) आमदार जितेश अंतापुरकर यांच्या उपस्थितीत पक्षश्रेष्ठीकडे उमेदवारी मागणीचा अर्ज दाखल करून आपली दावेदारी अधिकृत केली. या हालचालीमुळे लोहगाव गटातील राजकारणात चैतन्य आणि प्रतिस्पर्ध्यांच्या गोटात खळबळ निर्माण झाली आहे.



अर्ज दाखल करण्याच्या वेळी कार्यकर्त्यांचा मोठा उत्साह पाहायला मिळाला. भिलवंडे यांनी यावेळी बोलताना ते म्हणाले, लोहगाव परिसरातील सर्वसामान्य जनतेच्या मूलभूत प्रश्नांवर आवाज उठवण्यासाठी, तसेच ग्रामविकासाचा नवा अध्याय सुरू करण्यासाठी आम्ही मैदानात उतरलो आहोत. गावागावातील अडथळे दूर करून विकासाची गंगा वाहवणे हेच आमचे उद्दिष्ट आहे.

दरम्यान, आमदार जितेश अंतापुरकर यांनीही या प्रसंगी कार्यकर्त्यांशी संवाद साधत, लोहगाव गटात पक्षसंघटन मजबूत करून विकासाचे राजकारण पुढे नेणे आवश्यक आहे असे सांगितले. लोहगाव गटातील या उमेदवारीमुळे स्थानिक राजकारणात नवीन समीकरणे तयार होत असून, प्रतिस्पर्धी इच्छुकांच्या गणितात बदल होण्याची दाट शक्यता आहे. राजकीय पटलावर भिलवंडेंनी टाकलेली ही चाल 'खेळी' ठरू शकेल का, हे आगामी काही दिवसांत स्पष्ट होईल!

# दरोड्याच्या तयारीत असलेले दोन गुन्हेगारांना अटक

**तभा वृतसेवा**
**नरसी, दि. २९ ऑक्टोबर-**

जिल्ह्यात पोलीस अधीक्षक अविनाश कुमार यांच्या मार्गदर्शनाखाली सुरु असलेल्या ऑपरेशन फ्लश आऊट मोहिमेअंतर्गत रामतीर्थ पोलिसांनी मोठी कारवाई करत दोन संशयित गुन्हेगारांना फिल्मी स्टाईलने पकडण्यात यश मिळवले आहे. या दोघांकडून धारदार हत्यारे, दोन वाहने व मोबाईलसह तब्बल १० लाख २१ हजार १०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.



याबाबत रामतीर्थ पोलिसांनी दिलेली सविस्तर माहिती अशी की, रामतीर्थ पोलीस ठाण्याचे सपोनि विक्रम हराळे व देगलूर पोलीस ठाण्याचे पोनि मारोती मुंडे हे त्यांच्या पथकासह गस्तीदरम्यान असताना खात्रीशीर माहिती मिळाली की, पांढरी पिकअप व डिझायर कारमधून काही संशयित शस्त्रांसह देगलूरहून नरसीकडे निघाले असून, ते दरोड्याचा गंभीर गुन्हा करण्याच्या तयारीत आहेत.

त्यानुसार दोन्ही अधिकाऱ्यांनी तत्काळ आपले पथक तयार करून वाहनांचा पाठलाग केला. दिनांक २९ ऑक्टोबर रोजी पहाटे ४ वाजता मौजे डोनगाव (खु.) शिवारात संशयित वाहनांना थांबवण्यात आले. तपासाअंती कर्तारसिंग हत्यारसिंग टाक (रा. इंद्रानगर, कळमनुरी, जि. हिंगोली) व सुर्यकांत रामराव कुगावकर (रा. माळेगाव, ता. कळमनुरी, जि. हिंगोली) असे दोघे संशयित पकडले गेले, तर इतर तीन जण अंधाराचा फायदा घेऊन पसार झाले.

झडतीदरम्यान धारदार तलवार, चाकू, लोखंडी पाईप, स्टील रॉड, मोबाईल फोन, तसेच दोन वाहने बोलेरो पिकअप व डिझायर कार असा मुद्देमाल जप्त करण्यात आला. प्राथमिक तपासात आरोपी हे हिंगोली जिल्ह्यातून नांदेड जिल्ह्यात दरोडा घालण्यासाठी आले असल्याचे निष्पन्न झाले आहे. या प्रकरणी पोलीस ठाणे रामतीर्थ येथे गुन्हा दाखल करण्यात आला असून, दोन्ही आरोपींना अटक करून पोलीस कोठडीत (झउठ) ठेवण्यात आले आहे. पुढील तपास सुरु आहे.

या कारवाईबद्दल पोलीस अधीक्षक अविनाश कुमार यांनी रामतीर्थ पोलीस ठाण्याचे सपोनी विक्रम हराळे व देगलूर पोलीस ठाण्याचे पो.नि. मारोती मुंडे व अंमलदारांचे कौतुक केले असून, त्यांच्या कार्याचे सर्वत्र कौतुक होत आहे.

# पराभूत उमेदवारांच्या नादी लागू नका विकासासाठी चिखलीकर कुटुंब सक्षम : प्रवीण पाटील चिखलीकर

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. २९ ऑक्टोबर-**

लोहा कंधार विधानसभा मतदारसंघातील प्रत्येक गावाच्या सर्वांगीण विकासासाठी आ. प्रतापराव पाटील चिखलीकर आणि चिखलीकर कुटुंबीय सक्षम आहे. त्यामुळे पराभूत आणि लबाडांच्या नादी लागू नका असे आवाहन माजी जिल्हा परिषद सदस्य परवीन पाटील चिखलीकर यांनी केले

आलेगाव ते आनंदनगर येथील एक कोटीच्या सीसी रस्त्याचे भूमिपूजन जिल्हा परिषद सभापती तथा राष्ट्रवादीचे प्रदेश सरचिटणीस प्रवीण पाटील चिखलीकर यांच्या हस्ते संपन्न झाले. यावेळी ते नागरिकांशी बोलत होते.

पुढे ते म्हणाले, या सर्कलमध्ये गेल्या पाच वर्षांच्या काळात रस्ते, नाले आणि विकासाच्या योजना राबविल्या. जिल्हापरिषदेच्या विविध योजना जनतेपर्यंत पोहचविल्या आहेत. आलेगावच्या पाणंद रस्त्यासाठी १३ लाख रुपयांचा निधी अन्य कामांसाठी ३०लक्ष रुपयांचा निधी खेचून आणला. आलेगाव आणि चिखलीचे आमचे संबंध कै. शांतीदूत गोविंदराव पाटील चिखलीकर यांच्यापासूनचे आहेत.




त्यामुळे येणाऱ्या निवडणुकीमध्ये आपला आशीर्वाद आमच्या पाठीशी ठामपणे राहु्या. निवडणूक जवळ आला की जातीवाद करणाऱ्या लोकांची संख्या मोठ्या प्रमाणावर वाढत असते. लोकांची दिशाभूल करणे, हा त्यांचा कायमचा धंदा झाला आहे. त्यामुळे जनतेने संभाळून रहावे. चिखलीकर कुटुंबाने कधीही जातीवाद केला नाही. १९८४ मध्ये चिखली येथे शैक्षणिक संस्था उभारून या भागात शिक्षणाची गंगा आणली. त्यामुळे या भागातून असंख्य विद्यार्थी विविध शासकीय सेवेत रुजू झाले. स्वतःचा विकास करताना समाजाचा आणि राष्ट्राचा विकास करण्यासाठी त्यांनी हातभार लावला आहे. त्यामुळे चिखलीकर कुटुंबांनी नेहमीच सर्वांच्या विकासासाठी प्रामाणिक प्रयत्न केले आहेत. हे कुटुंब सर्वांना सोबत घेऊन चालणारे आहे. आम्ही तुमच्या सुखात आणि दु:खात नेहमीच सहभागी आहोत. चिखली आणि सावळेश्वर हे दोन्ही गावे बारूळ जिल्हा परिषद गटात गेल्याने काही लोक आनंदी होत आहेत. परंतु या भागातही आ. चिखलीकर यांचा मोठा संपर्क आहे. त्यामुळे या गटातही चिखलीकर साहेबांचे जिवाभावाचे लोक आहेत.त्यामुळे या भागातही लबाडांना संधी मिळणार नाही. विरोधकांना येथे आतापासूनच पराभव दिसू लागला असल्याने ते बिथरले आहेत. काहीही आरोप ते करतील. भूलथापा मरतील त्यामुळे अशा भूलथापाना बळी पडू नका असे आवाहन प्रवीण पाटील चिखलीकर यांनी यावेळी केले. कार्यक्रमाला माजी सभापती आनंदराव पाटील शिंदे ढाकणीकर, पंचायत समीतीचे माजी सभापती शंकरराव ढगे, माजी पंचायत समिती सदस्य विजय मदावाड बसलिंग भुरे नाना पाटील इंगोले वैजनाथ पाटील घोरबांड,विनायक पाटील,साईनाथ कपाळे, सुरेश मामा पाष्टे, केशव पाटील सावळेश्वरकर, यांच्यासह परिसरातील पदाधिकाऱ्यांची उपस्थित होते .

यावेळी माजी सरपंच बालाजी पाटील वरताळे, उपसरपंच प्रकाशराव पाटील मोरे, ग्राप सदस्य मोहन मोरे, मारोती मोरे, दादाराव मोरे,आनंदा मोरे, शहाजी मोरे, माधवराव मोरे, यांच्यासह आले गावातील शेकडो ग्रामस्थ पदाधिकारी उपस्थित होते. प्रास्ताविक संग्राम मोरे यांनी केले तर आभार परमेश्वर पाटील मोरे यांनी मानले.

## एकता दिनानिमित्त मॅरेथॉन स्पर्धेचे आयोजन

**तभा वृतसेवा**
**अर्धापूर, दि. २९ ऑक्टोबर-**

अर्धापूर पोलीस प्रशासनाच्या वतीने दि. ३१ ऑक्टोंबर रोजी राष्ट्रीय एकता दिनानिमित्त मरॉथान स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धेतील विजेत्यांना आकर्षक बक्षिसासह ट्रॉफी प्रदान करण्यात येणार आहे. त्यासाठी जास्तीत जास्त खेळाडूसह युवक युवतींनी या स्पर्धेत सहभाग घ्यावा. असे आवाहन पोलीस निरीक्षक चंद्रशेखर कदम यांनी केले आहे.



राष्ट्रीय एकता दिवसाचे औचित्य साधून अर्धापूर पोलीस प्रशासनाने दि. ३१ ऑक्टोंबर रोजी सकाळी ६.०० वाजता मरॉथान स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. ही स्पर्धा वसमत फाटा महामार्ग पोलीस चौकी ते पार्डी बायपास पर्यंत तीन किलोमीटर अंतराची राहणार असून या स्पर्धेतील विजेत्यांना प्रथम क्रमांक ५ हजार रुपये, द्वितीय क्रमांक ३ हजार रुपये, तृतीय क्रमांक २ हजार रुपये रोख व ट्रॉफी आणि उत्तेजनार्थ विजेत्यांना आकर्षक ट्रॉफी बक्षीस दिले जाणार आहे.

या मॅरेथॉन स्पर्धेत सहभागी होण्यासाठी इच्छुक स्पर्धकांनी अर्धापूर पोलीस ठाणे कार्यालयात रुम नंबर ३ मधील पोलीस जमादार भिमराव राठोड यांच्याकडे आपल्या ओळखपत्रासह नांव नोंदणी करावी. असे आवाहन अर्धापूर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक चंद्रशेखर कदम यांनी एका प्रसिध्दी पत्रकाद्वारे केले आहे.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.
सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

# नांदगाव-भूम मार्ग खड्डेमय; नागरिक त्रस्त

## प्रशासन झोपेत... अपघातांचे प्रमाण वाढले... एस.टी. बससेवा बंद होण्याच्या मार्गावर...

**तभा वृत्तसेवा**
**वाशी, दि.२९ ऑक्टोबर -**

धाराशिव जिल्ह्यातील वाशी तालुक्यातील नांदगाव-भूम हा प्रमुख मार्ग आज अक्षरशः खड्डेमय झाला असून, वाहनधारकांना प्रचंड त्रास सहन करावा लागत आहे. रस्त्यावर जागोजागी पडलेल्या मोठ्या खड्ड्यांमुळे प्रवास धोकादायक बनला आहे.

या रस्त्याची स्थिती इतकी बिकट झाली आहे की एस.टी. बससेवा बंद पडण्याच्या मार्गावर आली आहे. नांदगाव-भूम हा मार्ग पुढे नगर-जामखेडमार्गे थेट शिर्डीला जोडतो, त्यामुळे कर्नाटक, आंध्रप्रदेश आणि तामिळनाडू येथील भाविक या मार्गाने साईबाबांच्या दर्शनासाठी येतात. मात्र रस्त्याची दुरवस्था पाहता अनेकांनी आता हा मार्ग टाळण्यास सुरुवात केली आहे.

खड्ड्यात रस्ता की रस्त्यात खड्डा हेच आता ओळखता येत नाही, अशी व्यंग्यात्मक प्रतिक्रिया स्थानिक नागरिक व्यक्त करत आहेत. या खराब रस्त्यामुळे अपघातांचे प्रमाण वाढले असून वाहनधारक आणि ग्रामस्थांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त केली जात आहे.

संबंधित विभाग मात्र अजूनही गाढ झोपेत असल्याचे चित्र दिसत आहे. या रस्त्याची दुरुस्ती कधी होणार आणि प्रशासनाला नेमकी कधी जाग येणार? असा संतप्त प्रश्न नागरिकांनी उपस्थित केला आहे.



# पदवीधर नोंदणी अभियानात शिक्षकांनी पुढाकार घ्यावा

## उमाकांत कुलकर्णी यांचे आवाहन...

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२९ ऑक्टोबर -**

जुनी पेन्शन योजना, टीईटीसह अन्य प्रलंबित प्रश्न सोडविण्यासाठी मराठवाड्यातील शिक्षक-प्राध्यापकांनी पदवीधर मतदार नोंदणी अभियानात पुढाकार घ्यावा, असे आवाहन महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषदेचे नोंदणी प्रमुख तथा राज्य कार्याध्यक्ष उमाकांत कुलकर्णी यांनी केले आहे.



प्रसिद्धीपत्रकात त्यांनी म्हटले आहे की, लोकशाही निवडणूक प्रक्रिया गतिमान, पारदर्शक आणि निर्दोष होण्यासाठी शिक्षक, प्राध्यापक तसेच पदवीधर नागरिकांचा सक्रिय सहभाग आवश्यक आहे. शिक्षक कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन योजना लागू करण्यासंदर्भात राज्य शासनाने अद्यापही सर्वोच्च न्यायालयात सकारात्मक शपथपत्र दाखल केलेले नाही. तसेच १३ फेब्रुवारी २०१३ पूर्वी नियुक्त शिक्षकांना टीईटी परीक्षा अनिवार्य न करण्याबाबतची पुनर्विचार याचिका देखील शासनाने दाखल केलेली नाही.

या आणि इतर प्रलंबित मागण्या सोडविण्यासाठी तसेच बेरोजगार पदवीधर तरुणांच्या रोजगाराला प्राधान्य देणारा लोकप्रतिनिधी विधान परिषदेत निवडून जाण्यासाठी पदवीधर मतदार नोंदणी मोहिमेत शिक्षक, प्राध्यापक, मुख्याध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी तसेच पदवीधर युवकांनी सहभागी व्हावे, असे आवाहन त्यांनी केले.

नोंदणी करताना अडचण आल्यास रमेश गटकळ, भगवान चाटे, शिवकुमार मुरगे, दिलीप कुंदे, काकासाहेब जाधव, सुधाकर घायतडक, दिलीप अग्रवाल, उत्तम केंद्रे, अनिल मैड, विशाल शिंदे, तुळजादास देशपांडे, गोविंद केंद्रे, सुनिल मैड या पदाधिकाऱ्यांशी संपर्क साधावा, असेही त्यांनी नमूद केले आहे.

# ‘सूर्याची पिल्ले’ नाटकाच्या टीमने घेतले तुळजाभवानीचे दर्शन

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.२९ ऑक्टोबर -**

सुप्रसिद्ध नाटककार वसंत कानेटकर लिखित ‘सूर्याची पिल्ले’ या गाजलेल्या नाटकाच्या संपूर्ण टीमने आज सकाळी श्री तुळजाभवानी देवींचे दर्शन घेतले. लातूर येथे या नाटकाचा प्रयोग होणार असल्याने सर्व कलाकार विशेषतः देवीदर्शनासाठी तुळजापूरात दाखल झाले होते.

नाटकातील प्रमुख कलाकार सुनील बर्वे, आनंद इंगळे, पुष्कर श्रोत्री, अनिकेत विश्वासराव, अतिशा नाईक, शर्वरी पाटणकर, उमेश जगताप आणि सुहास परांजपे यांनी सकाळी श्री तुळजाभवानी देवींचे मनोभावे दर्शन घेऊन आरती केली. दर्शनावेळी कलाकारांमध्ये अपार श्रद्धा आणि प्रसन्नतेचे वातावरण पाहायला मिळाले.

या प्रसंगी श्री तुळजाभवानी मंदिर संस्थानच्या वतीने तहसीलदार तथा व्यवस्थापक माया माने यांनी सर्व कलाकारांना देवीची प्रतिमा भेट देऊन सन्मानित केले. यावेळी जनसंपर्क अधिकारी अनिरुद्ध देशपांडे, नागेश शितोळे तसेच इतर अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.



# पवार घराण्याचा दरारा कायम; म्हशी पळविण्याच्या स्पर्धेत सोमनाथ व प्रशांत पवार यांचे यश

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.२९ ऑक्टोबर -**

दिवाळी सणानिमित्त नळदुर्ग, वसंतनगर आणि अणदुर येथे घेण्यात आलेल्या म्हशी पळविण्याच्या स्पर्धांमध्ये नळदुर्ग येथील सोमनाथ पवार व प्रशांत पवार यांनी उल्लेखनीय यश मिळवले आहे. नळदुर्ग आणि वसंतनगर येथील स्पर्धांमध्ये त्यांनी पहिला क्रमांक, तर अणदुर येथील स्पर्धेत तिसरा क्रमांक मिळवून पवार घराण्याचा म्हशी पळविण्याच्या क्षेत्रातील दरारा पुन्हा अधोरेखित केला आहे.



नळदुर्ग शहरात दिवाळी सणानिमित्त म्हशी पळविण्याची परंपरा तब्बल शंभर वर्षांपासून चालत आली आहे. ही परंपरा पवार कुटुंबाने अतिशय लयबद्ध, शिस्तबद्ध आणि उत्साहपूर्ण पद्धतीने जपली आहे. सुरुवातीला कै. परसराम पवार यांनी म्हशी पळविण्याच्या स्पर्धेत भाग घेऊन या परंपरेची सुरुवात केली. त्यानंतर त्यांचे ज्येष्ठ चिरंजीव शिवाजीराव पवार आणि दुसरे चिरंजीव कै. रमेश पवार यांनीही या परंपरेला नवी दिशा दिली.

सध्या शिवाजी पवार यांनी वयोमानानुसार म्हशी पळविण्याचा मान आपल्या पुत्रांना - सोमनाथ पवार व प्रशांत पवार - यांच्याकडे दिला आहे.

यावर्षीच्या स्पर्धांमध्ये पवार बंधूंसोबत पार्थराजे महेश जाधव या छोट्या मुलानेही उत्साहाने सहभाग घेत, सुंदरपणे म्हशी पळवून नागरिकांचे लक्ष वेधून घेतले. तीनही ठिकाणच्या आयोजकांनी रोख रक्कम आणि चषक देऊन विजेत्यांचा सत्कार केला.

म्हशी पळविणे हे धाडस, कौशल्य आणि शिस्त यांचे संगम असलेले खेळ आहे. या खेळात थोडीशी चूकही जीवावर बेतू शकते, तरीही शिवाजी पवार यांच्या मार्गदर्शनाखाली सोमनाथ व प्रशांत पवार यांनी पवार घराण्याची गौरवशाली परंपरा आजही जोपासली आहे. त्यांच्या घरात आजही मोठ्या प्रमाणात म्हशी पाळल्या जात असून ही ऐतिहासिक परंपरा पुढील पिढीकडे अभिमानाने हस्तांतरित होत आहे.

## नागरी सुविधांसाठी शिवसेनेचा धडक मोर्चा

**कळंब, दि.२९ ऑक्टोबर -**

कळंब शहरातील नागरी सुविधांच्या मागण्यांसंदर्भात शिवसेना (उबाठा) पक्षाच्या वतीने नगरपरिषदेच्या मुख्याधिकारी मंजूषा यांच्या कडे निवेदन देण्यात आले. या मागण्यांवर २ नोव्हेंबर २०२५ पर्यंत ठोस निर्णय न घेतल्यास नगरपरिषदेवर धडक मोर्चा काढण्याचा इशारा देण्यात आला आहे. निवेदनात नमूद केले आहे की, नगरोथ्थान महाअभियान अंतर्गत मंजूर झालेल्या पाणीपुरवठा योजनेचे काम तातडीने सुरू करावे. तसेच सर्व्हे क्र. ७/ब मधील ईदगाह मैदानासाठी दोन एकर जागा आधीच निश्चित असून भूमी अभिलेख कार्यालयाने मोजणी पूर्ण केली आहे. त्यामुळे मुस्लिम समाजाची समिती स्थापन करून मैदान विकसित करण्यास परवानगी द्यावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

# मातंग समाजाला नगीनाताईंच्या माध्यमातून विश्वासार्ह, स्वाभिमानी नेतृत्व लाभले : आ. राणा पाटील

## लहुजी सेनेचा चौथा वर्धापन दिन उत्साहात साजरा...

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२९ ऑक्टोबर -**

मातंग समाज हा अत्यंत प्रामाणिक, कष्टकरी आणि प्रगतीकांक्षी समाज असून, या समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी तसेच आरक्षण वर्गीकरणाची अंमलबजावणी लवकरात लवकर व्हावी यासाठी मी विधानसभेमध्ये सातत्याने आवाज उठवणार आहे, असे प्रतिपादन आमदार राणा जगजीतसिंह पाटील यांनी केले. त्यांनी पुढे म्हटले की, मातंग समाजाला नगीनाताईंच्या नेतृत्वातून विश्वासार्ह आणि स्वाभिमानी दिशा लाभली आहे, असे कौतुक त्यांनी या प्रसंगी व्यक्त केले.

आधुनिक लहुजी सेना संघटनेचा चौथा वर्धापन दिन धाराशिव येथील आर्यन फंक्शन हॉल येथे उत्साहात संपन्न झाला. या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून आ. राणाजगजीतसिंह पाटील उपस्थित होते, तर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संघटनेच्या संस्थापिका नगीना सोमनाथ कांबळे विराजमान होत्या. वर्धापन दिनानिमित्त अनुसूचित जाती आरक्षण वर्गीकरण अंतिम लढा विचारमंथन परिषद आयोजित करण्यात आली होती. राज्यभरातून हजारो पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी या परिषदेला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. नगीना यांच्या मार्गदर्शनाखाली आधुनिक फकीरा सोमनाथभाऊ कांबळे यांचे लक्ष्मण क्षीरसागर यांची संघटनेच्या प्रदेशाध्यक्षपदी, तर मृणाल कांबळे यांची संस्थापक कार्याध्यक्षपदी निवड करण्यात आली.

कार्यक्रमाचे औचित्य साधून सामाजिक, राजकीय, शैक्षणिक, पर्यावरण, मानवी हक्क आणि सेवा क्षेत्रांमध्ये उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींना संघर्ष योद्धा समाज भूषण पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.



# नळदुर्गमध्ये श्री ज्ञानेश्वरी पारायण सोहळ्यास भक्तिमय सुरुवात



**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.२९ ऑक्टोबर -**

नळदुर्ग येथील मराठा गल्ली येथे श्री ज्ञानेश्वरी पारायण सोहळ्यास मोठ्या उत्साहात आणि भक्तिमय वातावरणात सुरुवात झाली असून, या सोहळ्याला ४७ वर्षांची परंपरा लाभली आहे.

दि.२३ ऑक्टोबरपासून सुरू झालेल्या या पारायणाच्या चौथ्या दिवशी हभप. ज्ञानेश्वर महाराज माकणीकर यांच्या कीर्तनाने भक्त मंत्रमुग्ध झाले. दररोज भजन, कीर्तन, प्रवचन आणि गाथा भजनाचे आयोजन केले जात असून, या निमित्ताने संपूर्ण नळदुर्ग शहर भक्तिमय झाले आहे.

या पारायणाचे वैशिष्ट्य म्हणजे अन्नदाते सर्व नागरिकांना सामूहिक भोजनासाठी आमंत्रित करतात, ही परंपरा आजही टिकून आहे.

विशेष म्हणजे, तुळजापूर तालुक्यातील चव्हाणवाडी येथील ९६ वर्षीय दगडु (नाना) हनुमंत चव्हाण हे या पारायणात दरवर्षी सेवा बजावत आहेत. वयाच्या ९६ व्या वर्षीही ते पहाटे गाथा-भजन म्हणतात आणि पंढरपूरची वारी नियमित करतात. त्यांच्या समर्पणामुळे ते वारकरी परंपरेचे प्रेरणास्थान ठरले आहेत.

मराठा गल्लीतील हा पारायण सोहळा सन १९७८ पासून अखंडपणे सुरू असून, दि.२९ ऑक्टोबर रोजी पसायदान, काल्याचे कीर्तन आणि पालखी मिरवणुकीनंतर सोहळ्याची सांगता होणार आहे. या वेळी टाळ-मृदंगाच्या गजरात माऊलीची पालखी शहरातून मिरवली जाणार आहे.

# ग्रामीण तरुणांसाठी संकेत यादव यांचा उपक्रम; घरबसल्या आय.टी. आणि इंजिनिअरिंग कोर्सेसची संधी

सोलापूर तरुण भारत विशेष...

**तभा वृत्तसेवा**
**कळंब, दि.२९ ऑक्टोबर -**

शिक्षण आहे पण नोकरी नाही, व्यवसाय करण्याची क्षमता आहे पण पैसा नाही - या समस्येत अडकलेल्या ग्रामीण भागातील सुशिक्षित तरुणांना नवी दिशा देण्यासाठी संकेत दीपक यादव यांनी पुढाकार घेतला आहे. त्यांनी विविध व्यावसायिक कोर्सेस मोफत मार्गदर्शनासह उपलब्ध करून देत ‘इंटरनोएसीस प्रा. लि.’ या कंपनीच्या माध्यमातून तरुणांना रोजगार व स्वावलंबनाच्या दिशेने वाटचाल करण्याचे व्यासपीठ उपलब्ध करून दिले आहे.

आता कुठेही जाण्याची गरज नाही हे ब्रीदवाक्य घेऊन सुरू करण्यात आलेल्या या उपक्रमांतर्गत भारत सरकार मान्यता प्राप्त प्रोफेशनल ट्रेनिंग प्रोग्राम्स मराठवाड्यात प्रथमच कळंब शहरात सुरू होत आहेत. पुणे, मुंबई, हैदराबाद किंवा बेंगळुरूला न जाता आता हे कोर्सेस घरबसल्या ऑनलाईन पद्धतीने करता येणार आहेत.



या प्रशिक्षणात आय.टी. सॉफ्टवेअर, कोर इंजिनिअरिंग, टेक्निकल आणि मॅनेजमेंट कोर्सेस समाविष्ट असून, प्रत्येक प्रशिक्षणासोबत इंटर्नशिप, प्रत्यक्ष प्रोजेक्टवर काम, कोर्स कम्प्लिशन सर्टिफिकेट, इंटर्नशिप सर्टिफिकेट आणि प्लेसमेंट सपोर्ट देण्यात येणार आहे.

संकेत यादव यांनी सांगितले की, ग्रामीण तरुणांना तंत्रज्ञानाचे आणि करिअरविषयक शिक्षण घरबसल्या मिळावे, यासाठी हा उपक्रम सुरू केला आहे. सुशिक्षित बेरोजगारी कमी करणे हेच आमचे ध्येय आहे.

या कोर्सेससाठी नोंदणी सुरू असून, इच्छुकांनी इंटरनोएसीस प्रा. लि. सोबत जोडून आपल्या करिअरची नवी सुरुवात करावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

# नोकरी महोत्सव व स्वयंरोजगार मेळाव्यास उत्स्फूर्त प्रतिसाद

## एका हजार युवकांना रोजगाराची संधी ५० कंपन्यांच्या उपस्थितीत दोन हजार उमेदवारांच्या मुलाखती...

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२९ ऑक्टोबर -**

आमदार राणाजगजितसिंह पाटील यांच्या संकल्पनेतून धाराशिव शहरात आयोजित नोकरी महोत्सव व स्वयंरोजगार मेळाव्यास युवक-युवतींकडून प्रचंड प्रतिसाद मिळाला. राज्यातील ५० हून अधिक नामांकित कंपन्यांच्या उपस्थितीत तब्बल दोन हजारहून अधिक उमेदवारांनी मुलाखती दिल्या. त्यापैकी ४७८ युवकांना तत्काळ नियुक्तीपत्र प्रदान करण्यात आले असून ५०३ उमेदवारांना अंतिम मुलाखतीसाठी कंपन्यांकडे बोलावण्यात आले आहे.

आमदार पाटील यांच्या संकल्पनेतून आयोजित या मेळाव्याचा उद्देश स्थानिक तरुणांना रोजगार आणि स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणे हा होता. दर तीन महिन्यांनी असा रोजगार मेळावा घेण्यात येणार आहे, अशी माहिती आमदार पाटील यांनी उद्घाटनप्रसंगी दिली.





धाराशिव शहरातील पुष्पक मंगल कार्यालयात मंगळवारी हा भव्य मेळावा पार पडला. सकाळपासूनच उमेदवारांची गर्दी पाहायला मिळाली. सुमारे २२०० पेक्षा अधिक युवक-युवतींनी प्रत्यक्ष हजेरी लावली, तर ३,५०० हून अधिक उमेदवारांनी ऑनलाईन नोंदणी केली होती. नोंदणीकृत उमेदवारांना येत्या वर्षभर त्यांच्या पात्रतेनुसार रोजगाराच्या संधींबाबत माहिती पुरविण्यात येणार आहे.

या महोत्सवात राज्यातील ५० हून अधिक कंपन्यांनी सहभाग घेतला होता. विविध औद्योगिक क्षेत्रांतील प्रतिनिधींनी थेट मुलाखती घेतल्या. त्याचबरोबर स्वतःचा व्यवसाय सुरू करू इच्छिणाऱ्या उमेदवारांसाठी विविध शासकीय महामंडळांच्या योजना, अनुदान व मार्गदर्शन केंद्रांची माहितीही उपलब्ध करून देण्यात आली.

अतिवृष्टी व महापुरामुळे उद्भवलेल्या आर्थिक अडचणींच्या पार्श्वभूमीवर तरुणांना रोजगाराच्या संधी मिळाव्यात या हेतूने हा उपक्रम यशस्वीपणे पार पडला. आमदार पाटील यांनी पुढील काळात अशा प्रकारचे रोजगार व स्वयंरोजगार मेळावे नियमितपणे आयोजित करण्याचा निर्धार व्यक्त केला.

कार्यक्रमास माजी खा. सुधाकरराव शृंगारे, दत्ताभाऊ कुलकर्णी, नितीन काळे, विकास बारकूल, शंतनु पायाळ खंडेराव चौरे, अमित शिंदे, सुनील काकडे, अभय इंगळे, राहुल काकडे, अस्मिता कांबळे, प्रीती कदम, उषा येरकळ, विद्या माने, नीलकंठ पाटील, संदीप इंगळे, सनी पवार, नितीन शेरखाने, सागर दंडनाईक, मदन बारकूल, कुणाल निंबाळकर, पुष्पकांत माळाले, गोपाळ कदम यांच्यासह तेरणा अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विक्रमसिंह माने, प्रा. चंद्रजीत जाधव यांच्यासह जिल्हाभरातून आलेले तरुण, तरुणी आणि कार्यकर्ते उपस्थित होते.

### दर तीन महिन्यांनी रोजगार मेळावे घेणार : आ. राणादादा

दर तीन महिन्यांनी अशा प्रकारचे रोजगार मेळावे आयोजित करण्यात येणार आहेत. ज्यामुळे युवकांना आपल्या दारातच रोजगाराच्या संधी उपलब्ध होतील. तसेच, स्वयंरोजगाराच्या माध्यमातून स्वतःचा उद्योग सुरू करू इच्छिणाऱ्या युवकांना मागील दोन वर्षांपासून विविध शासकीय योजनांद्वारे आपण मदत करत आहोत आणि हा उपक्रम पुढेही सुरू ठेवणार आहोत. याशिवाय, सिम्बायोसिस विद्यापीठाच्या सहकार्याने जिल्ह्यातील युवकांना व्यवसायिक कौशल्य प्रशिक्षण दिले जाणार असून, या प्रशिक्षणामुळे त्यांना अधिक रोजगाराच्या संधी निर्माण होतील.